CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित




सोलापूर | बुधवार, २६ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १३७ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### प्रशांत कोरटकरला ३ दिवसांची पोलिस कोठडी

**कोल्हापूर** : आरोपी प्रशांत कोरटकर यांने त्याच्या मोबाईल मधील डाटा डिलीट केला आहे. असे त्याने का केले? तसेच हा आरोपी एक महिना फरार होता. या काळात त्याला कोणी मदत केली? याचा देखील तपास करणे गरजेचे असल्याचा दावा सरकारी वकील यांनी न्यायालयात केला होता. त्यामुळे आरोपीला सात दिवसांची पोलिस कोठडी मिळावी, तसेच आरोपीच्या आवाजाचे नमुने घ्यायचे आहेत. त्यासाठी न्यायालयाला ऑर्डर करावी लागेल. त्यामुळे तसे आदेश देण्याची मागणी देखील सरकारी वकील यांनी केली होती. त्यानंतर न्यायालच्या वतीने कोरटकरला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अपमानास्पद विधान करणाऱ्या फरार प्रशांत कोरटकरला अखेर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. महाराष्ट्र पोलिसांनी त्याला तेलंगणातील मंचारियालम धून दुपारी २:४५ वाजता ताब्यात घेतले असून त्याला कोल्हापूरला आणले आहे. आज त्याची वैद्यकीय चाचणी करण्यात आली. त्यानंतर त्याला न्यायालयात हजर केले गेले. दरम्यान कोरटकरच्या विरोधात जुना राजवाडा पोलिस ठाण्याबाहेर मोठ्या प्रमाणात शिवप्रेमी जमा झाले होते.

### दूध उत्पादनात जगात भारताची आघाडी

नवी दिल्ली : दूध उत्पादनात जगात भारताने आघाडी घेतली आहे. पुढील पाच वर्षांत ३०० दशलक्ष मेट्रिक टन दूध उत्पादनाचे लक्ष्य निश्चित करण्यात आल्याची माहिती केंद्रीय पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी लोकसभेत दिली. २०१४ मध्ये मोदी सरकारने राष्ट्रीय गोकुळ अभियान सुरू केले, यामुळे देशातील दूध उत्पादनात ६३.५ टक्क्यांनी वाढ झाली. पुढील ३ वर्षांत दूध उत्पादनात १५ टक्के वाढ करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे.

# जयकुमार गोरे बदनामी प्रकरणात सुप्रिया सुळे, रोहित पवारांचा हात

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा थेट विधानसभेत आरोप

**मुंबई, २५ मार्च | विशेष प्रतिनिधी**

मंत्री जयकुमार गोरे यांची बदनामी करण्यासाठी एक षडयंत्र रचले गेले. यात शरद पवार गटाचा हात असून, खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांचा थेट संबंध असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करू, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी विरोधकांच्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना उपरोक्त गौप्यस्फोट केला. यावेळी फडणवीस म्हणाले की, राज्याचे ग्रामीण विकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यासंदर्भात घडलेली घटना दुदैवी आहे. आपण राजकारणात एकमेकांचे विरोधक आहोत, शत्रू नाही. त्यामुळे कुणाला जीवनातून उठवण्याच्या उद्देशाने राजकारण होत असेल, तर ते चुकीचे आहे.



मंत्री गोरे यांच्यावर विनयभंगाचे आरोप करणाऱ्या महिलेला पोलिसांनी खंडणीच्या आरोपाखाली अटक केली आहे. एक कोटी रुपयांची खंडणी घेताना महिलेला रंगेहाथ पकडण्यात आले. कारवाईवेळी रेकॉर्ड करण्यात आलेले संपूर्ण संभाषण पोलिसांकडे आहे. हा सर्व प्रकार खंडणीसाठी होता, हे त्याचवेळी स्पष्ट झाले होते. प्रकरण २०१६ मधील होते आणि २०१९ मध्ये गोरे यांची न्यायालयाने निर्दोष सुटका केली असताना, पुन्हा ते प्रकरण उकरून काढून बदनामी करण्याचे षडयंत्र रचले गेले आणि हे रचणाऱ्यांमध्ये शरद पवार गटाचा हात असून, खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांचा या प्रकरणाशी संबंध असल्याचा गंभीर आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. याची चौकशी होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

(तभा वृत्तसेवा)

#### आरोपी, सुप्रिया सुळे, रोहित पवार एकमेकांच्या संपर्कात

पोलिस तपासात असे निदर्शनास आले की, हा एक कट होता. ही महिला, युट्युबर तुषार खरात आणि अनिल सुभेदारसह काही लोकांचे साटेलोटे असल्याचे आढळले. या लोकांनी जो कट रचला, त्याचे सर्व पुरावे सापडले आहेत. यांचे एकमेकांना अनेक फोन आले आहेत, ते सापडले. दुदैवाची गोष्ट म्हणजे, या सर्वांशी शरद पवार गटाचे नेते थेट संपर्कात दिसत आहेत. प्रभाकरराव देशमुख यांच्याशी आरोपी बोलत होते. सुप्रिया सुळे आणि रोहित पवारदेखील आरोपी तुषार खरातसोबत सतत संपर्कात होते. आरोपीने तयार केलेले व्हिडीओ देखील त्यांना पाठवण्यात आले आहेत. असेही फडणवीस यांनी सांगितले.

# वित्त विधेयकाला मंजुरी

### अर्थसंकल्प लागू होण्याचा मार्ग प्रशस्त

**नवी दिल्ली, २५ मार्च**

प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करातील तरतुदीत सुधारणा करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सूचवलेल्या दुरुस्त्या मान्य करीत लोकसभेने आज वित्त विधेयकाला आवाजी मतदानाने मंजुरी दिली. त्यामुळे २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाला मंजुरी मिळाली. आता औपचारिकता म्हणून वित्त विधेयक मंजुरीसाठी राज्यसभेत पाठवले जाईल.

वित्त विधेयकावर लोकसभेत झालेल्या चर्चेला अर्थमंत्री सीतारामन् यांनी उत्तर दिले. व्यक्तिगत आयकरदात्यांचे वार्षिक १२ लाखापर्यंतचे उत्पन्न पूर्णपणे करमुक्त राहील. त्यानंतरच्या वाढीव उत्पनानवरील आयकराची मर्यादा अतिशय मर्यादित राहणार आहे. १२ लाखापेक्षा जास्त उत्पन्नावर लागू होणारा कर हा अतिशय कमी राहील आणि तो फक्त वाढीव उत्पन्नावरच राहील. जर कोणाचे उत्पन्न १२ लाख १० हजार रुपये असेल, तर त्याला वाढीव कर हा फक्त दहा हजार द्यावा लागेल, असे त्या म्हणाल्या.



आयकरात मोठ्या प्रमाणात सवलत दिल्यानंतरही आयकर वसुलीत १ लाख कोटींनी वाढ झाल्याच्या दावा करीत सीतारामन् म्हणाल्या की, आयकरातील वाढीचा आमचा हा अंदाज व्यावहारिक आहे. गेल्या काही वर्षांत आयकर वसुलीत सातत्याने वाढ होत आहे. चालू आर्थिक वर्षात व्यक्तिगत आयकराच्या वसुलीत सहा ते सात टक्क्यांनी घट होण्याचा अंदाज आहे; मात्र पुढील आर्थिक वर्षात प्रत्यक्ष कराच्या वसुलीत १३ टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज आहे, असे त्या म्हणाल्या. मेटा आणि गुगल कंपन्यांना मिळणाऱ्या ऑनलाईन जाहिरातींवर लावण्यात येणारा ६ टक्के कर हटवण्याचा विचार असल्याचे संकेतही त्यांनी दिले. (तभा वृत्तसेवा)

# विजेच्या मागणीत होणार १० टक्के वाढ

### तज्ज्ञांचा सल्ला, तापमान उच्चांक गाठणार

**नवी दिल्ली, २५ मार्च**

फेब्रुवारी महिन्यापासून तापमानाचा पारा वाढला असून, अनेक भागात उन्हाळ्याची चाहुल लागली आहे. येणाऱ्या काळात देशात उष्णतेच्या लाटा अधिक जाणवण्याची शक्यता असल्याने, विजेची मागणी १० टक्क्यांपर्यंत वाढणार आहे. त्यासाठी तयारी करावी, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

हवामान तज्ज्ञ आणि पर्यावरण क्षेत्रात कार्यरत शास्त्रज्ञ दिशा अग्रवाल यांनी सांगितले की, मागील वर्षी ३० मे रोजी विजेची मागणी सर्वाधिक २५० गिगावॅट्स इतकी होती. या वर्षीची परिस्थिती पाहता विजेच्या मागणीत १० टक्क्यांनी वाढ होणार आहे. हवामान बदलामुळे तापमानात होत असलेल्या वाढीचा परिणाम विजेच्या मागणीला चालना देणारा एक महत्त्वाचा घटक ठरणार आहे. सध्या भारतातील एकूण वीज वापरात अनुक्रमे उद्योग, घरगुती आणि शेतीचा वाटा ३३ टक्के, २८ टक्के आणि १९ टक्के आहे. २०१२-१३ मध्ये घरगुती वीज वापराचा वाट २२ टक्क्यांवरून २०२२-२३ मध्ये २५ टक्क्यांपर्यंत वाढला. आर्थिक वाढ आणि हवामान बदलामुळे तापमानात झालेली वाढ यासाठी कारणीभूत ठरले. यावर्षी तापमान उच्चांक गाठण्याची शक्यता असल्याचे अभ्यासातून दिसून आले. पर्यायाने विजेची मागणी १० टक्क्यांपर्यंत वाढेल.

यासाठी वीजनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी तयारी ठेवावी. ही सर्वोच्च मागणी थोड्या काळासाठीच राहील. २०२०-२१ पासून भारताचा वीज वापर दरवर्षी सुमारे ९ टक्क्यांनी वाढत आहे, तर मागील दशकात विजेच्या मागणीचा वार्षिक टक्का ५ इतका होता. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने २०२२ ते २०३० पर्यंत विजेची मागणी दरवर्षी ६ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज वर्तवला होता.

#### उष्णतेच्या लाटा तिपटीने वाढणार

शास्त्रज्ञ आभास झा म्हणाले की, मध्यम उत्सर्जन परिस्थितीत भारतात उष्णतेच्या लाटांची संख्या तिपटीने वाढण्याची शक्यता आहे. भारत जागतिक स्तरावर वातानुकुलीत उपकरणांसाठी सर्वांत मोठी बाजारपेठ बनण्याच्या मार्गावर आहे. दर १५ सेकंदांनी भारतात वातानुकुलीत उपकरण विकली जाते, पर्यावरणाच्या दृष्टीने हा चिंतेचा विषय आहे.






# चिंचोली-धायटी रस्त्यावर भीषण अपघात; क्षीरसागर दांम्पत्यांचा जागीच मृत्यू

### शिरभावी गावावर पसरली शोककळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ मार्च-**

सांगोला ते धायटी रस्त्यावर चिंचोली हद्दीत दुचाकी व पिकअप मध्ये झालेल्या भीषण अपघातात शिरभावी (ता.सांगोला) येथील क्षीरसागर दांम्पत्याचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांचा चौदा वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाल्याची दुर्घटना मंगळवारी सकाळी घडली.

शिरभावी (ता.सांगोला) येथील बँक ऑफ महाराष्ट्र येथे नोकरीस असलेले धनंजय क्षीरसागर हे त्यांची पत्नी सुवर्णा व मुलगा ब्रह्म यांचे समवेत दुचाकीवरून शिरभावी कडे निघाले असता समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या पिकअप वाहनाने जोराची धडक दिल्यामुळे हा अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की, अपघातानंतर मोटरसायकलवरील तिघेही उडून बाजूला फेकले गेल्याचे प्रत्यक्षदर्शी कडून सम जले. अपघातात क्षीरसागर दामपत्याचा जागीच मृत्यू झाला तर मुलगा गंभीर जखमी झाला. गंभीर जखमी झालेल्या मुलाला सांगोल्यातील खाजगी रुग्णालयात उपचार करून नंतर पुढील उपचारासाठी सांगलीला पाठवण्यात आले आहे. मयत धनंजय क्षीरसागर हे बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये शिरभावी शाखेत अनेक वर्षांपासून नोकरीस होते तर त्यांच्या पत्नी सुवर्णा या शिरभावी येथे टेलरिंगचा व्यवसाय करत होत्या. या दाम्पत्यास तीन मुली व एक मुलगा असून त्यापैकी दोघी बाहेर शिक्षण घेत आहेत. क्षीरसागर दांम्पत्यांच्या मृत्यूमुळे गावावर शोककळा पसरली आहे.





सांगोला चिंचोली रस्त्यावर डाळिंब बाजार भरत असल्यामुळे पिकअप वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. ही वाहने भरधाव वेगाने चालवणे, कर्कश आवाजात सतत हॉर्न वाजवणे, रस्त्यावर वाहने उभा करणे, रस्त्यावर वाहने उभा करणाऱ्या चालकाला कोणी विचारलं तर दादागिरीची भाषा वापरणे आदी प्रकार सर्रास घडत असून या चिंचोली रस्त्यावरचा डाळिंब बाजार कायमस्वरूपी बंद करावा, अशी मागणी चिंचोली रोड व परिसरात राहणाऱ्या नागरिकांकडून होत आहे.

# शाळकरी मुलीचा छळ; नामांकित इंग्रजी शाळेतील शिपायास अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ मार्च -**

शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या मुलीचा शारीरीक व मानसिक छळ केल्याप्रकरणी शाळेतील शिपायाविरुध्द पोक्सो कायद्यानुसार सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी शिपायास अटक केली आहे. पिडीत मुलीच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन फ्रान्सीस आशिष पिंटो (वय ५५, रा. उत्तर सदर बझार, बापूजी नगर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याप्रकरणातील पिडीत मुलगी त्या स्कूलमध्ये शिकण्यास आहे. डिसेंबर २०२४ पासून २४ मार्चपर्यंत शाळेतील शिपाई फ्रान्सीस पिंटो याने पिडीतेच्या अज्ञानाचा फायदा घेऊन तिला शाळेच्या परिसरातील बाथरूममध्ये घेऊन तसेच शाळेच्या परिसरात तिच्या शरीरावरील विविध भांगावर चिमटे काढत तिचा शारीरीक व मानसिक छळ केला. ही बाब पिडीतेने तिच्या नातेवाईकांना सांगितल्यानंतर नातेवाईकांनी थेट सदर बझार पोलिस ठाणे गाठून विनयभंग व बालकांचे संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला. याप्रकरणी सदर बझार पोलिसांनी शिपाई पिंटो यास अटक केली असून पोलिस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे पुढील तपास करीत आहेत.

#### ही नामांकित शाळा विविध कारणांनी चर्चेत

गेल्या काही महिन्यांमध्ये शहरातील ती नामांकित शाळा विविध कारणांनी चर्चेत आली आहे. गेल्या काही महिन्यापूर्वी याच शाळेतील दोन मुली या शाळेच्या गणवेशातच बेपत्ता झाल्या होत्या. त्या नंतर मिळून आल्या. तर दुसऱ्या घटनेत शाळेतील एका शिक्षकानेच एका विद्यार्थ्याला वर्गातच बेदम मारहाण केल्याप्रकरणीदेखील पोलिसांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. अशा वेगवेगळ्या घटनांमुळे गेल्या काही महिन्यांमध्ये शाळा ही सतत चर्चेत राहिली आहे. आणि आता तर शाळेत शिकणाऱ्या मुलीचा शाळेतील शिपायानेच शारीरीक व मानसिक छळ केल्याबाबत थेट गुन्हाच दाखल करण्यात आला आहे. शाळेत शिकणाऱ्या मुलांना पालक हे शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विश्वासावर शाळेत पाठवत असतात. परंतु, मुलींच्या बाबतीत असा प्रकार होत असेल तर शाळेत शिकणाऱ्या मुली संरक्षित कशा राहतील असा प्रश्न उभा राहतो. शासनाचे अनुदान मिळणारी ही शाळा ही शहरातील एकमेक इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाच्यावतीने शाळेच्या प्रशासनाची तपासणी करून असे प्रकार रोखण्यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा पालकवर्गातून व्यक्त होत आहे.



# पंजाबकडून गुजरातचा ११ धावांनी पराभव

गुजरात : आयपीएल-१८ च्या ५ व्या सामन्यात पंजाब किंग्जने गुजरात टायटन्सचा ११ धावांनी पराभव केला. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात गुजरातने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. पंजाबने २० षटकांत ५ गडी गमावून २४३ धावा केल्या. त्यानंतर गुजरातला २० षटकांत ५ बाद २३२ धावा करता आल्या.

पंजाबकडून श्रेयस अय्यरने नाबाद ९७ आणि शशांक सिंगने नाबाद ४४ धावा केल्या. दोघांमध्ये ८१ धावांची नाबाद भागीदारी झाली. सलामीवीर प्रियांश आर्यने ४७ धावा केल्या. गुजरातकडून साई किशोरने ३ विकेट्स घेतल्या.




## संक्षिप्त वृत्त



### सांस्कृतिक कार्य विभागातर्फे जीवन गाणे गातच जावे कार्यक्रमाचे आयोजन

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

संस्कृतिक कार्य विभाग तसेच सांस्कृतिक कार्य संचालनायाद्वारे सांस्कृतिक मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनातून विभीषण चवरे यांच्या नियोजना खाली जीवन गाणे गातच राहावे हा कारागृहातील कैद्यांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. एकाच वेळी महाराष्ट्रातील ३६ कारागृहांमध्ये या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले होते. विधी सेवा प्राधिकरण सोलापूरचे न्यायाधीश देवर्षी, अधीक्षक सुनील कुंभार, वरिष्ठ तुरुंग अधिकारी हिदायत तांबोळी, तुरुंग अधिकारी प्रदीप बाबर आणि निलेश गायकवाड उपस्थित होते. कैद्यांच्या जीवनात बदल हवा त्याचबरोबर झालेल्या चुका पुन्हा होऊ नये यासाठी मनोरंजनातून प्रबोधन व देशभक्ती निर्माण करणारा सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले होते. समन्वयक अमोल धाबळे यांनी कार्यक्रम ाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. कार्यक्रमात सायली साठे, भाग्यश्री चव्हाण, निखिल भालेराव, शशी बासुतकर या गायक कलाकारांनी कला सादर केली. कार्यक्रमाचे संगीत संयोजन अमीर हुंडेकरी यांनी केले तर सूत्रसंचालन लक्ष्मीकांत वेदपाठक यांनी केले.



### प्रतिकात्मक विमाने उडवून सोलापूरच्या विमानसेवेसाठी संभाजी ब्रिगेडचे आंदोलन

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

अनेक दिवसापासून बंद असलेली सोलापूरची विमान सेवा सुरू होण्यासाठी सोलापूरच्या विमानतळाच्या गेटवर प्रतिकात्मक प्लास्टिकचे विमान उडवून संभाजी ब्रिगेडच्या वतीने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनोखे आंदोलन करण्यात आले संभाजी ब्रिगेडच्या वतीने आज सायंकाळी होडगी रोडवरील सोलापूर विमानतळाच्या गेटवर संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते एकत्रित जमून प्लास्टिकचे विमाने उडवून सरकारची व लोकप्रतिनिधींची खिल्ली उडवून निषेध केला सोलापूर विमानतळ होण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने वेगळी आंदोलने करण्यात आली होती तरी देखील सोलापूरची विमानसेवा सुरू झाली नाही गेल्या सहा महिन्यापूर्वी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते घाईघाईत विमानसेवेचा उद्घाटन सोहळा करण्यात आला निवडणुकीच्या तोंडावर अनेक राजकारणे लोकांनी आश्वासन देऊन सुद्धा विमानसेवा सुरू झाली नाही. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, संभाजी राजे भोसले, मीनल दास, जयश्री जाधव, शिरीष जगदाळे, छत्रगुण माने, सतीश वावरे, सिद्धाराम स्वबळे, शेखर कंटेकर, दिलीप निंबाळकर, विरेश कंटीकर, प्रशांत देशमुख, रमेश भंडारे, विशाल सोलापूर आदी उपस्थित होते.



### आयडल्स संस्थेच्या उत्सव अध्यक्षपदी श्रीशैल हिरेमठ

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आयडल्स मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या उत्सव अध्यक्षपदी श्रीशैल हिरेमठ यांची निवड करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यासाठी वार्षिक बैठकीचे नियोजन करून नूतन पदाधिकारी करण्यात आले. या बैठकीचे आयोजन कस्तुरबा मार्केट आयडल्स संपर्क कार्यालय येथे करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून युवराज पवार, बब्रुवान बाबरे, अजय देवकर, संस्थेचे विश्वस्त अमोल जोजट, आनंद बनसोडे, शेरा तुळसे, सल्लागार ॲड. राजकुमार बाबरे, सुमित शिवशरण, सुमित बाबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवड करण्यात आली. **इतर पदाधिकारी याप्रमाणे :** उपाध्यक्ष रोहन गायकवाड, कार्याध्यक्ष किरण ननसुरे, सचिव नवीन तळभंडारे, प्रसिद्धी प्रमुख शुभम कदम, नागसेन बाबरे, सोनू शिवशरण, मिरवणूक प्रमुख जयकुमार बाबरे, सत्यजित वडावराव, मंगेश कांबळे, सुरज कदम, राम चक्राळ, सादिक शेख, आकाश शिवशरण आदी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

### श्री विष्णू महादेव यात्रा समिती अध्यक्षपदी शाहीर गायकवाड; सचिवपदी ज्ञानेश्वर माळी

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील ग्रामदैवत श्री विष्णू महादेव यात्रा व अखंड हरिनाम सप्ताहासाठी एक समिती सोमवार,





दि.२४ मार्च रोजी गठण करण्यात आली असून, या समिती अध्यक्षपदी शाहीर गायकवाड, उपाध्यक्षपदी इंद्रजित घोटकर, सचिवपदी ज्ञानेश्वर माळी, तर सहसचिवपदी सुधाकर लोंढे यांची निवड करण्यात आली. तुळजापूर तालुक्यातील ताम लवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रामदैवत श्री विष्णू महादेव यात्रा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असल्याने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात ग्रामस्थांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. . या समितीच्या इतर कार्यकारिणीमध्ये सदस्यपदी शिवदास पाटील, सर्जेराव गायकवाड, सचिन शिंदे, ओम जगताप, नागनाथ मसुते, नामदेव पाटील, विठ्ठल घोटकर, सुधीर पाटील, कृष्णा घोटकर, सुधीर गायकवाड, राम कांबळे, रवी पाटील, सिताराम भाकरे, स्वप्निल पाटील, कृष्णा शिंदे, ज्ञानेश्वर जगताप, प्रशांत राऊत, संभाजी माळी यांच्याही निवडी जाहीर केल्या.

# १४ खत विक्रेत्यांचे परवाने रद्द तर १७ निलंबित

## रासायनिक खताची २३ तर बियाणे व किटकनाशकांच्या ८ दुकानांचा समावेश; कृषी विभागाची धडाकेबाज कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

जिल्हा परिषद कृषी विभागांतर्गत पंचायत समिती स्तरावरून खते, बियाणे व किटकनाशके विक्रेते यांच्यावर तपासणी दरम्यान खते, बियाणे व किटकनाशके तसेच अत्यावश्यक अधिनियम अंतर्गत विहीत केलेल्या तरतुदींची भंग केल्याने कृषी सेवा केंद्र धारकांवर कायद्यातील विहीत तरतुदीनुसार खत दुकानांवर कारवाई करण्यात आली आहे. रासायनिक खतांच्या ६ तसेच बियाणे व कीटकनाशक दुकानांचे प्रत्येकी चार असे १५ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. तसेच १७ खत विक्रेत्यांचे परवाने निलंबित केले आहेत. तपासणीत दोष आढळून आल्याने जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक बाळू बागल यांच्या अहवालानुसार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सुनावणी घेऊन खत विक्रेत्यांचे म्हणणे घेऊन कारवाया केल्या आहेत.

### यांचा परवाना रद्द

**रासायनिक खताची दुकाने**

शेतकरी कृषी केंद्र आचेगाव, प्रवीण कृषी भांडार मंद्रूप, शावरसिद्ध ॲग्रो एजन्सी आचेगाव, सम्राट बायोटेक बोरामणी, स्वामी समर्थ कृषी भांडार कंदलगाव, वरद कृषी केंद्र नरखेड,

**बियाण्यांची दुकाने**

शेतकरी कृषी केंद्र आचेगाव, शावरसिद्ध एजन्सी आचेगाव, श्री. स्वामी समर्थ कृषी भांडार कंदलगाव, वरद कृषी केंद्र नरखेड,

**कीटकनाशक दुकाने**

शेतकरी कृषी केंद्र आचेगाव, शावरसिद्ध एजन्सी आचेगाव, स्वामी समर्थ कृषी भांडार कंदलगाव व वरद कृषी केंद्र नरखेड या दुकानांचा विक्री परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आला आहे.

**पंढरपूर व दक्षिण तालुक्यातील सर्वाधिक दुकानांचा समावेश**

जिल्हा परिषद कृषी विभागाकडून रासायनिक खते, बियाणे व किटकनाशके दुकानांवर कारवाई करण्यात आली असून निलंबित व कायमस्वरूपी परवाना रद्द करण्यात आले असून यामध्ये पंढरपूर व दक्षिण तालुक्यातील सर्वाधिक दुकानांचा समावेश आहे. त्यानंतर मोहोळ, माढा व माळशिरस तालुक्यातील प्रत्येकी दोन दुकानांचा समावेश आहे.

> निविष्टाविषयक तरतुदीनुसार जे कृषी सेवा केंद्रधारक व्यवसायात कसूर करतील, त्यांच्यावर कृषी अधीक्षक कार्यालयाच्या मदतीने कडक कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे कृषी सेवाकेंद्र धारकांनी शासनाच्या नियमांचे पालन करून विक्री करावी.
>
> **- हरीदास हावळे,**
> **जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर**

### या दुकानदारांचे परवाने निलंबित

गुरुकृपा कृषी केंद्र दादपूर, ता. मोहोळ, मनोज कृषी केंद्र नवी पेठ पंढरपूर, मनोज कृषी केंद्र पंढरपूर, गुरुकृपा ॲग्रो सर्व्हिसेस पिंपळनेर, जय गणेश कृषी केंद्र लऊळ, मे. फडे ट्रेडिंग कंपनी अकलूज, मे सुरेशचंद्र प्रेमचंद फडे महावीर पथ अकलूज, गुरुदत्त कृषी उद्योग समूह कोर्टी, आदिती फार्मर प्रोड्युसर कंपनी अनवली, श्रीकृष्ण ॲग्रो सव्हिसेस वाखरी, भगवंत कृषी उद्योग सांगोला रोडपंढरपूर, श्री. ब्रम्हचैतन्य ॲग्रो एजन्सी शेळवे, लोकसेवा कृषी केंद्र भोसे (क) पंढरपूर, महालक्ष्मी फर्टिलायझर एलएलपी कासेगाव, झुआरी फर्महब लि. पंढरपूर, श्री. गणेश कृषी केंद्र करकंब व श्री. स्वामी समर्थ ॲग्रो एजन्सी भोसे या दुकानांचे विक्री परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

# अनगरचे अप्पर तहसील कार्यालय रद्द

### अधिवेशनातील शासन निर्णयाने झाले शिक्कामोर्तब

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २५ मार्च-**

सत्तेच्या जोरावर चालू केलेले हे अनगर अप्पर तहसील कार्यालय उच्च न्यायालयाने रद्द करण्याचा निकाल दिला होता. तरीही त्या ठिकाणी कार्यालय सुरूच होते अशा आ राजू खरे यांचे कडे जनतेच्या तक्रारी सुरूच होत्या याच निर्णयाची अंम लबजावणी करण्यासाठी आ राजू खरे सातत्याने पाठपुरावा करित होते. सरकारने राज्यपालांच्या आदेशानुसार हे अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्यात आले असल्याचा शासन निर्णय मंगळवारी २५ मार्च रोजी काढला. यामुळे अनगर येथील नव्याने सूरू केलेले ते अप्पर तहसील रद्द बाबतचा शिक्कामोर्तब झाला आहे.त्यावर शेवटचा खिळा ठोकला गेला असल्याची चर्चा सुरू झाली आहे. मोहोळ याठिकाणी एकच तहसील कार्यालय होते. मोहोळ हे अवघ्या तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण होते. तरीही माजी आमदार यशवंत माने यांच्या कार्यकाळामध्ये अनगर या ठिकाणी विनाकारण अप्पर तहसील कार्यालय उघडण्यात आले होते. या कार्यालयामुळे बहुतांशी लोकांना त्रासदायक वाटत होतें. त्यामूळे सदरचे अपर तहसील कार्यालय करण्याबाबत तमाम जनतेचा विरोध दिसत होता. हा विरोध झुगारून अनगर

याठिकाणी शासन निर्णय २७ जुलै २०२४ आणि १९सप्टेबर २०२४चे नुसार सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यामुळं मोहोळ तालुक्यात मोठा राजकीय वाद निर्माण झाला होता. हे अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यानंतर मोहोळ विधिज्ञ मंडळांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मोहोळ तालुक्यातील भाजपाचे प्रांत कार्यकारिणी सदस्य संतोष पाटील नरखेडकर आणि सोमेश क्षीरसागर यांच्यासह काही जणांनी जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवर निकाल देताना मुंबई उच्च न्यायालयाने १७फेब्रुवारी २०२५ रोजी त्या अप्पर तहसील कार्यालयास मंजुरी देण्यात आलेला शासन निर्णय रद्द करण्याबाबतचा आदेश दिला होता. या दिलेल्या न्याय निर्णयास अनुसरून मंगळवारी २५मार्च २०२५ रोजी नव्याने शासन निर्णय काढून ते अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्यात आल्या बाबत शिक्काम ोर्तब झाला आहे. या नव्याने करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये, सध्या अनगर येथे कार्यरत असलेले अप्पर तहसीलदार यांना सोलापूरचे जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर पुढील शासन आदेश होईपर्यंत रिक्त पदावर पदस्थापना देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. हा शासन निर्णय राज्याचे राज्यपाल यांचे आदेशानुसार सहसचिव सत्यनारायण बजाज यांनी पारित केला आहे. या निर्णयाच्या प्रती राज्यपाल,मुख्यमंत्री, उपमुख्यमत्री, महसूल मंत्री, आणि यासंबंधात असलेले सर्व अधिकारी यांच्या कार्यालयांना देण्यात आले आहेत. त्यामुळे आता यापुढील काळात अनगर येथील अप्पर तहसील कार्यालयाबाबतच्या वादावर पडदा पडला आहे.

### आ. राजू खरे यांनी केला होता पाठपुरावा

मोहोळ येथे तहसील कार्यालय व्यवस्थित आणि सुरळीतपणे सुरू असताना. केवळ सत्तेच्या बळाचा वापर करीत अनगर याठिकाणी अप्पर तहसील कार्यालय करण्यात आले होते. सुरुवातीपासूनच आमदार राजू खरे यांनी यासाठी विरोध दर्शविला होता. तरीही त्या ठिकाणी ते अप्पर तहसील कार्यालय निर्माण करण्यात आले होते. त्याचे पडसाद म्हणून मोहोळ तालुक्यातील जनतेने विधानसभा निवडणुकीतील चक्क सत्तांतर घडवून आणत राजू खरे यांना आमदार करण्याची संधी मिळाली होती. आ.खरे यांनाही निवडणुकीत दिलेला शब्द पुर्ण करण्यासाठीं मोठी घाई झाली होती. त्यांनी उच्च न्यायालयाचा निकाल येताच, ७मार्च रोजी महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे जावून न्यायालयाने दिलेल्या निकालाची अंम लबजावणी करून अनगरचे अप्पर तहसील कार्यालय रद्द करून पूर्ववत प्रमाणे मोहोळ या ठिकाणी एकाच ठिकाणी तहसील कार्यालय ठेवण्याबाबतचे निवेदन सादर केले होते. याची दखल घेत, अधिवेशना च्या दरम्यानच हा नवीन शासन निर्णय काढण्यात आला आहे. यामुळे आ. राजू खरे यांनी दिलेले आश्वासन खऱ्या अर्थाने पूर्ण झाले आहे.

### माने यांना सावित्रीबाई फुले पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ नागपूर यांच्यावतीने संस्थेच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे सोलापूर येथील युगंधर फाउंडेशनच्या खजिनदार



सुप्रिया माने यांना त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे हा पुरस्कार वितरण समारंभ दि. ३० मार्च रोजी विदर्भ हिंदी साहित्य संमेलन सभागृह नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपक कुमार खोब्रागडे यांनी दिली. सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सोलापूर येथील युगंधर फाउंडेशन परिवारातर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

# अवकाळी पावसाची शहरात आज पुन्हा हजेरी



### मीना बाजारात व्यापारी व खरेदीदारांची उडाली तारांबाळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२५ मार्च-**

सोलापूर शहर व परिसरात आज दि.२५ मार्च रोजी अवकाळी पावसाने पुन्हा हजेरी लावली. काल सोमवारीही दुपारी शहरातील काही भागात जोरदार वृष्टी झाली होती. आज झालेल्या पावसाची तीव्रता कमी होती. सलग दुसऱ्या दिवशी पाऊस झाल्याने उन्हाची तीव्रता कमी होऊन शहरवासियांना दिलासा मिळाला.

सोलापूर शहर व परिसरात गेल्या काही दिवसात उन्हाची तीव्रता वाढून पारा उच्चांकी पातळीवर पोचला होता. उन्हामुळे हैराण शहरवासियांना काल व आज झालेल्या अवकाळी पावसाने थंडावा मिळाला आहे. अवकाळी पावसाने काल दुपारी व आजही दुपारी सुमारे चारच्या सुमारास हजेरी लावली. सात रस्ता, विजापूर रोड, अशोक चौक, होटगी रोड, रंगभवन परिसारत पावासाचा चांगलाच शिडकावा झाला. रमजानसाठी विजापूर वस परिसरात भरलेल्या मीना बाजारात पावसामुळे व्यापारी व खरेदीदारांची तारांबळ उडाली. दोन दिवस सलग झालेल्या या अवकाळी पावसाने रात्रीच्या तापमानात घट झाल्याचे चित्र होते.

# जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना भेटणार महसूल अधिकारी

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासकीय कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी आता महसूल खात्याचे अधिकारी त्यांच्या घरी जावून विचारपूस करून त्यांच्या समस्या दूर करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातील १० ते १५ वर्षापासून अनेक शेतकऱ्यांनी विविध कारणास्तव आत्महत्या केल्या आहेत. यातील अनेक आत्महत्याग्रस्त शासनाच्या निकषामध्ये बसले नसल्याने त्यांना शासनाकडून आर्थिक मदतही मिळाली नाही. अशा शेतकऱ्यांची शासन दरबारी नोंद आहे मात्र त्यांच्या वारसांना सहकार्य देण्यात आले नसल्याने नाही. यामुळे अशा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासकीय योजनाचा लाभ देता यावा किंवा त्यांच्या शासन स्तरावरील प्रलंबित असलेल्या कामांची पूर्तता करता यावी यासाठी त्या-त्या तालुक्याचे तहसीलदार, तलाठी, ग्रामसेवक आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या घरी जावून सहानुभूतीने विचारपूस करणार आहेत आणि त्यांच्या अडचणी दूर करणार आहेत.

आत्महत्या केलेल्या सर्व शेतकऱ्यांची यादी विविध विभागातून मागवण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी बँक कर्जासाठी वसुली तगादा, नापिकी, नैसर्गिक आपत्तीमुळे आत्महत्या केली आहे. त्यांना शासनाकडून मदतीचा हात दिला आहे. मात्र या निकषात न बसणाऱ्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळाली नाही; अशा शेतकरी कुटुंबियांची माहिती गोळा करून त्यांना विविध कागदपत्रे मिळण्यासाठी, पुढील कार्यवाही होण्यासाठी किंवा शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी सहकार्य केले जाणार आहे. यासाठी विविध खात्याचे शासकीय अधिकारी, कर्मचारी मार्गदर्शन करणार आहेत. गरज पडल्यास ज्या-त्या तालुकास्तरीय तहसीलदार कार्यालयात शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आशीर्वाद यांनी दिली.

# जैन संघटना गाळमुक्त धरण योजनेस सहकार्य करणार

### पदाधिकाऱ्यांनी दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना राबविण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची राज्य अध्यक्ष केतनभाई शहा सोबत सर्व पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली आणि भारतीय जैन संघटना गाळमुक्त धरण अन् गाळयुक्त शिवार योजनेसाठी सहकार्य करणार असल्याचे सांगत विस्ताराने चर्चाही केली.

बिजेएसतर्फे मागील वर्षी राज्यातील ३०,००० गावांना भेटी देऊन १०,९०० ग्रामपंचायती मधून गाव तलावातील गाळ काढण्यासाठीचे मागणीपत्र भरून ते जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात आले होते. या वर्षी देखील बिजेएस यांनी शासनास ह्या कामासाठी संपूर्ण राज्यात सहकार्य करण्याचे ठरवले व संस्थापक



शांतीलालजी मुथा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या सोबत एक सामंजस्य करार मंत्रालयात केला असल्याची माहिती शहा यांनी दिली.

मागील वर्षी सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यामधील सर्व ग्रामपंचायतीस आमचे कार्यकर्ते ११ जलरथ सोबत जाऊन मागणीपत्र भरून घेत होते व पोस्टर लावून जनजागृती करत होते, अशा २४४ ग्राम पंचायतींची मागणी पत्रे भरून शासनाकडे जमा केली. त्या पैकी १२६ तलावतील गाळ काढण्याची शासन मान्यता देखील मिळाली व तेथे काम पूर्ण होत आहे. यावर्षी देखील शासनास बिजेएस ने एक पोर्टल तयार करून ते शासनाच्या जलसंपदा मंत्री संजय राठोड याना सुपूर्त करण्यात आले आहे. आपल्या गावातील तलाव, बंधारा,नाला ह्या मधील गाळ काढून तो गाळ शेतकऱ्यांना विनामूल्य आपल्या शेतात घेऊन जावयाचा आहे, अल्पभूधारक शेतकऱ्यांना वाहतुकीसाठी राज्य शासन अनुदान देखील देणार आहे. या योजनेमुळे आपल्या गावातील पाणीसाठा वाढेल व मनुष्य, प्राणी, पक्षी यांची तहान भागेल तसेच शेतात गाळ टाकल्याने शेतकऱ्याची जमीन सुद्धा सुपीक होईल व उत्पन्न वाढेल, असा हेतू या संघटनेचा आहे. यावेळी राज्याध्यक्ष केतनभाई शहा, राज्य सचिवा संतोष बंब, राज्य कार्यकारणी सदस्य श्याम पाटील, प्रवीण कुमार बलदोटा, जिल्हा समन्वयक विशाल मेहता, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभुते ,महेश कोकीळ, विभागीय महिला अध्यक्ष माया पाटील, जिल्हाध्यक्ष देशभूषण वसाळे, जिल्हा सचिव प्रशांत वर्धमाने, जिल्हा सदस्य विक्रांत बशेट्टी, कोमल पाचोरे आदींची उपस्थिती होती.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत झाला निर्णय

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार/नाला खोलीकरण योजनेची सविस्तर चर्चा जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्यासोबत झाली. यानंतर त्यांनी त्वरित नोडल ऑफिसर म्हणून जलसंपदा अधिकारी दामा यांची नियुक्ती केली. सर्व संबधित विभाग अधिकाऱ्यांची एक मिटिंग लाऊन, कामाचे नियोजन करुन कार्य सुरू करु, असेही त्यांनी सांगितले.

### सुरेश पालवे पुणे ग्रामीण राष्ट्रवादी पक्ष निरीक्षक

**नातेपुते, दि. २५ मार्च-**

पिंपरी चिंचवड व पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पक्ष निरीक्षक पदी मांडवे (ता. माळशिरस) येथील सुरेश आबा पालवे पाटील यांची गेल्याच महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सहीचे



पत्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निवडीचे पत्र देऊन सुरेश पालवे जबाबदारी सोपवली होती त्यांचे काम पाहून त्यांना पुणे जिल्हा ग्रामीणची ही जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सहीचे पत्र देण्यात आले असून पिंपरी चिंचवड, पुणे शहर व पुणे ग्रामीणच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निरीक्षक पदी पालवे पाटील यांच्याकडे कामाची जबाबदारी वाढली आहे सुरेश पालवे पाटील उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू कार्यकर्ता असून ते पक्षाशी एकनिष्ठ आणि पक्षाने दलेली जबाबदारी प्रमाणिकपणे पार पाडत असतात.

# ६० उद्योजकांकडून सोलापुरात ३०० कोटींची गुंतवणूक होणार

**● जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार सोलापूर जिल्ह्यातील उद्योजकता उद्योग क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी प्रशासनाकडून पुढाकार घेण्यात आला आहे. या उपक्रमातून शहरातील एमआयडीसीमध्ये सुमारे ६० उद्योजकांकडून ३०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.



मागील सहा महिन्यांपासून जिल्हा प्रशासनाच्या वतीने उद्योजकांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी जिल्हास्तरावर समितीही गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या बैठकाही पार पडल्या असून, सोलापूरची बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न यातून राहणार आहे. सध्या सोलापुरात ५ कोटीपेक्षा अधिक गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांना प्रशासनाकडून सहकार्य करण्यात येत आहे. या उद्योजकांना आवश्यक सर्व सुविधा एकाच छताखाली पारदर्शक वातावरणात देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहे. पाकणी व अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे देखील प्रशासनाकडून आवश्यक ते उद्योजकांना सहकार्य, आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचीही माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

# विभागीय चौकशीसाठी नवीन कार्यपद्धती लागू होणार : फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ मार्च -**

लाच घेणारे व भ्रष्टाचाराशी संबंधित आरोपांत सहभागी असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यात येते. मात्र सध्याची कार्यपद्धती वेळखाऊ असल्याने यामध्ये सुधारणा करण्यात येऊन नवीन कार्यपद्धती तयार करण्यात येणार आहे. यामुळे विभागीय चौकशी निश्चितच वेगाने पूर्ण होऊन प्रकरण लवकर निकाली निघेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या उत्तरात दिली.

सदस्य वरुण सरदेसाई यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य भास्कर जाधव यांनीही सहभाग घेतला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव यांच्या अंतर्गत विभागीय चौकशी विहित कालावधीमध्ये पूर्ण करण्यासाठी काम सुरू आहे. ही चौकशी गतीने पूर्ण करण्यासाठी व्यवस्था निर्माण करायची गरज भासल्यास ती करण्यात येईल. वेळेत दोषारोपपत्र तयार करणे यामुळे शक्य होणार आहे. राज्य शासन व्हॉट्सॲपच्या माध्यमातून विविध सेवा उपलब्ध करून देत आहे. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व सेवा पहिल्या टप्प्यात ऑनलाइन व दुसऱ्या टप्प्यात व्हॉट्सॲप वरून करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. जर कुणी काम मुद्दाम अडवले तर, डिजिटल फूट प्रिंट तयार होऊन अडविणारा समोर येऊन त्याच्यावर कारवाई करण्यात येईल. मजूर संस्थांमध्ये अध्यक्ष हा मजूरच असला पाहिजे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व कामगार विभागाकडून अधिक प्रभावी नियमावली तयार करण्यात येवून संस्थांचा दुरुपयोग थांबविला जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



# अवैध हुक्का पार्लर नियंत्रणासाठी अजामीनपात्र गुन्हा करणार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५मार्च :**

राज्यात तंबाखूजन्य हुक्का पार्लर व्यवसायावर २०१८ मध्ये कायद्याने बंदी आहे. हर्बल हुक्का पार्लर नावाखाली अवैधपणे हुक्का पार्लर व्यवसाय सुरू असल्याचे प्रकार समोर येत आहेत. अवैधरित्या हुक्का पार्लरवर प्रभावीपणे नियंत्रण आणण्यासाठी कायद्यात सुधारणा करून कायदा अधिक कडक करण्यात येईल. अवैध हुक्का पार्लर चालविण्याचा तिसऱ्यांदा गुन्हा केल्यास अजामीनपात्र गुन्हा समजण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

अवैध हुक्का पार्लरबाबत सदस्य सुनील कांबळे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत संजय केळकर, सुधीर मुनगंटीवार, नाना पटोले, सिद्धार्थ शिरोळे, आशिष देशमुख या सदस्यांनी सहभाग घेतला.या प्रश्नाच्या उत्तरात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अवैधरित्या हुक्का पार्लर चालविण्याचा गुन्हा केल्यास तीन वर्ष कैदेची शिक्षा होते, आता दुसऱ्यांदा हा गुन्हा केल्यास कैदेसह उपहारगृहाचा परवाना रद्द करण्यात येईल. तिसऱ्यांदा गुन्हा केल्यास परवाना कायमस्वरूपी रद्द करून हा गुन्हा अजामीनपात्र करण्यात येईल. हुक्का पुरवठा करण्याबाबत हुक्का पार्लरशी संबंधित गुन्हा समजण्यात येईल. पोलिसांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अवैध हुक्का पार्लरच्या व्यवसायातबाबत कारवाई न केल्यास पोलिसांवर कारवाई करण्यात येईल.

ई सिगारेटचे व्यसन तरुणाईला आपल्या विळख्यात घेत आहे. ई सिगारेट स्टाईल स्टेटमेंट समजले जात आहे. ई सिगारेटवर बंदी आहे, याबाबत अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम उत्तरात म्हणाले, राज्यात विशेष मोहीम राबवून अवैध हुक्का पार्लरवर कारवाई करण्यात येईल. हर्बल हुक्का पार्लरच्या नावाखाली अवैध हुक्का पार्लर चालवत असल्याचे निदर्शनास आल्यास कारवाई करण्यात येईल. या प्रकरणी ५० गुन्हे दाखल करण्यात आले असून १.२५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले.

# भारतीय पुरातत्व विभागातील किल्ले देखभालीसाठी राज्याकडे द्या

**● मंत्री आशिष शेलार यांचे केंद्राला साकडे**

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २५ मार्च-**



भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे किल्ले संवर्धन आणि देखाभाल व दुरूस्तीसाठी राज्याच्या पुरातत्व विभागाकडे देण्यात यावेत ,अशी विनंती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी पत्राव्दारे केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांना केली आहे.

शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या बलाढय इतिहासाची साक्ष देणारे महाराष्ट्रात ५४ गड किल्ले हे केंद्र संरक्षित असून ६२ गड किल्ले राज्य संरक्षित किल्ले आहेत. त्यांचे संरक्षण व जतन तसेच देखभाल व दुरूस्तीसाठी राज्य शासन प्रयत्न करीत असून जर हे सगळे किल्ले राज्य शासनाच्या अखत्यारित दिल्यास त्यांची डागडूजी व देखभाल अत्यंत प्रभावीपणे करता येईल, असे शेलार यांनी पत्रात म्हटले आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत आपल्या १२ ऐतिहासिक किल्ल्यांचा समावेश करण्यासाठी शेलार यांच्या नेतृत्वात पॅरिस येथे जाऊन आले आहे. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी किल्ला आणि जिंजी किल्ला यांचा समावेश आहे. महाराष्ट्राचे पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालय संचालनालय हे वारसा संवर्धनातील विशेष तज्ञ व पॅनेल केलेले कंत्राटदार आणि वास्तुविशारदांच्या माध्यमातून संवर्धनाचे काम प्रभावीपणे करु शकते तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासन काम करीत असून काही खाजगी संस्थांकडून सीएसआर मधून निधीही शासनास उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे आमच्या इतिहासाची साक्ष् देणारे हे किल्ले जतन करणे आमचे कर्तव्य असून आमचा हा अभिमानाचे कार्य ठरू शकते, असे नमूद केले आहे.

# भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला : बावनकुळे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ मार्च -**

राज्य सरकारच्या वतीने भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एल.बोरगाव ते मुक्ताईनगर रस्त्याचे चौपदरीकरणासाठी भूसंपादनाला योग्य दर मिळावा यासाठी २ एप्रिल रोजी बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीत सविस्तर चर्चा करून शेतकरी हिताच्या दृष्टीने मार्ग काढला जाईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत सांगितले.



सदस्य एकनाथ खडसे यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. सदस्य डॉ. परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर, श्रीमती भावना गवळी आदींनी या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सहभाग घेतला. बावनकुळे म्हणाले, या मार्गातील पहिल्या टप्प्यातील भूसंपादन २०२२ मध्ये पूर्ण झाले असून, दुसऱ्या टप्प्याचे भूसंपादन २०२३ मध्ये झाले आहे. यामध्ये दरांमध्ये झालेल्या फरकावरही चर्चा करण्यात येईल.

ही भूसंपादन प्रक्रिया भूसंपादन कायदा २०१३ आणि राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ यानुसार केली जात आहे. भूसंपादन करताना शेतकऱ्यांच्या हिताचा विचार महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सध्या राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे अशा विविध प्रकल्पांसाठी भूसंपादन करताना विविध कायदे, नियम यांनुसार दर दिला जातो. त्यामुळे भूसंपादन करताना राज्य सरकारच्या भूसंपादन कायद्याचा अवलंब केला जावा आणि त्यानुसार योग्य तो म ोबदला शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी नवीन शासन निर्देश लवकरच जारी करण्यात येणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. तथापि राज्यात भूसंपादन करताना केंद्राचा 'लँड अक्विझिशन, रिहॅबिलीटेशन अँड रिसेटलमेंट ॲक्ट' (एलएआरआर) लागू करावा, या सूचनेबाबत बैठकीत चर्चा करून मार्ग काढू, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

बैठकीत सर्वसमावेशक चर्चा केली जाईल. त्यावेळी शेतकऱ्यांच्या भूसंपादनाचे निवाडे लाभदायक नसल्याचे आढळल्यास ते रद्द करू, असेही त्यांनी सांगितले.

# पानिपत मराठ्यांच्या शौर्याचेच प्रतीक

**मुंबई** : पानिपतच्या युद्धात अहमदशाह अब्दालीची मराठ्यांनी दाणादाण उडविली होती. तो भीतीपोटी यमुनेपार लपून बसला. मराठ्यांच्या भीतीने तो आपल्या देशात परत गेला आणि पुन्हा भारतावर वाकडी नजर टाकण्याची हिंमत केली नाही. उलट मराठ्यांना पत्र पाठवून संधीसाठी हात पुढे केला. पण, मराठ्यांनी त्याचा प्रस्ताव धुडकारला. त्यामुळे पानिपतची लढाई मराठे हरले नाही तर, विजयीच झाले, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी जितेंद्र आव्हाडांना सुनावले.

मुख्यमंत्र्यांनी विरोधकांच्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर दिल्यानंतर राईट टू रिप्लाय या आयुधाच्या माध्यमातून शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी काही विषय उपस्थित केले. त्यात पानिपत येथे सरकार शौर्याचे स्मारक उभारत आहे. मात्र, पानिपतमध्ये मराठे हरले होते. आपण दारुण पराभवाला पानिपत झाले, असे संबोधतो. अशा पानिपत या वाक्याचा अर्थ झाला आहे. त्यामुळे हरण्याचे स्मारक उभारणे हे योग्य नसल्याची भूमिका मांडली. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीसांनी पीनपतच्या युद्धातील मराठ्यांच्या शौर्याचे दाखले देत, आव्हाडांना चांगलेच फटकारले. या युद्धानंतर हरयाणात राहिलेला मराठा समाज आज रोड मराठा म्हणून ओळखला जातो.

# सालियन प्रकरण वेगळ्याच दिशेने?

**मुंबई, २५ मार्च**

दिशा सालियन मृत्यू प्रकरण वेगळेच वळण घेण्याची शक्यता वर्तविली जात असून, सतीश सालियन यांचे वकील निलेश ओझा यांनी मंगळवारी उद्धव आणि आदित्य ठाकरे यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत. याप्रकरणी दिशाचे वडील सतीश यांनी वकील ओझा यांच्यासह मुंबई पोलिस आयुक्तालयात जावून वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेतली. दिशा सालियनचा मृत्यू अपघात नसून, तिच्यावर अत्याचार करून खून केल्याचा आरोप करीत वडील सतीश यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. पोलिस अधिकाऱ्यांशी भेट घेतल्यानंतर निलेश ओझा यांनी पत्रकारांशी संवाद साधताना ठाकरे पिता-पुत्रासह अभिनेता सूरज पांचोली, दिनो मोरिया आणि

माजी पोलिस अधिकारी परमबीरसिंह यांच्यावरही आरोप केले. नार्कोटिक्स ब्यूरोच्या तपासात आदित्य ठाकरे मादक द्रव्याच्या व्यवसायात सहभागी असल्याचे म्हटले आहे. यासंदर्भातील सर्व माहिती अर्जात दिली आहे.

# तत्कालीन युवराजांमुळे तुटली युती : मुख्यमंत्री फडणवीस

## कौरवांसारखे बसले होते अडून

**◆ मुंबई, २५ मार्च**





२०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान शिवसेनेच्या तत्कालीन युवराजांच्या हट्टामुळे शिवसेना-भाजपा युती तुटली. शिवसेनेचे युवराज १५१ जागांवर अडून बसल्याने नाईलाज झाला आणि दोन्ही पक्ष वेगवेगळे लढले, असे घणाघात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथूर यांच्या सन्मानार्थ मुंबईत आयोजित कार्यक्रमात फडणवीस बोलत होते. शिवसेनेने १४७ जागा लढवाव्या, तर भाजपा १२७ जागांवर उमेदवार उभे करेल. उर्वरित जागा मित्र पक्षांसाठी सोडण्याचे ठरविले होते. पण, शिवसेनेच्या युवराजांनी १५१ जागा लढविण्याचे जाहीर करून टाकले. आम्ही समजाविण्याचा प्रयत्न केला, पण ते कौरवासारखे पाच गावांवर अडून बसले होते. याबाबत आम्ही दिल्लीतील पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसोबत चर्चा केली. त्यांनीही शिवसेनेची भूमिका योग्य नसल्याचे म्हटले. पण, नियतीच्या मनात मी मुख्यमंत्री व्हावा, असे असावे. वरिष्ठांच्या सांगण्यावरून शिवसेनेसोबतची युती तुटली, असे फडणवीस यांनी सांगितले. एवढेच नव्हे तर, शिवसेनेचा मुख्यमंत्री आणि भाजपाचा उपमुख्यमंत्री, असेही आम्ही बोललो होतो. एकत्र लढलो असतो तर दोघांच्या २०० पेक्षा जास्त जागा निवडून येतील, असे आम्हाला वाटत होते, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. (वृत्तसंस्था)

### दिल्लीतील वरिष्ठांमुळे तुटली युती : राऊत

वास्तविक पाहता देवेंद्र फडणवीस सेना-भाजपा युती कायम राहावी, या मताचे होते. त्यांची भूमिका सकारात्मकच होती. पण, दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांकडून आलेल्या कार्यक्रमानुसार युती तुटली, असे प्रत्युत्तर उबाठा गटाचे राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी दिले. युती तोडण्याच्या उद्देशानेच दिल्लीहून भाजपा नेते मुंबईत आले होते. बाळासाहेब ठाकरे हयात नसल्याने शिवसेना संपविण्याचे त्यांचे धोरण होते. आता २०१४ ते २०२५ या काळात बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले आहे. फडणवीस यांनी २०१९ बाबतही बोलायला हवे होते, असे राऊत म्हणाले. ■

# बंदिस्त नलिका वितरणमुळे बचत होणारे पाणी चासकमानसाठी उपयुक्त

## मंत्री विखे-पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५मार्च**

चासकमान प्रकल्पाच्या मंजुर बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणे कामाचे संकल्पन, सरेखा व अंदाजपत्रक इत्यादीचे काम प्रगतीपथावर आहे. संकल्पनाअंती आराखड्यास मंजुरीनंतर बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमुळे पाणी बचत होईल आणि हे अतिरिक्त पाणी चासकमानसाठी उपयोगी ठरेल, असा विश्वास जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधान परिषदेत व्यक्त केला.



सदस्य प्रवीण दरेकर यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. जलसंपदा मंत्री विखे-पाटील म्हणाले, चासकमानसाठी कलमोडी धरणातून १.०७ टीएमसी पाणी आरक्षित आहे. लोकसंख्येच्या वाढीमुळे आणि औद्योगिक क्षेत्राच्या विस्तारामुळे पाण्याची मागणी वाढत आहे. कलमोडी मध्यम प्रकल्पाच्या फेर जल नियोजन प्रस्ताव महामंडळाकडून शासनास प्राप्त झाला असून प्रस्तावाची छाननी प्रक्रिया सुरू आहे. नवीन प्रकल्पाच्या अंमलबजावणीसह, जुन्या पाणीवितरण व्यवस्थेत सुधारणा करून, उपलब्ध पाण्याचा अधिक चांगला उपयोग करता येईल. अतिरिक्त पाणी उपलब्ध होईल आणि भविष्यातील वाढती मागणी पूर्ण करता येईल, असेही विखे-पाटील यांनी सांगितले

# सीबीएसई अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती सुरू

**मुंबई, २५ मार्च -**

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० नुसार राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचा (एनसीईआरटी) अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची (सीबीएसई) परिक्षा पद्धत स्वीकारण्यासाठी पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचे कार्य सुरू आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत निवेदनातून दिली. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याच्या आधारे राज्याचे स्वतःचे अभ्यासक्रम आराखडे बनवण्यात आले आहेत. यात राज्यासाठी सकारात्मक विद्यार्थी हिताचे आवश्यक ते बदल करण्यात आले. महाराष्ट्र राज्य मंडळाची पाठ्यपुस्तके बालभारतीमार्फत बनविताना राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने बनवलेली पाठ्यपुस्तके बालभारती तज्ज्ञ समितीमार्फत अभ्यासून राज्यासाठी स्वतःची पाठ्यपुस्तके आवश्यक ते सर्व बदल करून बनविण्यात येत असल्याचे भुसे यांनी निवेदनात म्हटले आहे. या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात अपेक्षित कौशल्य विद्यार्थ्यां ध्ये येण्यासाठी घोकंपट्टीवर आधारित परीक्षा पद्धती न ठेवता केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) परीक्षा पद्धतीप्रमाणे सर्वंकष प्रकारचे मूल्यमापन महाराष्ट्र राज्य मंडळाच्या पद्धतीत आणून आणि त्यातही आवश्यक ते बदल करून त्याची अंलबजावणी करण्यात येईल. तज्ज्ञ समित्यांच्या मदतीने राज्यातील शैक्षणिक पृष्ठभूी व राज्याच्या गरजा विचारात घेऊन राज्य अभ्यासक्रम आराखड्यांची निर्मिती करण्यात आली आहे तसेच पायाभूत स्तर अभ्यासक्रम, पाठ्यक्रम निर्मिती करण्यात आली. यासंदर्भातील सर्व मसुदे एनसीईआरटीच्या संकेतस्थळावर ठेवून जनतेच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्या व त्यानुसार दोन्ही आराखडा मसुदे अंतिम करण्यात आले व त्यास राज्यस्तरीय सुकाणू समितीची मान्यता मिळाली असल्याचेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

### अभ्यासक्रम, पाठ्यक्रम निर्मिती

तज्ज्ञ समित्यांच्या मदतीने पायाभूत स्तरासाठी (बालवाटिका १,२,३ आणि पहिली व दुसरी) अभ्यासक्रम, पाठ्यक्रम निर्मिती करण्यात आली व अंतिम आराखड्यास राज्यस्तरीय सुकाणू समितीची मान्यता मिळाली आहे. नवीन पाठ्यक्रमानुसार बालभारतीमार्फत इयत्ता पहिली पाठ्यपुस्तक निर्मिती कामकाज सुरू आहे.

# न्या. वर्मा आम्हाला नको, वकील बेुदत संपावर

**प्रयागराज, २५ मार्च**

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांची उच्च न्यायालयात बदली करण्याच्या प्रस्तावित विरोधात अलाहबाद उच्च न्यायालय बार असोसिएशनने मंगळवारी अनिश्चित काळासाठी संप सुरू केला. हा निषेध कोणत्याही न्यायालयाविरुद्ध किंवा न्यायाधीशांविरुद्ध नाही तर न्यायव्यवस्थेशी विश्वासघात करणाऱ्यांविरुद्ध आहे, असे उच्च न्यायालयाच्या गेट क्रमांक ३ वर जमलेल्या निदर्शक वकिलांचे नेतृत्व करताना बार असोसिएशनचे अध्यक्ष अनिल तिवारी यांनी सांगितले. आमचा लढा भ्रष्टाचारात सहभागी असलेल्यांविरुद्ध आणि पारदर्शकतेचा अभाव असलेल्या व्यवस्थेविरुद्ध आहे. सध्या आमची मागणी म्हणजे बदली आदेशाचा पुनर्विचार आणि मागे घेणे, ही आहे. सोवारी बार असोसिएशनने न्या. वर्मा यांच्या बदलीला आपला विरोध पुन्हा व्यक्त केला आणि मंगळवारपासून अनिश्चित काळासाठी संपावर जाण्याचा निर्णय घेतला, असे त्यांनी सांगितले. या मुद्यावर असोसिएशन सर्वंकष लढाईसाठी तयार आहे, असे तिवारी यांनी सांगितले. सुरुवातीपासूनच हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत आहे.

# मुंबई पोलिसांच्या मदतीने आयपीएल क्रिकेट स्पर्धेत बेटींग?

**● अंबादास दानवेंचा आरोप; बेटींगच्या संभाषणाचा पेनड्राइव्ह सभापतींकडे सादर**

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२५ मार्च-**

मुंबई पोलीस विभागातील मोठ्या अधिकाऱ्यांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात बेटिंग सुरू असल्याचा गंभीर आरोप विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मंगळवारी सभागृहात केला. मेहुल जैन, कमलेश जैन आणि हिरेन जैन या व्यक्तींचा त्यामध्ये समावेश असून त्यांच्याकडून पाकिस्तानी खेळाडूंचा यासाठी वापर केला जात असल्याचा आरोप करीत त्या कथित संभाषणाचा पेनड्राइव्ह सभापतींकडे सादर केला.

अंतिम आठवडावरील प्रस्तावावरील भाषणात दानवे म्हणाले की, बेटिंग करणाऱ्यांमध्ये गंभीर आरोपही विरोधी पक्षनेत्यांनी केला आहे. नुकत्याच पार पडलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये 'लोटस २४' नावाच्या ॲपच्या माध्यमातून बेटिंग केल्यानंतर आता या सर्व व्यक्ती मुंबईत आयपीएलसाठी आल्या आहेत. याचा त्वरित सखोल चौकशी होण्याची गरज आहे. राज्याच्या परिवहन, सिडको, महसूल, आरोग्य विभागातील घोटाळे, मंत्र्यावर असलेले भ्रष्टाचाराचे आरोप, अधिकाऱ्यांचे घोटाळे सादर



करत विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारचे वाभाढे काढले. राज्याने गेल्या दोन वर्षांपासून क्राईम इन महाराष्ट्र अहवाल प्रसिध्द केला नाही. राज्यात ५६४ विविध गुन्हे दाखल झाले असून दंगलीच्या घटना घडल्या आहेत. नागपुर, पुणे,संभाजीनगरमध्ये बलात्कराच्या घटनांचा आलेख वाढला असून दररोज २२ बलात्कार, ४५ विनयभंगाच्या घटना घडत आहेत. कायद्याचा धाक नसल्यामुळे या सर्व घटना घडत असल्याचे सांगून ते म्हणाले,कारागृहाची बंदीची क्षमता २७ हजार ११४ बंदी असताना ४३ हजार बंदी कोंबून ठेवले आहेत. राज्यात ५१ हजार कोटी रुपयांची फसवणूकीच्या घटना घडल्या आहेत. राज्यात गुन्हयांच व सायबर गुन्ह्याच प्रमाण वाढल असून ते रोखण्यासाठी सायबर सेल प्रभावी होण्याची आवश्यकता आहे.

अभिनेता सैफ अली खान यांच्या घरात घुसून चोरी करून त्याला मारण्याचा प्रयत्न झाला. बीड मस्साजोग सरपंच हत्येतील आरोपी अद्याप पकडला जात नाही. सोमनाथ सुर्यवंशी याचा मृत्यू मानव आयोगाच्या अहवालात पोलिसांनी केलेल्या मारहाणीत झाल्याचे स्पष्ट झाले. माजी मंत्र्यांचा परदेशात चाललेल्या मुलाच विमान वळवले जाते परंतु सूर्यवंशीला मारहाण करणाऱ्या लोकांवर सरकार कारवाई करू शकत नाही.केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची छेडछाड काढली जात असेल तर सर्वसामान्य मुलीची काय स्थिती असेल? असा सवालही दानवे यांनी उपस्थित केला. जालनामधील भोकरदन येथे बोऱ्हाडे नावाच्या व्यक्तीला चटके दिले, त्या घटनेत नवनाथ दौंड या तालुकाप्रमुखांवर खोटा गुन्हा दाखल केला गेला. अहमदाबादमधील सुधीर कोठडिया नावाच्या व्यक्तीने २ हजार कोटी रुपये डिजिटल पध्दतीने जमवून हवाला मार्फत ते विदेशात पाठवले. यातील गुंतवणूकदारांची फसवणूक केली, याबाबत पराग अशोककुमार शहा यांनी तक्रार केली. मात्र याबाबत पुणे कि नारायण गावात गुन्हा दाखल व्हायला होता मात्र ठाण्यात पोलीस उपायुक्तांच्या सांगण्यावरून पोलीस आयुक्त गुन्हा दाखल करतात. याप्रकरणाची चौकशी करण्याची मागणी दानवे यांनी केली. सिडको योजनेतील खरपुडीची २४७ हेक्टर क्षेत्र जमीन शेतकऱ्यांकडून सतीश अग्रवाल, कृष्णकुमार गोयल, राधेश्याम, चिप्पा रखमाजी आदींनी विकत घेतली. १८ जून २००८ ला हे प्रदूषित क्षेत्र म्हणून घोषित केले त्यानंतर आर्थिक साहाय्यता नसल्यामुळे हा प्रकल्प रद्द केला होता. यात सिडकोचे उपाध्यक्ष विजय सिंघल यांनी डी एसके लीगल सर्व्हिसेसची अवैध नेमणूक करून देयके दिल्याचा आरोप करत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी चौकशीची मागणी केली. मंत्री संजय राठोड यांचे खासगी सचिव विशाल राठोड यांनी स्वतःच्या सहीने गोबंजारा ट्रस्टची जागा मंत्र्याच्या नावे करून घेतली. उल्हास नगर महानगरपालिकेत युडीच उल्लंघन करून टीडीआर घोटाळा झाला आहे. यात ललित खोब्रागडे नावाच्या अधिकाऱ्याने युडीसिपीआर उल्लंघन केल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. अंधेरी, के पश्चिम विभागातील चक्रपाणी नावाचे उपायुक्तांच्या वरदहस्ताने अवैध बांधकाम सुरु आहे.

## अग्रलेख...

# कुणाल कामराच्या निमित्ताने...

साधारणतः पाच वर्षांपूर्वीची घटना. अर्णब गोस्वामी नामक प्रख्यात पत्रकार इंडिगोच्या विमानाने प्रवास करीत होते. स्वतःला क्रांतिकारी समजणारे एक आगाऊ व्यक्तिमत्त्व याच विमानात होते. अर्णब गोस्वामी यांच्या पत्रकारितेच्या शैलीबद्दल वाद आहेतच आणि त्यांच्याकडे त्या शैलीच्या समर्थनार्थ मुद्देही आहेत. या विषयाच्या संदर्भात वाद करायचा तर एखाद्याने अर्णब गोस्वामींची रीतसर वेळ घ्यावी आणि मग बोलावे. अशा वादाची जागा विमान ही असू शकत नाही. पण, त्या आगाऊ व्यक्तिमत्त्वास या बाबीचे भान नव्हते. त्यामुळे त्याने आगाऊपणा केलाच. अर्णब गोस्वामीच्या विमानात असलेली व्यक्ती अत्यंत आगाऊ होती. त्या व्यक्तीने अर्णबला तिथल्या तिथे 'हिंमत असेल तर रोहित वेमुला आणि अन्य विषयांवरील तुझ्या कव्हरेजबद्दल माझ्याशी वाद कर', असे आव्हान दिले. अर्णब गोस्वामीने त्यावर फार प्रतिक्रिया दिली नाही. ही आगाऊ व्यक्ती इथेच थांबली नाही तर तिने या घटनेची दीड-दोन मिनिटांची चित्रफीत ट्विटरवर टाकून आपल्या पराक्रमाची माहिती जगाला दिली. एका अर्थाने मी अर्णब गोस्वामीची कशी जिरवली, हेच तो सांगत होता. इंडिगो एअरलाईन्सने त्या व्यक्तीच्या विमान प्रवासावर बंदी घालत असल्याचे लगेच दुसऱ्या दिवशी जाहीर केले. त्यानंतर आणखी काही एअरलाईन्सनीही तेच केले. पण, इतक्यावर थांबतो तो विक्रमवीर कसला! त्याने चक्क इंडिगो एअरलाईन्सला कायदेशीर नोटीस दिली आणि पंचवीस लाख रुपयांची भरपाई मागितली. या विक्रमवीराचे नाव आहे कुणाल कामरा! गेली पंधरा-वीस वर्षे तो स्टॅण्ड अप कॉमेडियन म्हणून कार्यक्रम करीत असतो. वादग्रस्त मुद्दे उकरून काढणे आणि वाद घालणे यांत त्याची कारकीर्द विक्रमीच म्हणता येईल एवढे या माणसाबद्दल लिहिण्याजोगे आहे.

अलिकडेच कुणाल कामराने असाच एक कार्यक्रम केला. त्यात त्याने इतर राजकीय नेत्यांसह विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल काही आक्षेपार्ह शब्दांचा समावेश असलेले विडंबनगीत सादर केले. त्यावर प्रतिक्रिया आली आणि शिंदे सेनेच्या शिवसैनिकांनी या कार्यक्रमाचे जेथे चित्रीकरण झाले होते, त्या स्टुडिओची तोडफोड केली. आता हा कामरा माफी मागायला तयार नाही. तो म्हणतो की, घटनेने मला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिलेले आहे. काही उठवळांना, विशेषतः पुरोगामित्वाची झूल पांघरलेल्या काही लोकांना अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा फार लळा आहे. पण, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, हे राज्य घटनेनेच सांगितलेले आहे, हे त्यांना कळत नाही. भारतीय राज्यघटनेच्या १९ (१) (अ) कलमात भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य नागरिकांना बहाल केले गेले आहे. भाषणातून, लेखनातून, कलेच्या माध्यमातून किंवा अन्य माध्यमांतून आपले म्हणणे मांडणे किंवा अभिव्यक्ती करण्याचे स्वातंत्र्य भारतीय राज्यघटना भारतीय नागरिकांना देते. ही अत्यंत महत्त्वाची तरतूद आहे. भारतीय लोकशाहीची ती गरजही आहे. मात्र, याच राज्यघटनेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादाही दिलेल्या आहेत, हे ही मंडळी लक्षात घेत नाहीत. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हा अमर्याद अधिकार नाही. त्याला देशाचे संरक्षण व सार्वभौमत्व, परराष्ट्रांशी असलेले मैत्रीपूर्ण संबंध, सार्वजनिक व्यवस्था, नैतिकता-सभ्यता, बदनामी अशा अनेक आयामांच्या मर्यादा आहेत. अर्थात, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य या मुद्यांच्या मर्यादेत राहूनच उपभोगता येते. हे स्वातंत्र्य कुणाच्या बदनामीचे किंवा कायदा-सुव्यवस्था बिघडवण्याचा अधिकार बहाल करणारे नाही. कुणाल कामराची अभिव्यक्ती त्याच्या दृष्टीने निरुपद्रवी असेल किंवा कलात्मकही असेल. परंतु, त्यामुळे शिवसैनिकांच्या भावना भडकल्या हे खरे. त्याची अभिव्यक्ती हे जर शिवसैनिकांच्या भावना भडकण्यास कारण ठरले असेल तर त्यावर आक्षेप घेतला गेला पाहिजे. स्टुडिओची तोडफोड करणे हा त्यावरचा मार्ग असू शकत नाही. पण, तेही घडले. भावनेच्या भरात घडले असावे. दुसरीकडे कुणाल कामराला आपण जे बोललो, त्याबद्दल खेद-खंत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, कुणाल कामराने व्यंग्य जरूर करावे. आम्हीही दाद देऊ. पण, कुणाची तरी सुपारी घेऊन बदनामी केली जात असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही. मुख्यमंत्र्यांची भूमिका अगदी बरोबर आहे. संविधानाची प्रत हातात घेतल्याने आपल्याला त्यातील तरतुदींचे अमर्याद संरक्षण मिळू शकत नाही, हे कुणाल कामराने समजून घेतले पाहिजे. कुणाल कामराचे काही समर्थक म्हणतात की त्याने जनभावना व्यक्त केल्या. काही वाचाळवीर असेही म्हणतात की, तो जे बोलला ते बरोबर व सत्य आहे. या समर्थनाला पुन्हा राजकीय आयाम आहेत. एकेकाळी आपल्यावर टीका करणाऱ्या पत्रकार-संपादकांवर हल्ला करणाऱ्या पक्षाचे लोक कुणाल कामराचे समर्थन करतात तेव्हा नवल वाटल्यावाचून राहत नाही. टीकाटिप्पणी हा लोकशाहीचा भाग असली तरी ती सभ्य भाषेतच व्हायला हवी. एकीकडे आपण म्हणत असतो की, राजकारणातल्या लोकांनी सभ्यपणा सोडला आहे आणि त्याच वेळी सभ्यपणा खुंटीवर टांगून दुगाण्या झाडणाऱ्याचे कलावंत म्हणून किंवा विचारवंत म्हणून समर्थन करतो. असे कसे चालेल? कुणाल कामरा किंवा अन्य कुणीही अशा प्रकारचे कृत्य केले असेल आणि तरीही त्याला बरोबर ठरविले जात असेल तर हे दुधारी शस्त्र कुणावरही उलटू शकते, हेही सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य ही अतिशय निसरडी संकल्पना आहे. एखाद्याने त्याचा योग्य वापर केला की गैरवापर केला, हे ठरवणे सोपे नाही. बहुतेकदा ते जेवढे त्या व्यक्तीच्या परिपक्वतेवर ठरत असते, तसे ते समाजातील तत्कालीन परिस्थितीवरही ठरत असते. जातीय दंगल झालेल्या भागात इवलासा जातिवाचक उल्लेख देखील आक्षेपार्ह ठरतो. याउलट समाज शांत असेल तेव्हा अशा प्रकारचा उल्लेख विचार करण्यास भाग पाडणाराही ठरू शकतो. त्यामुळे आपण कुणाबद्दल बोलतो आहोत, काय बोलतो आहोत, यासह सध्याचे वातावरण कसे आहे, यावरही अभिव्यक्ती करणाऱ्याने विचार करायचा असतो. भावना भडकवणे किंवा हिंसाचार घडेल अशी चिथावणीखोर वक्तव्ये करणे ही अभिव्यक्ती असू शकत नाही. अभिव्यक्ती हा शब्दच मुळात सुसंस्कृततेचे प्रतीक आहे. तो जसा मत मांडण्याच्या व मांडणाऱ्याच्या अधिकाराचा सन्मान करतो, तसा तो ज्याच्या संदर्भात मत मांडले जात आहे, त्याच्याही अधिकाराचा आदर करतो. कोणत्याही सभ्य समाजात अशाप्रकारचा कोणताही मूलभूत अधिकार अमर्याद असू शकत नाही. तसा तो भारतीय राज्यघटनेतही नाही, हे नवल नव्हे. उलट ते भूषणावह आहे. एकनाथ शिंदे व त्यांची शिवसेना यांना महाराष्ट्रातील जनतेने मतदान केले. त्यांचे आमदार-खासदार निवडून आले. मतदानाला देखील अभिव्यक्तीएवढेच महत्त्व आहे, पावित्र्य आहे. मतदान हा सामूहिक विवेकाचा आविष्कार आहे, असे आपण मानतो. अभिव्यक्ती ही व्यक्ती वा विशिष्ट समूहापर्यंत मर्यादित असते. तरीही तिचे महत्त्व आपण मानतो. मात्र, व्यापक अर्थाने लक्षात घेतले तर मतदानाच्या प्रक्रियेतून जो काही कौल निघेल, त्याचे महत्त्व अशा अभिव्यक्तीहून मोठे असते. निवडणूक, मतदान या प्रक्रियांमधील दोषांवर बोट जरूर ठेवता येते. परंतु, त्यांचे महत्त्व आणि पावित्र्य नाकारता येत नाही. कुणाल कामराने एकनाथ शिंदे यांच्याबद्दल अश्लाघ्य शब्द वापरून चूक केली आहे. त्याच्या वक्तव्यामुळेच शिवसैनिक भडकले. आता मागणे एवढेच की, त्याच्यावर जी कारवाई व्हायची, ती कायद्यानुसारच व्हायला हवी. त्याची प्रक्रिया गुन्हा नोंदवण्यापासून सुरू झालेली आहे. त्याच्या स्टुडिओची, घराची किंवा अन्य कुठलीही तोडफोड करणे किंवा त्याला मारहाण करणे हा मार्ग राज्यघटनेतील तरतुदीनुसार वैध ठरत नाही. आपण एखाद्याला कायद्यातील किंवा राज्यघटनेतील मर्यादांची आठवण करून देत असू तर आपल्या भावना भडकल्या म्हणून आपण अमर्याद वागलो, असे म्हणणे सयुक्तिक ठरणार नाही. अशा घटनांची पुनरुक्ती टाळली पाहिजेच. पण, त्यासाठीचे मार्ग विधायकच असले पाहिजेत. ▮

## चिंतन

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

# लहान शेतकऱ्यांची कर्जमाफी : अडचण आणि उपाय!

कृषिप्रधान भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा शेती असला, तरी शेतकरी, विशेषतः लहान शेतकरी आज मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, कीड-रोगांचा प्रादुर्भाव, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांचे कर्ज वाढत आहे. परिणामी कर्जबाजारीपण आणि आत्महत्यांचे प्रमाण वाढताना दिसते. भारतातील अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांसाठी कर्ज ही मोठी समस्या बनली आहे. विशेषतः लहान शेतकरी आर्थिक अडचणींमुळे अडचणीत येतात. शेतीला अनुकूल हवामान, योग्य बाजारभाव आणि शासकीय मदत न मिळाल्यास त्यांना मोठ्या संकटाला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत कर्जमाफी हा एक चिंतनाचा विषय बनतो. भारतीय शेती मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, गारपीट, पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्ती शेतीच्या उत्पादनावर परिणाम करतात. याशिवाय बियाणे, खते, औषधे, यंत्रसामग्री आणि मजुरी यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. बहुतांश लहान शेतकरी हे आपल्या अल्प उत्पन्नावर अवलंबून असतात. त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर बचत नसते. त्यामुळे शेतीसाठी भांडवल उभे करण्यासाठी त्यांना सावकार, बँका किंवा पतसंस्थांकडून कर्ज घ्यावे लागते. मात्र, उत्पन्न कमी झाल्यास कर्जफेड करणे कठीण होते. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. लहान शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

**शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या समस्या**

**१. हवामानाच्या अस्थिरतेमुळे नुकसान :** अनेक वेळा अवकाळी पाऊस, गारपीट किंवा दुष्काळ यामुळे पिके वाया जातात. शेतकऱ्याचे मोठे नुकसान होते आणि त्याच्यावर कर्जाचा बोजा वाढतो.

**२. बाजारातील अनिश्चितता आणि दलाल :** शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. दलाल आणि व्यापारी यांच्याकडून शेतकऱ्यांना कमी दर दिला जातो, त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते.

**३. महागडी शेतीसामुग्री :** बियाणे, खते, कीटकनाशके आणि आधुनिक तंत्रज्ञान महागडे आहे. यामुळे शेतीचा खर्च वाढतो आणि कर्ज काढण्याशिवाय पर्याय उरत नाही.

**४. सावकार आणि खाजगी कर्जांचा बोजा :** अनेक लहान शेतकरी बँकांपेक्षा खाजगी सावकारांकडून कर्ज घेतात. सावकार मोठ्या प्रमाणात व्याज आकारतात, ज्यामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण उत्पन्न कर्जाच्या फेडीतच संपते.

**५. शेतीसाठी मिळणाऱ्या अनुदानातील भ्रष्टाचार :** शासकीय योजनांतर्गत अनुदाने मिळत असली, तरी खरी गरज असलेल्या शेतकऱ्यांपर्यंत ती पोहोचत नाहीत. यामध्ये अनेक स्तरांवर भ्रष्टाचार होत असल्यामुळे लहान शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. शेतकऱ्यांची कर्जमाफी हा केवळ तात्पुरता उपाय असला, तरी तो गरजेचा आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतो. कर्जमाफीमुळे त्याला पुन्हा नव्याने शेती करण्याची संधी मिळू शकते.

**कर्जमाफीच्या महत्त्वाच्या बाबी**

१. शेतकऱ्यांना तात्पुरता आर्थिक दिलासा मिळतो. २. आत्महत्यांचे प्रमाण कमी होते. ३. शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढते, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारते. ४. नवीन पद्धतीने शेती करण्याची संधी मिळते. कर्जमाफी हा तात्पुरता उपाय आहे, पण शेतकऱ्यांची कायमस्वरूपी आर्थिक सुधारणा होण्यासाठी काही ठोस उपाय करणे आवश्यक आहे.

**१. शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा :** शेतीमालाला सरकारने हमीभाव द्यावा आणि त्यासाठी प्रभावी खरेदी व्यवस्था तयार करावी.

**२. सिंचन व्यवस्था सुधारावी :** लहान शेतकऱ्यांसाठी ठिबक सिंचन आणि जलसंधारणाच्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात.

**३. स्वस्त दरात शेतीसामुग्री उपलब्ध करावी :** खते, बियाणे, कीटकनाशकांच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत.

**४. सरळ बँकांमधून कर्ज मिळावे :** शेतकऱ्यांना थेट राष्ट्रीयीकृत बँकांमधून कमी व्याजदरात कर्ज मिळावे; जेणेकरून खाजगी सावकारांवर अवलंबून राहावे लागणार नाही.

**५. शेतमाल प्रक्रिया उद्योगाला चालना द्यावी :** शेतीमालावर आधारित उद्योग उभारल्यास शेतकऱ्यांना शेतीला जोडधंदा म्हणून स्थिर उत्पन्नाचा स्रोत मिळू शकतो.

**६. कृषी सल्ला आणि प्रशिक्षण उपलब्ध करावे :** शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सेंद्रिय शेती आणि कमी खर्चात जास्त उत्पादन यासाठी प्रशिक्षण द्यावे.

कर्जमाफीबरोबरच शेतीच्या मूलभूत समस्या सोडवल्या तरच शेतकऱ्यांना कर्जाच्या फेऱ्यातून बाहेर काढता येईल. अन्यथा, कर्जमुक्तीचे हे स्वप्न फक्त घोषणांपुरतेच मर्यादित राहील. शेती वाचवायची असेल, तर केवळ कर्जमाफी नव्हे, तर शाश्वत शेतीसाठी ठोस पावले उचलायला हवीत. लहान शेतकऱ्यांचे कर्जमाफ करणे ही तात्पुरती मदत असली, तरी दीर्घकालीन उपाययोजना केल्याशिवाय समस्या कायमस्वरूपी सुटणार नाही. सरकारने शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदतीसोबतच आधुनिक तंत्रज्ञान, जलसंधारण आणि बाजारपेठ सुधारणांवर लक्ष केंद्रित करायला हवे. 'जय जवान, जय किसान' ही घोषणा फक्त घोषणाच राहू नये, तर प्रत्यक्षात शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना राबवायला हव्यात. लहान शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण आणि आत्महत्यांचे वाढते प्रमाण हे राष्ट्रीय आपत्तीचे लक्षण आहे. केवळ कर्जमाफी नव्हे, तर दीर्घकालीन आणि स्थायी उपाययोजना राबवूनच या समस्येचे निराकरण होऊ शकते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार, समाज आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्र येऊन ठोस पावले उचलणे काळाची गरज आहे.

'शेती वाचवा, शेतकरी वाचवा!' ▮

९९८७७४६७७६


## वेध

**गिरीश शेरेकर**

# नॅरोगेज शकुंतला ब्रॉडगेज व्हावी!

पश्चिम विदर्भातल्या वऱ्हाडची त्याकाळी जीवनरेखा ठरलेली शकुंतला रेल्वे २५ डिसेंबर १९०३ रोजी सुरू झाली होती. यवतमाळ ते मूर्तिजापूर आणि मूर्तिजापूर ते अचलपूर अशा दोन टप्प्यांत ही रेल्वे धावायची. वऱ्हाडात मुबलक पिकणारा कापूस मुंबईत आणि तेथून मँचेस्टरच्या सूतगिरण्यांना पुरविण्यासाठी या रेल्वे लाईनची इंग्रजांनी उभारणी केली होती. त्यांनी त्यांच्या फायद्यासाठी ही लाईन उभारली तरी त्याचा स्थानिकांना सुद्धा चांगला फायदा झाला. रोजगाराची साधने वाढली होती. अतिशय कमी तिकिटात खेड्यापाड्यातील नागरिकांचा सुखकर प्रवास होत असल्याने शकुंतला सर्वांची पहिली पसंती होती. विसाव्या शतकाच्या प्रारंभी वऱ्हाडात वाहतुकीची कुठलीही साधने नव्हती, त्या काळात येथील छोट्या-मोठ्या गावांना बाहेरच्या जगाशी जोडणारी शकुंतला रेल्वे ही एकमेव होती. ब्रिटिश काळात या रेल्वेचा प्रवास सहज झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काहीकाळ या रेल्वेचे वैभव अबाधित राहिले. पुढे प्रवासाची साधने वाढली आणि बदलत्या काळानुसार शकुंतलेच्या प्रगतीकडे दुर्लक्ष झाल्याने प्रवाशांनी सुद्धा पाठ फिरविली. थकतभागत २०१७ पर्यंत ही रेल्वे धावली. पण, हा रेल्वे मार्ग ब्रॉडगेज व्हावा यासाठी तत्कालीन खासदार सुदामकाका देशमुख यांच्या काळापासूनच मागणी होत आहे. पुढे अमरावती व यवतमाळच्या प्रत्येक खासदाराने प्रयत्न केले. यश मात्र कोणालाच आले नाही. विद्यमान खासदारांचे पण प्रयत्न सुरूच आहेत.

'जुने ते सोने' असे नेहमी म्हटले जाते. त्यानुसार शकुंतलेची गरज आता प्रकर्षाने जाणवू लागली आहे. तेव्हा नॅरोगेज असलेली ही रेल्वे आता ब्रॉडगेज करून सुरू करावी, अशी मागणी या भागातल्या जनतेकडून सातत्याने होत आहे. या मागणीत तथ्य आहे. तसे पाहिले तर यवतमाळ आता थोडे पण, अचलपूर रेल्वेच्या नकाशावर कुठेही नाही. या दोन्ही शहरांच्या विकासासाठी ते मारक ठरले आहे. हा मार्ग सुरू झाला तर वाहतुकीची एक चांगली सुविधा उपलब्ध होईल. रोजगार, उद्योग धंद्यासह विकासाला चालना मिळेल. येत्या काही वर्षांत अचलपूर वेगळा जिल्हा होणार आहे. पुसद हा वेगळा जिल्हा होणार असल्याने यवतमाळचा भार कमी होणार आहे. विकासाची उंच भरारी घेण्यासाठी रेल्वे मार्ग दोन्ही शहरांसाठी फारच उपयुक्त ठरणार आहे. हा भविष्याचा वेध घेऊनच यवतमाळात शकुंतला रेल्वे विकास समिती तर अचलपुरात शकुंतला रेल्वे बचाव समितीने ब्रॉडगेज मार्गासाठी लढा उभारला आहे. दोन्ही समित्यांची कार्यपद्धती वेगळी आहे. यवतमाळच्या समितीने तांत्रिक माहिती गोळा करून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी व रेल्वे अधिकाऱ्यांना निवेदने देऊन पाठपुरावा सुरूच ठेवला आहे. त्यात समितीचे समन्वयक अक्षय पांडे यांचे योगदान मोठे आहे. शकुंतला सुरू करण्याचा ध्यास या २७ वर्षीय युवकाने घेतला आहे. केंद्र व राज्य स्तरावर होणाऱ्या प्रत्येक घडामोडींवर त्याचे लक्ष असते. अचलपूरची समिती लोकशाही मार्गाने वेगवेगळ्या आंदोलनातून रेल्वे प्रशासन व लोकप्रतिनिधींचे, मंत्र्यांचे लक्ष शकुंतलेकडे वेधत आहे. त्यांनी पण गडकरी व फडणवीसांची भेट घेतली. आतापर्यंत त्यांची ३५ आंदोलने झालीत. दोन्ही लढ्यांचा सामूहिक परिणाम म्हणजे शकुंतलेच्या यवतमाळ - मूर्तिजापूर - अचलपूर या रेल्वे मार्गाचे सर्वेक्षणाचे काम हाती घेतले गेले. शंकुतला रेल्वेचा मार्ग ब्रॉडगेज करण्याला फार खर्च येणार नाही. कारण, या मार्गासाठी एक-दोन स्थानांवरचे अपवाद वगळता नव्याने भूसंपादन करण्याची गरज नाही. खर्च येणार आहे तो नवीन रेल्वे लाईन व स्थानके उभारणीचा! राज्य शासनाने २०२४ अर्थसंकल्पामध्ये सदर मार्गावर होणाऱ्या एकूण खर्चाच्या ५० टक्के निधी देण्याची तयारी दर्शविली आहे. यात फक्त किरकोळ का होईना एक अडचण आहे. ती म्हणजे, सेंट्रल प्रॉव्हिन्सेस रेल्वे कंपनीची! या कंपनीच्या तावडीतून शकुंतला रेल्वेची सुटका झाली. पण, कंपनीने आपला दावा सोडलेला नाही. २०२० मध्ये ही कंपनी मोबदल्यासाठी न्यायालयात गेली होती. लगेच त्यांनी ती याचिका मागे घेतली. सरकार या कपंनीचे समाधान करून तांत्रिक अडचण सहज दूर करू शकते. अंतिम टप्प्यात असलेला रेल्वे लाईनचा प्रकल्प अहवाल सादर होताच मान्यता मिळाली तर वेगाने या मार्गाचे काम सुरू होऊ शकते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मनावर घेतले तर रेल्वे मंत्र्यांना निर्णय घ्यायला काहीच वेळ लागणार नाही. ▮



९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# संघाची पंचसूत्री रामराज्याचा राजमार्ग!




राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष आहे. हे राष्ट्र परम् वैभवाला जावे आणि तेही 'याचि देही याचि डोळा' पाहावे, अशी अपेक्षा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प. पू. आद्यसरसंघचालक डॉ. हेडगेवारांनी व्यक्त केली होती. प्रत्येक स्वयंसेवकाची हीच इच्छा असते. या देशात रामराज्य आलेले डोळ्यांनी पाहावे, ही सर्वांचीच आर्त भावना. याचि देही म्हणजे हा देह जास्तीत जास्त १०० वर्ष आयुष्य असलेला असतो म्हणजे हे राष्ट्र परम् वैभवाला जाण्यासाठी शतक, दीड शतकाचा कालावधी संघाचे द्वितीय सरसंघचालक प. पू. श्रीगुरुजींनाही अपेक्षित आहे. आता संघाला १०० वर्ष पूर्ण होत आहेत. या १०० वर्षांत संघ सार्वभौम झाला, सर्वव्यापी झाला, सर्वस्पर्शी झाला आणि सर्वयामी झाला. संघविचार आचारासह घराघरांत आणि मनामनांत पोहोचला, हे सत्य आहे. कुंभमेळ्यात अर्धा भारत श्रद्धेने उपस्थित होता, हे संघविचाराचे फळ आहे. असे असले तरी संघाच्या शतक पूर्व वर्षीच्या विजयादशमी उत्सवात विद्यमान सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवतांनी पंचसूत्री का मांडली असावी? या पंचपरिवर्तनावर शताब्दीनिमित्ताने स्वयंसेवक समाजात का जाताहेत, हे प्रश्न साहजिकच आहेत.

ही पंचसूत्री, पंचपरिवर्तन, पंचोपचार, पंचपदी केवळ स्वयंसेवकांसाठी नसून भारतात राहणाऱ्या नव्हे विश्वातील सर्वांसाठी उपयोगी, महत्त्वाची आणि गरजेची आहे. भारतात तर संघ स्वयंसेवकांनी १०० वर्ष तनमनधनपूर्वक आणि निरपेक्ष कार्य केल्यामुळे 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' या विचाराला पोषक वातावरण झाले आहे. तयार झालेल्या शेतीत आता पेरणी बाकी आहे. विचाराचे दाणे टाकताच बहर येणार आहे. १०० वर्षांत हे राष्ट्र परम् वैभवाला जाण्यासाठीची मशागत पूर्ण झाली असून पंचसूत्री हे बीजारोपण आहे. यातूनच रामराज्याची ही मुहूर्तमेढ ठरणार म्हणून पंचपरिवर्तन महत्त्वाचे आहे.

**काय आहे पंचसूत्री?**

१) सामाजिक समरसता २) कुटुंब प्रबोधन ३) पर्यावरण संरक्षण ४) 'स्व'चा बोध अर्थात स्वदेशी ५) नागरी कर्तव्ये. ही ती पाच सूत्रे आहेत. बारकाईने विचार केल्यास हा रामराज्याचा जाहीरनामा आहे.

ज्या समाजात सर्वांना समान स्थान, समान संधी आणि सर्वांसाठी समभाव आहे तो समाज रामराज्यातच असू शकतो. १४ एप्रिल १९८३ ला गुढीपाडवा होता. या दिवशी प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संघसंस्थापक प. पू. डॉ. हेडगेवार या दोन्ही पुण्यात्म्यांची जयंती होती. या पवित्र दिवशी सामाजिक समरसता मंचाची स्थापना झाली. या प्रसंगी संघाचे प्रचारक आणि डॉ. आंबेडकरांचे स्नेही स्व. दत्तोपंत ठेंगडी यांचे बीजभाषण झाले. त्यात त्यांनी सामाजिक समरसता आणि समरस समाजाची संकल्पना स्पष्ट केली होती. तीच कडी पकडून विद्यमान सरसंघचालकांनी सामाजिक समरसतेला अग्रक्रम दिला. कारण १०० वर्ष संघ स्वयंसेवकांनी निःस्वार्थ आणि निरपेक्ष कष्ट करून पोषक वातावरण निर्माण केले आहे. सामाजिक समरसता समाजात बहुअंशी निर्माण झाली आहे. एक देवालय, एक पाणवठा, एक स्मशान, एक पंगत आता अपवाद वगळता बहुतेक गावात रुजले आहे. १९८९ मध्ये डॉ. हेडगेवार जन्मशताब्दीला संघाचा सेवा विभाग प्रारंभ झाला आणि श्रीगुरुजींच्या जन्मशताब्दीला २००६ मध्ये संघाचा सामाजिक सद्भाव विषय सुरू होऊन कार्य शेवटच्या माणसापर्यंत झिरपले आहे.

पंचपरिवर्तनात दुसरे स्थान कुटुंब प्रबोधनाला दिले आहे. भगवान श्रीरामांच्या कुटुंबाइतके आदर्श कुटुंब दुसरे असूच शकत नाही. भावा-भावाचे, जावा-जावाचे, पिता-पुत्राचे आणि पती-पत्नीचे आदर्श म्हणजे श्रीराम भगवंताचे कुटुंब आहे. कुटुंबव्यवस्था भारताचा प्राण आहे. एकत्रित कुटुंब पद्धत असल्यामुळे घर हे संस्कार केंद्र होते. घरातूनच चारित्र्यसंपन्न मनुष्य निर्माण कार्य सहज व्हायचे. देव, देश आणि धर्माचे संस्कार आजी-आजोबा, काका-काकू, आई-बाबा यांच्या आचारविचारांतून होत असत. कालमानाप्रमाणे संयुक्त कुटुंब पद्धतीला दृष्ट लागली. घर भारतात असले तरी घरात भारत नाही, हे कटु सत्य आहे. म्हणूनच सरसंघचालकांनी कुटुंब प्रबोधनाला महत्त्व दिले. 'आहे त्या परिस्थितीला पाहिजे तसे घडवणे' हेच आपल्या हातात आहे.

जीवीचा जिव्हाळा, प्रेम, आदर, यथाधिकार, मानसन्मान हे संस्कार कुटुंबात झालेच पाहिजेत त्यासाठी प्रबोधन. विभक्त असलो तरी सणावाराला एकत्रित येणे, आठवड्यात एक दिवस सामूहिक व्हिडीओ कॉल अशा अनेक बाबी कुटुंबाला एकत्रित ठेवू शकतात. म्हणूनच त्यांनी कुटुंबासाठी पंचोपचार सांगितले. भाषा, भूषा, भजन, भोजन आणि भ्रमण. कुटुंबात बोलताना मातृभाषेचा वापर झाला तर बुद्धीचा विकास चटकन होतो, संस्कृतीचे संस्कार सहज संक्रमित होतात. आपली परंपरागत वेशभूषा भारतीयत्व जागे ठेवते. कुटुंबात एकत्रित भजन आणि भोजन जीवीचा जिव्हाळा घट्ट करतो. तीर्थक्षेत्रावर केलेले भ्रमण सद्भाव निर्माण करते. रामराज्यातील कुटुंब म्हणजे अजून दुसरे काय असेल?

पंचसूत्रीमध्ये तिसऱ्या स्थानावर पर्यावरण संरक्षण आहे. रामराज्यात पर्यावरणाचे महत्त्व महर्षी वाल्मीकिंनी स्पष्ट विशद केले आहे. खरं तर भारतीय संस्कृती ही एकमेव संस्कृती आहे, ज्यात व्यष्टी, समष्टीसोबत सृष्टीला महत्त्व दिले आहे. सृष्टीला महत्त्व दिले तरच परमेष्ठी पदापर्यंत जाता येते.

'माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः' पृथ्वीला माता मानणारी आपली संस्कृती आहे म्हणूनच आपण तुळस, वड, उंबर, गाय, कुत्रा, नद्या, सागर, पर्वत, सूर्यादि ग्रह मंडलाची पूजा करतो. पर्यावरणपूरक बाबी आपल्या सर्वांचा स्थायीभाव बनावा म्हणून सरसंघचालकांनी याबाबत विशेष स्पष्टता आणि आग्रह केला आहे.

पंचसूत्रीमध्ये पुढील सूत्र म्हणजे 'स्व'चा बोध. हा चौथा बिंदूही विशेष महत्त्वाचा आहे. आध्यात्मिक आणि राष्ट्रीय असा हा विचार. व्यवहार म्हणून विचार केला तर आणि प्रत्येक भारतीय माणसाने स्वदेशीचा वापर केला तर या देशातील अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत होईल. शिवाय स्वदेशीचा अंगीकार देशभक्तीचे जागरण करेल. हा झाला एक भाग. 'स्व'च्या बोधाचा आध्यात्मिक दृष्टिकोनही महत्त्वाचा आहे. मी कोण? मी कशासाठी आलो? माझे कर्तव्य काय? माझे ध्येय काय? या अशा अनेक प्रश्नांच्या अनुषंगाने कार्यरत राहून उत्तर शोधणे म्हणजे 'स्व'चा बोध होय.

पंचसूत्रीमध्ये पाचवे सूत्र 'नागरी कर्तव्ये' हे आहे. 'वयं राष्ट्रे जागृयाम' हे आपले सूत्रच आहे. रामराज्यात यावरच भर होता. या देशाप्रती, समाजाप्रती नागरिक म्हणून आपली काही कर्तव्ये आहेत. माणसे नागरी हक्कासाठी सतत भांडत असतात, पण नागरिक म्हणून आपली काही कर्तव्ये, काही जबाबदाऱ्या आहेत. त्याकडे लक्षपूर्वक दुर्लक्ष करतो आपण. देशातील राष्ट्रीय, सामाजिक, आर्थिक अशा सर्वच समस्यांचे मूळ नागरी कर्तव्याकडे दुर्लक्ष आहे.

थोडक्यात विजयादशमी उत्सवात प. पू. सरसंघचालकांनी दिलेली पंचसूत्री रामराज्याचा मार्ग प्रशस्त करणारी आहे. रामराज्यात समाजात समरस भाव होता. रामराज्यात कुटुंबव्यवस्था मजबूत आणि बळकट होती. रामराज्यात सृष्टीचा विचार अग्रक्रमावर होता. रामराज्यात 'स्व'चा भाव महत्त्वाचा होता. व्यापारउदिमात स्वराज्यातील तरुणाईला प्रोत्साहन असे. नीतिमत्ता, शुद्ध चारित्र्य आणि समाजाप्रती कर्तव्यभाव असल्यामुळे सर्वत्र शांतता आणि सुव्यवस्था होती. रामराज्यात प्रजा, राजा, राज्य यांच्यात प्रखर समन्वय आणि एकमेकांप्रती निष्ठा होती. हे राष्ट्र परम् वैभवाला नेण्यासाठी ही पंचसूत्री महत्त्वाची आहे. 'याचि देही याचि डोळा' पाहावयाचे असल्याने यावर विशेष लक्ष दिले जात आहे. म्हणूनच प. पू. सरसंघचालकांनी सांगितलेली पंचसूत्री रामराज्याचा राजमार्गच आहे. ▮

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### नागपुरातील बांधकाम आणि त्यांच्या वेळा

सध्या नागपुरात अनेक ठिकाणी बांधकाम सुरू आहे. बांधकामासंबंधी अनेक नियम अथवा कायदे असतीलच. त्यात बांधकामाच्या वेळा याविषयी नियम आहे किंवा नाही हे सामान्य नागरिकांना समजणे कठीण आहे. दिवस-रात्र हे बांधकाम सुरू असते. पहाटेपासून सुरू होणारे काम रात्री-बेरात्री सुरू असते. तऱ्हेतऱ्हेचे कानठळ्या बसणारे आवाज येत असतो. प्रश्न असा आहे की, नागरिकांनी शांत झोप केव्हा घ्यावी? ध्वनिप्रदूषणाच्या गंभीर परिणामांची कल्पना सर्वांनाच असावी. घरात लहान बालके, थकून आलेले कर्मचारी, घरातील ज्येष्ठ नागरिक,



आजारी या सर्वांनी शांत झोप केव्हा घ्यावी? रोज त्या मजुरांशी किंवा ठेकेदाराशी वादविवाद, भांडणे होत असतात. पोलिसात तक्रार केल्यास पोलिस येतात. आपले काम करतात व जातात. पोलिस जाताच काम पुन्हा सुरू होते. पोलिसात तक्रार केली म्हणून धमक्या दिल्या जातात. शांत झोपेची सर्वांनाच आवश्यकता आहे आणि ती झाली पाहिजे. त्यासाठी आवश्यक असलेल्या नियमांची अंमलबजावणी व्हावी एवढीच अपेक्षा.

**ललिता देशपांडे**/नागपूर

### सूर्योदयानंतर पथदिवे बंद व्हावे

सूर्योदय झाल्यानंतर पथदिवे सुरू असणे काही उपयोगाचे नाही. मी बऱ्याच ग्रामपंचायतीमध्ये हा विषय मांडत असतो. पण अंमलबजावणी होत नाही. आजच्या काळात सेन्सर आहे. टाईमर आहे. मनुष्यबळ आहे. तरी आजही सकाळी ८ वाजेपर्यंत पथदिवे सुरूच दिसतात. अडीच तास उशिराने पथदिवे बंद होणे म्हणजे लाखो रुपयांचे नुकसान होणे आहे. हे मी एका मीटर बॉक्स अंतर्गत असलेल्या पथदिव्यांबद्दल म्हणत आहे. एखाद्या मोठ्या ग्रामपंचायतमध्ये ११ ते १२ पथदिवे बॉक्स असतात. यापैकी अर्धे उशिरा बंद केले गेले तरी महिन्यात ते लाखोमध्ये नुकसान होते. याविषयी संबंधितांनी काळजी घ्यावी.

**पद्माकर नानोटे**/७२१८८९७४५२

### विदर्भवाद्यांचा आत्मनाश

नुकतेच नागपुरात विदर्भवाद्यांचे संमेलन झाले. यातील एकाही नेत्याने नुकत्याच घडलेल्या नागपूर दंगलीचा साधा निषेध केला नाही! नागपूर राजधानी सुरक्षित असण्याची कोणतीही मीमांसा न करता झारखंड प्रणीत विदर्भ बनविणे हा विदर्भवाद्यांचा आत्मनाश आणि वैदर्भीय जनतेचा विश्वासघात ठरतो! केवळ केंद्र सरकारला दोष देण्यापेक्षा वैदर्भीय मतदारसंघांची पुनर्रचना महत्त्वाची आहे. कारण रामटेक आणि अमरावती हे दोन मतदारसंघ चुकीच्या पद्धतीने आरक्षित असून ते खुल्या प्रवर्गासाठी असावेत. कापूस आणि संत्री उत्पादन हा विदर्भाचा मानबिंदू असूनही शेतकऱ्यांसाठी या तथाकथित नेत्यांनी काय केले? गमावलेला जनतेचा विश्वास संपादन करण्याची ही केवळ क्लृप्ती आहे.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

### कलाकाराने आपल्या मर्यादा ओलांडू नये

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील अपमानास्पद गाणे कुणाल कामरा याच्या चांगलेच अंगलट येण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे या राज्याचे माजी मुख्यमंत्री आहेत. शिवसेनेचे नेतृत्व त्यांच्या हाती आहे तसेच आज राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय राज्यात ७ खासदार, ६० आमदार इतका प्रचंड जनादेश असलेले नेते आहेत. त्यामुळे अशा व्यक्तीबाबत अपमानस्पद बोलताना कुणाच्या भावना दुखावल्या जाणार नाही याची काळजी घेण्याची गरज होती. कामराच्या अशा कृत्यामागे कुणाची प्रेरणा आहे ज्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न सुद्धा निर्माण होऊ शकतो हे सुद्धा तपासले पाहिजे. आजवर अनेक विनोदी कार्यक्रमांतून विडंबनपर अनेक काव्ये झाली पण यातून कुणाच्या भावना दुखावण्याचा किंवा कुणाचा अपमान करण्याचा हेतू नव्हता. राजकीय पक्ष एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत असतात परंतु एखाद्या कलाकाराने यात पडू नये. कारण कुठलीही कला ही विशिष्ट व्यक्ती, पक्ष याचं समर्थन किंवा विरोध करू शकत नाही. त्यामुळे कलाविश्वाचा सन्मान राखायचा असेल तर कुणाल कामराने माफी मागितलेलीच बरी. आज शिंदेंना लक्ष्य केलं, उद्या आणखी दुसऱ्याचा होईल. त्यामुळे हे आजच थांबले पाहिजे. कलाकाराने आपली कला सादर करताना आपल्या मर्यादा ओलांडू नये हेच यानिमित्ताने सांगावेसे वाटते. ▮

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### दुचाकीचा समोरासमोर अपघात; अक्कलकोट येथे तिघे जखमी

**सोलापूर, दि.२५ मार्च-**

दुचाकींची समोरासमोर धडक बसल्याने दोन्ही मोटारसायकलीवरील तिघे जखमी झाले. हा अपघात अक्कलकोट येथील समतानगर जवळ सोमवारी रात्री आठ वाजता घडला.महेश अशोक नाईकवाडी (वय ३०, रा. जेऊर ता. अक्कलकोट), शरणप्पा बसलिंगप्पा तुकमळे (वय ३८) व शिवानंद हिरप्पा कोरे (वय ५५, दोघे रा. जेऊर ता. अक्कलकोट) अशी जखमींची नावे आहेत. यातील जखमी महेश हा दुचाकी चालवित सोमवारी रात्री आठच्या सुमारास अक्कलकोटहून जेऊरकडे निघाला होता. तो अक्कलकोट येथील समतानगर जवळ आला असता, समोरून आलेल्या दुचाकीची समोरासमोर धडक बसली. यात महेशच्या चेह-याला जखम झाली तर डोक्याला मुकामार लागल्याने अक्कलकोट येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री ११ वाजता नातेवाईक दिलीप लिंबीतोटे यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. तर जेऊरहून अक्कलकोटच्या दिशेने दुचाकीवर निघाले असता समता नगर जवळ समोरून आलेल्या अपघातात शरणप्पाच्या चेह-याला जखम झाली तसेच डोक्याला मुकामार लागला. व शिवानंद यांच्या डोक्याला व हाताला जखम झाल्याने त्यांच्यावर सरकारी रुग्णालय अक्कलकोट येथे उपचार करून रात्री ११.३० वाजता नातेवाईक दिलीप लिंबीतोटे यांनी उपचारास शासकीय रुग्ण्यालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कंदलगाव येथे विहिरीत पडून मुलाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथे निंबर्गी रोडलगत असलेल्या हरीश सप्ताळे यांच्या शेतातल्या विहिरीजवळ क्रिकेट खेळायला गेलेल्या पंधरा वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घडली . ओमकार चव्हाण वय वर्षे १५ असे मृत पावलेल्या मुलाचे नाव आहे . ओमकार हा नुकताच दहावीची परीक्षा देऊन आई-वडिलांकडे आला होता. तो सोमवारी सायंकाळी मित्रांसोबत क्रिकेट खेळण्यासाठी गेला होता. विहिरीच्या कडेला हरवलेला चेंडू शोधत असताना पाय घसरून तो खोल असलेल्या विहिरीत पडला. त्यातच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. सदर घटनेची माहिती गावकऱ्यांना मिळताच गावकऱ्यांनी विहिरीकडे धाव घेत शोध कार्य सुरु केले. पण मुलगा सापडत नसल्याने व विहीर खोल असल्याने तात्काळ मंद्रूप पोलीस ठाणे येथे सदर घटनेची माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच मंद्रूप पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस व गावकऱ्यांनी मनगोळी येथील कमलाकर डिरे, अनिल सले, अजय नगरे, हर्षद कांबळे, फारुख नदाफ यांच्या मदतीने रात्री उशिरा सदर मुलाचा शोध घेऊन मृतदेह बाहेर काढले. सदर घटनेचा तपास मंद्रूप पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार विक्रम माने, पोलीस कॉन्स्टेबल महेश कोळी हे करीत आहेत.



### लोणारवाडीत तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि.२५ मार्च-**

पूर्ववैमनस्यातून पंढरपूर तालुक्यातील लोणारवाडी येथे सोमवारी रात्री ८.३० वाजता दगडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून एकास जखमी केले. उत्तम शंकर काळेल (वय ३५, रा. लोणारवाडी ता. पंढरपूर) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. बसवेश्वर शंकर काळेल व इतर एक आणि यातील जखमी उत्तम यांच्यात सोमवारच्या घटनेपूर्वी तक्रार झाली होती. तेव्हापासून बसवेश्वर व इतर एक हे उत्तमवर चिडून होते. मंगळवारी रात्री ८.३० वाजता उत्तम घराजवळ असताना, तेथे दोघे आले. त्यांनी त्यास दगडाने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात चेह-यासह सर्वांगास मुकामार लागल्याने पंढरपूर येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून मंगळवारी दुपारी १.१० वाजता स्वत: दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### डोक्यात हातोडा पडून बालिका जखमी

**सोलापूर, दि.२५ मार्च-**

घरातील माळ्यावर ठेवलेला लोखंडी हातोडा डोक्यावर पडल्याने १२ वर्षाची बालिका जखमी झाली. हा प्रकार सोमवारी सायंकाळी ५ वाजता घडला. दिपिका रतन बाडीवाले (वय १२, रा. लष्कर सोलापूर) असे जखमी बालिकेचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास दिपिका ही राहत्या घरात बसली होती. तेव्हा अचानक घरातील माळ्यावर असलेला हातोडा तिच्या डोक्यात पडला. यामुळे तिच्या डोक्यास जखम झाल्याने सायंकाळी ७.४० वाजता सागर शिवसिंगवाले याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# सोलापूरला आणखी ६५ एसटी बसेसची प्रतीक्षा

## १०० पैकी मिळाल्या केवळ ३५ नव्या बसेस

## पंढरपूर, माळशिरस आगार प्रतीक्षेच्या यादीत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मार्च-**

राज्याची दळणवळण व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी एसटी (राज्य परिवहन महामंडळ) राज्यातील विविध जिल्ह्यात विभाग व आगार स्तरावर कार्यरत आहेत. त्यामध्ये सोलापूर एसटी विभागातील विविध नऊ आगारामध्ये एसटी महामंडळाच्या बहुतांश गाड्या या जुन्या झालेल्या आहेत. यामुळे याविभागातील प्रत्येक आगारात नव्या गाड्यांची आवश्यकता आहे. त्यानुसार सोलापूर एसटी विभागामार्फत महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे १०० नव्या एसटी बसेसचा मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यापैकी एसटी महामंडळाने सोलापूर विभागाला आत्तापर्यंत केवळ ३५ नव्याकोऱ्या अशोक लेलँड कंपनीच्या बसेस उपलब्ध केले आहेत. मात्र सोलापूर एसटी विभागाला अजूनही ६५ नव्या एसटी बसेसची प्रतीक्षा लागली आहे.

दरम्यान, अद्यापपर्यंत सोलापूर एसटी विभागातील ४ आगारांत फक्त ३५ गाड्या मिळालेल्या आहेत. यामुळे इतर आगारांना प्रतीक्षा करण्याशिवाय पर्याय नाही. सोलापूर आगारांपैकी बार्शी, करमाळा आणि अक्कलकोट या तीन आगारांत प्रत्येकी दहा गाड्या, तर सोलापूर आगारात रविवारी ५ गाड्या आल्या आहेत. यामुळे इतर आगारांनाही नव्या एसटी गाड्या मिळणे गरजेचे आहे. राज्यभरात तेथील लोक प्रतिनिधींनी पाठपुरावा केल्याने अनेक विभागांना जादा गाड्या मिळाल्या आहेत; पण इतर आगारांसाठी बसेस मिळण्यासाठी लोक प्रतिनिधींनी पाठपुरावा करावा, अशी मागणी प्रवाशांकडून होऊ लागली आहे.

सोलापूर जिल्ह्यात आणि परिसरात अनेक तीर्थ क्षेत्रे आहेत. या तीर्थ क्षेत्रात दर्शनासाठी वर्षभर विविध राज्य आणि जिल्ह्यातील लाखो भाविक येत असतात या भाविकांना जुनाट एसटी गाड्यांमध्येर प्रवास करावा लागत आहे. यातील बहुतांश प्रवासी सोलापूर आगारात उतरूनच पुढील प्रवास करतात. अशाच प्रकारे पंढरपुरात ही प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणान आहे. तेथेही नवीन गाड्या देण्याची मागण प्रवाशांकडून केली जाते.फ

**सोलापूर विभागातील ६५ गाड्या स्क्रॅपमध्ये**

सोलापूर विभागात ७५० एसटी गाड्या आहेत. यातील जवळपास ५५० गाड्या या प्रवाशांसाठी वापरण्यात येतात. यातील ही अनेक गाड्या खराब आहेत. शिवाय यातील ६५ एसटी गाड्या स्क्रॅपमध्ये काढण्यात आलेले आहेत. यागाड्यांचा लिलाव करण्यात येणार आहे.

**एसटी महामंडळाने प्रवाशांना दर्जेदार सेवा द्यावी**

राज्यातील दळणवळण व्यवस्था एस.टी महामंडळावर अवलंबून आहे. गावात येणारे एसटी अत्यंत निकृष्ट दर्जाची असते. गावात खेड्यापाड्यात देखील चांगल्या एसटी बसेस उपलब्ध कराव्यात अशी मागणी वाढत आहे. याकडे सरकारने आणि महामंडळाने सकारात्मक दृष्टीने पहावे.

**- संतोष राऊत, प्रवासी**

**उर्वरित बसेससाठी पाठपुरावा सुरू**

एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे एकूण शंभर बसेसची मागणी प्रस्तावाद्वारे करण्यात आले होते. त्यापैकी सोलापूर आगाराला ३५ नव्या अशोक लेलँड कंपनीच्या बी.एस.६ इंजिनच्या बसेस प्राप्त झालेल्या आहेत. या बसेस सोलापूर एसटी विभागात रुजू झाल्या आहेत. उर्वरित ६५ एसटी बसेस लवकरच प्राप्त होतील. त्यासाठी मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठपुरावा चालू आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत देखील बसेस प्राप्त झालेल्या आहेत.

**- अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक सोलापूर एसटी विभाग.**

# आदिशक्ती मुत्यालम्मा मंदीरातील चोरी उघडकीस

## जेलरोड पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ मार्च -**

जेलरोड पोलीस ठाणे हद्दीतील अदिशक्ती मुत्यालम्मा देवी मंदीरात झालेली चोरीची घटना जेलरोड पोलिसांनी उघडकीस आणून या गुन्ह्यात चोरलेले सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल असा ३६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या गुन्हयात अज्ञात चोरट्याने साखरपेठ हद्दीतील अदिशक्ती मुत्यालम्मा देवी मंदीर मधील देवीचे अंगावरील सोन्याचे दागिने चोरले होते. जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी सदरची चोरी उघडकिस आणणेकरीता सदर भागातील सर्व सी सी टि व्ही तपासले त्यात त्यांना एक संशयीत इसम मोटार सायकल वरुन रात्री साखरपेठ हद्दीतील अदिशक्ती मुत्यालम्मा देवी मंदीर परीसरात फिरत असताना दिसला. त्यावरुन पोलिसांनी सोलापूर शहरातील सर्व दुचाकी शोरुमला भेटी देवुन सी सी टि व्हि मधील वर्णनाप्रमाणे विक्री केलेल्या मागील तीन वर्षात मोटार सायकलची माहिती घेवुन त्याचे वर्गीकरण केले. तांत्रिक तपास करुन संशयित आरोपी हा दागिने विकाण्या करीता वल्याळ मैदान मार्गाने अशोक चौक सराफ बाजार मध्ये जात असताना पोलिसांनी वासुदेव लक्ष्मण बंदगी (वय ४२, रा. तुळशांती नगर ११३/५ विडी घरकुल, सोलापूर) यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेवुन मंदीर चोरीतील मुद्देमाल जप्त करण्यात आले.



सदरची कामगिरी पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उप-आयुक्त विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त पोमण यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शिवाजी राउत, भाऊराव बिराजदार, सहा. पोलीस निरीक्षक निलेश पाटील-सोनवणे, पोलिस उपनिरीक्षक शैलेश सातपुते, सहायक फौजदार शरीफ शेख, गजानन कणगीरी, हवालदार शेख, धनाजी बाबर, निलेश गंगावणे, मुस्ताक नदाफ, ४ वसंत माने, गणेश धुमाळ, महिला हवालदार गुत्तीकोंडा, संतोष वायदंडे, उमेश सांवत, विठ्ठल जाधव, रमेश सिनारे, साईनाथ यसलवाड, कल्लप्पा देकाणे यांनी पार पाडली.

# बुधवार पेठेत तरुणावर पूर्ववैमनस्यातून चाकू हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मार्च-**

येथील मिलिंद नगर परिसरातील बुधवार पेठेत पूर्ववैमनस्यातून तरुणावर चाकू हल्ला करण्यात आला. हा प्रकार सोमवारी रात्री १० वाजता घडला.नागसेन सुनिल आबुटे (वय ३१, रा. बुधवार पेठ, सोलापूर) असे चाकूहल्ला झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमवारी दुपारी नागसेन आणि अथर्व तळमोहिते व गगन तळमोहिते यांच्या तक्रार झाली होती.




यावरून अथर्व आणि गगनसह इतर चार जण नागसेनवर चिडून होते. रात्री १० च्या सुमारास नागसेन हा घराजवळ असताना, अथर्व व गगन तळमोहिते तसेच इतर चार जणांनी चाकू मारल्याने नागसेनच्या डोक्याला जखम झाली. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री १०.४५ वाजता मिलिंद तळभंडारे याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पटवर्धन कुरोलीत महिलेस मारहाण

**सोलापूर** : पैशाच्या कारणातून पंढरपूर तालुक्यातील पटवर्धन कुरोलीत सुनिता औदुंबर डावरे (वय ४५) या महिलेला मारहाण करण्यात आली. हा प्रकार २१ मार्च रोजी १० वाजता घडला.यातील जखमी सुनिता आणि विष्णु बाबुराव मोरे यांच्या पैशाच्या कारणातून २१ मार्च रोजी वाद झाला. यातून विष्णु याने सुनिता यांना पटवर्धन कुरोली शिवारात लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने करकंब येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून स्वत: २५ रोजी दुपारी २.१५ वाजता उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# सोलापुरात मानलेल्या भावाचा विवाहितेवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ मार्च -**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बार्शी-कुर्डूवाडी बायपास रोड येथील एका लॉजवर विवाहित महिलेवर जबरदस्ती करून अत्याचार केल्याची गंभीर घटना घडली आहे. पीडित महिलेवर मानलेल्या भावाने साथीदाराच्या मदतीने अत्याचार केल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी बार्शी तालुका पोलीस गुन्हा दाखल केला आहे.

सुरेश परसू माळी आणि संतोष भास्कर भानवसे असं गुन्हा दाखल झालेल्या दोन संशयित आरोपींची नावं आहेत. त्यांच्याविरोधात बलात्कार, मारहाण आणि जिवे मारण्याची धमकी, असे गंभीर आरोप विवाहित महिलेने केले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींची पीडित महिलेशी आधीपासून ओळख होती. याचाच गैरफायदा आरोपींनी घेतला. २२ डिसेंबर २०२४ रोजी शहरातील एका मंगल कार्यालयात विवाह सोहळा पार पडल्यानंतर आरोपींनी



महिलेला ''घरी सोडतो'' असे सांगून गाडीत बसवले. गाडी घरी न नेता, आरोपींनी तिला कुर्डूवाडी रोडवरील एका लॉजमध्ये नेलं. लॉजवर पोहोचल्यानंतर महिलेला संशय आल्याने तिने विरोध केला. त्यावर आरोपींनी धमकावत जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवले. पीडितेनं विरोध केल्यानंतर आरोपींनी तिला कमरेच्या पट्ट्याने मारहाण केली. तसेच त्यांनी तिच्या कपड्यांची विटंबना करत किळसवाणं वर्तन केले. महिलेने मदतीसाठी आरडाओरड केली असता, लॉजचा कर्मचारी आवाज ऐकून घटनास्थळी धावला. त्याने दरवाजा उघडून महिलेची सुटका केली.

या प्रकारानंतर पीडितेला एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. दोन दिवस उपचार घेतल्यानंतर तिला डिस्चार्ज देण्यात आला. त्यानंतर आरोपींनी तिला तुळजापूर रोडवर नेऊन पोलिसांत तक्रार दिल्यास जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. भीतीपोटी महिलेला तक्रार नोंदवता आली नाही. पण आरोपी पीडितेचा छळ करत राहिले.

अखेर मानसिक आणि शारीरिक त्रास सहन न झाल्याने पीडितेनं २३ मार्च २०२५ रोजी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. महिलेच्या तक्रारीवरून सुरेश माळी आणि संतोष भानवसे यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ (बलात्कार), ३२३ (मारहाण), ५०६ (जिवे मारण्याची धमकी) आणि ३४ (सामूहिक कट) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास बार्शी तालुका पोलिसांकडून केला जात आहे.

## आईवडिलांचे आईवडील होता आलं पाहिजे

एक दिवस येतो आणि दोघांपैकी एकाला घेऊन जातो. जो जातो तो सुटतो, परीक्षा असते मागे राहणाऱ्याची कोण अगोदर जाणार? कोण नंतर जाणार हे तर भगवंतालाच माहीत. जो मागे राहतो त्याला आठवणी येणं, अश्रू येणं हे अगदी स्वाभाविक असतं! आता प्रश्न असा असतो की ही आसवं हे रडणं थांबवायचं कुणी? मागे राहिलेल्या आईला किंवा वडिलांना कुणी जवळ घ्यायचं? पाठीवरून हात कुणी फिरवायचा? निश्चितपणे ही जबाबदारी असते मुलांची, मुलींची, सुनांची... थोडक्यात काय तर दोघांपैकी एकजण गेल्यानंतर मुलामुलींनाच आपल्या आईवडिलांचे आईवडील होता आलं पाहिजे! लक्षात ठेवा लहानपणी आईवडिलांनी नेहमी अश्रू पुसलेले असतात. आजारपणात अनेक रात्री जागून काढलेल्या असतात. स्वतः उपाशी राहून, काहीबाही खाऊन आपल्याला आवडीचे घास भरवलेले असतात, परवडत नसलेली खेळणी आणि आवडीचे कपडे घेतलेले असतात. म्हणून आता ही आपली जबाबदारी असते, त्यांच्या सारखच निःस्वार्थ प्रेम करण्याची असं झालं तरच ते जगू शकतील. नसता ''तो माणूस म्हणजे वडील'' किंवा ''ती स्त्री म्हणजे आई'' तुटून जाऊ शकते, कोलमडून पडू शकते! आणि ही जबाबदारी फक्त मुलं, मुली आणि सुना यांचीच असते असे नाही तर ती जबाबदारी प्रत्येक नातेवाईकाची, परिचितांची, मित्रमैत्रिणींची... सर्वांची असते! फक्त छत, जेवणखाण आणि सुविधा देऊन ही जबाबदारी संपत नाही तर अशा व्यक्तींना आपल्याला वेळ आणि प्रेम द्यावेच लागेल तरंच ही माणसं जगू शकतील! आयुष्याचा जोडीदार गमावणं म्हणजे नेमकं काय? हे दुःख शब्दांच्या आणि अश्रूंच्या खूप खूप पलीकडचं असतं... म्हणून अशा व्यक्तींना समजून घ्या! केवळ माया, प्रेम आणि आपुलकीचे दोन गोड शब्द एवढीच त्यांची अपेक्षा असते ती जरून पूर्ण करा, त्यांच्या जागी आपण आहोत अशी कल्पना करा आणि त्यांना वेळ द्या! उद्या हा प्रसंग कोणावरही येऊ शकतो. म्हणून नेहमी सर्वांशी प्रेमाने, मायेने आणि आपुलकीने वागा !

**- दत्तात्रय कोळी**

# विद्यार्थ्यांच्या गरुड भरारीस वीरशैव प्रतिष्ठानने दिले आर्थिक बळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानतर्फे एका गरीब गरजू विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्यात आले. ऑर्किड कॉलेजमध्ये मेकॅनिकल ट्रेड इंजिनिअर म्हणून शिकत असलेल्या अनिकेत उनकीचे कॉलेजमार्फत फ्रान्स या देशात इंटर्नशिप करता निवड झाली आहे. आर्थिक मदतीचा धनादेश पोलीस उपयुक्त दीपक आर्वे साहेब यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांकडे सुपूर्द करण्यात आला यावेळी दीपक आर्वे यांनी प्रतिष्ठान करत असलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक करत स्वतः त्या विद्यार्थ्यास आर्थिक मदत जाहीर केली. यावेळी विद्यार्थ्याचे आई-वडील



सौ व श्री सिद्धेश्वर मल्लाप्पा उनकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे, सुनील शरणार्थी, शशिकांत बिराजदार, तम्मा कडगंची, सोमनाथ मदरे, अनिल वजीरकर, गुरु हिप्परगी, सुनील रामशेट्टी यांची उपस्थिती होती.

Classifieds

**विकणे आहे**

विजापूर रोड, अत्तार नगर येथील प्लॅट नं. १०१ अंबिका रेसिडेन्सी अपार्टमेंटमधील ३ BHK प्लॅट विकणे आहे.
- संपर्क -
प्रदीप चंद्रकांत ख्याडे
मो. ९८९०८६६४६४
८१७७९७८३८३

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
पत्ता : 'इंद्रभुवन' पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन, सोलापूर ४१३००१
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**Call for Quotation**

**Transfer Station**

| Sr. No. | Quantity | Unit | Description of Work |
|---|---|---|---|
| 1 | 2 | Nos. | A) Closed Compact Unit Tip Cart/ Hopper |
| 2 | 6 | Nos. | B) Detachable Containers of 20 cum capacity with change over system |
| 3 | 2 | Nos. | C) Hook Loader (20T) with vehical 25 Ton capacity |
| 4 | 2 | Nos. | D) Weight Bridge (40T) Including Civil Work |

उपरोक्त प्रकल्प उभा करण्यासाठी वरील बाबींचे दर विविध कंपन्याकडून मागविण्यात येत आहेत. या बाबतचे Specification महानगरपालिकाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.solapurcorporation.gov.in दि. २५/०३/२०२५ रोजी पासून उपलब्ध आहेत. तरी दि. २६/०३/२०२५ ते ०४/०४/२०२५ पर्यंत इच्छुक कंपनी यांनी आपले दर हे प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आवश्यक असल्याने या बाबत कोणत्याही अनामत रक्कमेची आवश्यकता नाही याची नोंद घ्यावी.

**कालावधी : ७ दिवसात सादर करणे.**
**पत्ता : अतिरिक्त आयुक्त १ सोलापूर महानगरपालिका सोलापूर कार्यालय.**

सही/-
अतिरिक्त आयुक्त
तथा नियंत्रण अधिकारी
सोलापूर महानगरपालिका

**AHILYANAGAR MUNICIPAL CORPORATION**
**AHILYANAGAR**
**AMC FUND - Year 2024-25**
**E - Tender Notice No.: 252 & 253 - year 2024-25**
**TENDER ID NO. 1163494 & 1163514**

E Tender notice no. 252 & 253 for Year 2024-25 has been published on the website http://mahaetenders.gov. in for online bidding through e-tender mode.
However, it should be noted those concerned.

**City Engineer**
**Ahilyanagar Municipal Corporation**
**Ahilyanagar**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः ता. माढा पैकी मौजे तांदुळवाडी येथील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी मौजे तांदुळवाडी येथील ग.नं.३२२ यापैकी दक्षिणबाजुकडील क्षेत्र १ हे. २६ + पो.ख.0.0२ आर एकूण १ हे. २८ आर आकार रु. ३.८८ पैसे यासी चतुः सिमा **पुर्वेस** -हनुमंत परबत यांची ग.नं. २५७ **दक्षिणेस** - परबत यांची ग.नं.३२१ ची जमीन, **पश्चिमेस** - जोंधळे यांची ग.नं. ३६४, **उत्तरेस** - सदर गटापैकी पुष्पलता कदम यांची जमीन येणेप्रमाणे मिळकत आतील तदंगभूत वस्तुसह.

सदर मिळकत ही योगेश दिगंबर कदम व गणेश दिगंबर कदम यांचे मालकी कबजे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे घरगुती अडचणीचे निवारणाकरीता व कायदेशीर गरजेसाठी विक्रीस काढून ती आमचे खरेदीदार अशिलास कायम खुष खरेदी देणेचे ठरवले व उभयतांनी सदर मिळकतीची बाजारभावाने किंमत ठरवून व ती मान्य केली व सदर व्यवहाराचा भाग म्हणून आमचे खरेदीदार अशिलाकडून इसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान मालकानी आमचे अशिलास दिलेला आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, याउपरही वर नमूद प्लॉट मिळकती संबंधाने जर कोणाचे कांही गहाण, दान, लिज, बोजा, टाच, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र वा तत्सम स्वरुपाचे कोणतेही हस्तांतर वा कर्जबोजाचे हक्क वा वहिवाटीचे हक्क अगर तत्सम कोणत्याही स्वरुपाचे हक्कअधिकार असतील तर संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून चार दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येवून आमची खात्री करुन द्यावी मुदतीत कोणाचीही हरकत आली नाही तर सदर मिळकत ही खरेदीयोग्य आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता.२५/०३/२०२३

सही/-
**श्री. महेश विलास जाधव, ॲडव्होकेट**
**स्वामी समर्थ कॉम्प्लेस, कोर्टासमोर**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**
**मो.नं. ९८६०९१२३१८**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### जय शाह यांनी घेतली जियानी इन्फेंटिनो यांची भेट

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट कौन्सिल (आयसीसी) चे अध्यक्ष जय शाह यांनी नुकतीच फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फेटिनो यांची भेट घेतली. फुटबॉलच्या ग्लोबल ऑपरेटिंग



इन्स्टिट्यूशनचे प्रमुख इन्फेटिनो यांनी इन्स्टाग्रामवर झालेल्या बैठकीबद्दल पोस्ट केले. त्यांनी लिहिले, आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांना भेटून मला आनंद झाला. २०२३ च्या आयसीसी क्रिकेट विश्वचषकात भारताला भेट दिल्यानंतर मला तेथील लोकांच्या उत्कटतेचा आणि खेळासाठी जय शाह यांनी केलेल्या कार्याची जाणीव आहे. मी तुम्हाला शुभेच्छा देतो आणि क्रिकेटला आणखी जागतिक स्तरावर नेण्यासाठी एकत्र काम आणि सहकार्य करण्यास उत्सुक आहे. जानेवारीत, क्रिकेट बोर्ड ऑफ इंडियाचे माजी सचिव शाह यांनी स्वित्झर्लंडच्या लुसाने येथे आयओसीचे निवर्तमान अध्यक्ष थॉमस बाक यांची भेट घेतली. त्यात लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचा समावेश करण्याच्या मुख्य मुद्यांविषयी चर्चा झाली आणि सहकार्यास प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित केले.

### स्मृती मंधाना, दीप्ती शर्माचे स्थान कायम

**दुबई :** भारताची उपकर्णधार स्मृती मंधाना आणि अष्टपैलू दीप्ती शर्मा यांनी मंगळवारी आयसीसीच्या महिला टी -२० आंतरराष्ट्रीय फलंदाज आणि गोलंदाजांच्या रँकिंगमध्ये तिसरे स्थान मिळवले. मंधाना व्यतिरिक्त इतर कोणतीही भारतीय खेळाडू अव्वल १० मध्ये नाही. या यादीमध्ये कर्णधार हरमनप्रीत कौर ११ व्या क्रमांकावर आहे, जेमिमा रॉड्रिग्ज १५ व्या स्थानावर आणि शेफाली वर्मा १६ व्या क्रमांकावर आहे. ऑस्ट्रेलियाची बेथ मुनी फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी आहे,.

# कोलकाता-राजस्थान उणिवा दूर करणार

### गुवाहाटीत रंगणार सामना


**गुवाहाटी, २५ मार्च**

सुरुवातीच्या सामन्यांमध्ये पराभव पत्करावा लागल्यानंतर, गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स बुधवारी इंडियन प्रीमियर लीगमध्ये एकमेकांसमोर उभे ठाकतील. या सामन्यात ते त्यांच्यातील उणिवा दूर करण्याचा प्रयत्न करतील.

स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात नाईट रायडर्सना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध सात गड्यांनी पराभव पत्करावा लागला, तर राजस्थान रॉयल्सचा सनरायझर्स हैदराबादने ४४ धावांनी पराभव केला. या दोन्ही सामन्यांमध्ये नाईट रायडर्स आणि राजस्थान हे संघ फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही विभागात आक्रमकता दाखवण्यात अपयशी ठरले होते.

सुनील नारायण वगळता नाईट रायडर्सचा कोणताही गोलंदाज आरसीबीच्या फलंदाजांना थोपवू शकला नव्हता. या





सामन्यापूर्वी चांगल्या फॉर्ममध्ये असलेला फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्ती प्रभाव पाडू न शकणे ही चिंतेची बाब असेल.

ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीवर चक्रवर्तीविरुद्ध फिल सॉल्ट आणि विराट कोहली यांनी सहज धावा गोळा केल्या. वरुण गुवाहाटीमध्ये चांगली कामगिरी करेल, अशी नाईट रायडर्सला आशा आहे.

नाईट रायडर्सचे पाठीच्या दुखापतीतून सावरत असलेल्या अँरिक नोर्कियाच्या तंदुरुस्तीवरही लक्ष ठेवतील. जर दक्षिण आफ्रिकेचा हा वेगवान गोलंदाज तंदुरुस्त घोषित झाला तर त्याला स्पेन्सर जॉन्सनच्या जागी अंतिम अकरा संघात समाविष्ट केले जाऊ शकते.

गेल्या सामन्यात कर्णधार अजिंक्य रहाणे आणि नारायण बाद झाल्यानंतर नाईट रायडर्सचा मधला क्रम कोसळला. वेंकटेश अय्यर आणि आंद्रे रसेल चुकीचे फटके खेळत बाद झाले.

याशिवाय, नाईट रायडर्सना रिंकू सिंगकडूनही चांगल्या कामगिरीची अपेक्षा असेल. या आक्रमक फलंदाजाने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये गेल्या पाच डावांमध्ये फक्त ११, ९, ८, ३०, ९ धावा केल्या. आयपीएलच्या पहिल्या सामन्यातही तो फक्त १२ धावा करू शकला.

दुसरीकडे राजस्थानला पुनरागमन करायचे असेल तर त्यांच्या गोलंदाजांना चांगली कामगिरी करावी लागेल. सनरायझर्सविरुद्धच्या मागील सामन्यात, त्यांचा आघाडीचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने चार षटकांत ७६ धावा दिल्या तर फजल हक फारुकी आणि महेश थिकशाना देखील फलंदाजांना रोखण्यात अपयशी ठरले. त्या सर्वांना गुवाहाटीला परतण्याची संधी मिळेल.

राजस्थानचा प्रभारी कर्णधार रियान परागचीही येथे कसोटी लागणार आहे. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

कोलकाता नाईट रायडर्स वि. राजस्थान रॉयल्स
**स्थळ :** बारस्पारा क्रिकेट स्टेडियम, गुवाहाटी
**वेळ :** संध्याकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# माझ्या नेतृत्वात असेच चमत्कार घडतील

### दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेलचे मत



**विशाखापट्टणम्, २५ मार्च**

माझ्या नेतृत्वाखाली हेच घडणार आहे. म्हणून ही सवय लावा. माझी निर्णय घेण्याची प्रक्रियाही अशीच आहे, त्यामुळे काहीही होऊ शकते. कधीकधी चाहते रागावतीलही. आता आपण जिंकलो आहोत, म्हणून कोणीही काहीही बोलणार नाही. पण माझ्या नेतृत्वात असेच चमत्कार घडतील, असे मत सोमवारी आयपीएल सामन्यात लखनौ सुपर जायंट्सवर एका गड्याने रोमांचक विजय मिळविल्यानंतर दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने व्यक्त केले.

अक्षर म्हणाला, आम्ही आयपीएलमध्ये खूप काही पाहिले आहे. पॉवर प्लेमध्ये चार गडी गमावणे आणि नंतर सामना जिंकणे हे फारसे पाहिले गेले नाही. पण आता क्रिकेट बदलत आहे. म्हणून तुम्हाला फक्त खेळपट्टीवर राहून प्रयत्न करावे लागतील.

दरम्यान, लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंत म्हणाला, आम्ही चांगली धावसंख्या उभारली होती. आम्ही या पराभवातून शिकू आणि सुधारणा करण्याचा प्रयत्न करू. चूक कुठे झाली हे सांगणे सोपे आहे. त्यांच्याकडून ट्रिस्टन स्टब्स आणि आशुतोष यांनी शानदार फलंदाजी केली. आणखी एक खेळाडू, विपराज निगम यांनी मिळून सामना दिल्लीच्या बाजूने वळवला. दिल्ली कॅपिटल्सच्या आशुतोष शर्माला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले आणि त्याने ३१ चेंडूत नाबाद ६६ धावा केल्या आणि संघाला विजय मिळवून दिला. (वृत्तसंस्था)

### ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेच्या चाचण्या २८ मार्च रोजी

**अलिगड, २५ मार्च**

२८ वी उत्तर प्रदेश राज्य वरिष्ठ ॲथ्लेटिक्स स्पर्धा १० आणि ११ एप्रिल रोजी बरेली येथील रोहिलखंड विद्यापीठ स्टेडियममध्ये आयोजित केली जाईल. यासाठी जिल्हास्तरीय ॲथ्लेटिक खेळाडूंच्या चाचण्या २८ मार्च रोजी दुपारी तलानगरी रामघाट रोड मैदानावर होतील.

आयोजन सचिव विवेक कुमार यांनी सांगितले की, १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, ८०० मीटर, १५०० मीटर, १००० मीटर आणि ५००० मीटर शर्यती, लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी, गोळाफेक, भालाफेक, थाळी फेक इत्यादींसाठी चाचण्या घेतल्या जातील. खेळाडूचे वय १६ वर्षांपेक्षा कमी नसावे. खेळाडूंनी ॲथ्लेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या वेबसाईटवर स्वतःची नोंदणी करावी. (वृत्तसंस्था)

# सामन्याचा शेवट करण्यावर लक्ष : आशुतोष शर्मा

**विशाखापट्टणम, २५ मार्च**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये दिल्ली कॅपिटल्सला लखनौ सुपर जायंट्सवर एक गड्याने चमत्कारिक विजय मिळवून देणारा आशुतोष शर्मा म्हणाला की, त्याने वर्षभर सामने संपवण्यावर लक्ष केंद्रित केले आणि त्याचे येथे चांगले फळ मिळाले.

गेल्या वर्षी पंजाब किंग्जकडून खेळताना आशुतोषने मॅच फिनिशरच्या भूमिकेने प्रभावित केले होते पण त्यावेळी तो त्याच्या कामगिरीवर पूर्णपणे समाधानी नव्हता.

स्थानिक क्रिकेटमध्ये रेल्वेकडून खेळणारा २६ वर्षीय




फलंदाज आशुतोष सोमवारी ६६ धावांच्या नाबाद खेळीमुळे आनंदी दिसत होता. २१० धावांचे लक्ष्य समोर असताना, दिल्लीची एकेकाळी ६ बाद ११३ अशी अवस्था होती पण आशुतोषने विपराज निगमसोबत मिळून त्यांना रोमांचक विजय मिळवून दिला. आशुतोष एक प्रभावशाली फलंदाज म्हणून समोर आला. गेल्या हंगामात, मी सामना सकारात्मक पद्धतीने संपवण्याच्या काही संधी गमावल्या, असे आशुतोषने सामन्यानंतर पत्रकारांना सांगितले. मी यावर लक्ष केंद्रित केले. मला खात्री होती की जर मी शेवटच्या षटकापर्यंत थांबलो तर काहीही होऊ शकते. विपराजने खूप चांगली फलंदाजी केली. मी त्याला फटके मारत राहण्याचा सल्ला दिला. दबावाखालीही तो शांत राहिला. मी माझी खेळी माझे गुरू शिखर धवन यांना समर्पित करतो. (वृत्तसंस्था)

# मला पायलट व्हायला आवडेल : ग्लेन फिलिप्स

**नवी दिल्ली, २५ मार्च**

माझ्याकडे जगातील सर्व पैसे असते तर तो क्रिकेटपटू होण्याऐवजी पायलट बनणे पसंत करेन, असे मत आपल्या आक्रमक फलंदाजी आणि चित्तथरारक झेल घेण्याच्या शैलीमुळे जागतिक क्रिकेटमध्ये एक वेगळी ओळख निर्माण करणारा न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू ग्लेन फिलिप्सने व्यक्त केले.



फिलिप्सला विमानोड्डाण करणे खूप आवडते. इतकेच नाही तर तो उत्साही असतो आणि त्याबद्दल विचारले असता, आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सकडून खेळणारा फिलिप्स म्हणाला, ही माझी मोठी आवड आहे. जर मी क्रिकेट खेळत नसतो आणि माझ्याकडे जगातले सगळे पैसे असते, तर खरं सांगायचं तर मी कदाचित पायलट झालो असतो. मला हवेत तरंगायला आवडते.

दक्षिण आफ्रिकेत जन्मलेला फिलिप्स न्यूझीलंडकडून तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळतो. त्याने दोन आसनी सेस्ना १५२ विमान उडवले आहे पण क्रिकेटमधील व्यस्त वेळापत्रकामुळे तो त्याचा छंद पूर्ण करू शकत नाही.

फिलिप्स हा जागतिक क्रिकेटमधील सर्वात चपळ क्षेत्ररक्षकांपैकी एक मानला जातो. नुकत्याच झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये त्याने हवेत हात फिरवत कठीण झेल घेण्याच्या त्याच्या अद्भुत क्षमतेचे उत्तम प्रदर्शन केले. अशाच पद्धतीने त्याने विराट कोहलीचा झेल घेतला आणि भारतीय फलंदाजांना धक्का बसला. फिलिप्स म्हणाला, मला वाटते की वेग आणि चपळतेच्या दृष्टिकोनातून आनुवंशिकतेवर निश्चितच मोठा परिणाम होतो. तुम्हाला तुमच्या स्वतःच्या कौशल्याच्या आणि प्रतिभेच्या आधारावर पुढे जावे लागेल. माझी दुसरी बाजू म्हणजे माझे कठोर परिश्रम आणि माझा समर्पण भाव हा आहे. (वृत्तसंस्था)



# 'गांधी नाथा'ची क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

गांधी नाथा रंगजी स्कूलने २०२४-२५ या शैक्षणीक वर्षात झालेल्या शालेय शहर रोल बॉल, सिकाई मार्शल आर्ट, जिम्नॅस्टिक्स, बॉक्सिग, स्क्वॅश, किक बॉक्सिग, ज्युदो, कराटे, तायक्वादो, टेनिक्वॉईट व आट्यापाट्या या खेळात प्राविण्य मिळवलेले आहेत.

त्यांना क्रीडाशिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक स्मिता पुरवत, प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी यांनी अभिनंदन केले.

कामगिरी याप्रमाणेः रोल बॉल : १९ वर्षाखालील मुले विजेतेपद, १७ वर्षाखालील मुलींचा संघ उपविजेतेपद, १९ वर्षाखालील मुलींचा संघ उपविजेतेपद.सिकाई मार्शल आर्ट : साक्षी जिडगे-प्रथम, समृद्धी मुटकुळे-द्वितीय, वैष्णवी गुजले - द्वितीय, जयश्री आळंदकर-तृतीय कावेरी शिंगाडे- तृतीय, समृद्धी जाधव-तृतीय. बॉक्सिंग : वैष्णवी ढेगळे-द्वितीय, साक्षी जिडगे-द्वितीय, क्षिप्रा तडकासे-तृतीय, नंदिनी दहिहंडे - तृतीय, साक्षी नलोगल - तृतीय, आदिती जवान-तृतीय, समृद्धी ढेरे-तृतीय, हर्षदा अलकुंटे-तृतीय, संयुक्ता ताटे-तृतीय, सम्राट वाघमारे-द्वितीय. स्क्वॅशः कादंबरी लोकरे-चौथा. जिम्नॅस्टिक्स- धनश्री कांबळे द्वितीय. कराटे : साक्षी जिडगे-प्रथम, आदित्य भोईटे- तृतीय. ज्युदो : साक्षी जिडगे-द्वितीय, क्षिप्रा तडकासे-द्वितीय. किक बॉक्सिगः सम्राट वाघमारे-प्रथम. टेनिक्वॉईटः १९ वर्षाखालील मुली उपविजेते. आट्यापाट्याः- १४ वर्षाखालील मुली विजेते, मुले उपविजेते, १७ वर्षाखालील मुले विजेते, मुली तृतीय, १९ वर्षाखालील मुली विजेते.

पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवडलेले : साक्षी जिडगे, क्षिप्रा तडकासे, सम्राट वाघमारे, सोनाली ढगे, समृद्धी दहिहंडे, धनश्री कांबळे, स्नेहा पाथरूट, प्रतिक्षा गजधाने, अक्षरा शिंदे, अक्षता रणसुबे, सान्वी कदम, भाग्यश्री चिनकेरी, प्रगती पवाडे, समृद्धी पुजारी, यशराज घुले, समर्थ सपाटे, गोविंद मुद्दे, अथर्व सुरवसे, प्रतिक थोरात, श्री क्षीरसागर, गणेश वावरे, सार्थक थोरात, कृष्णा परदेशी, रोहन घुले, पार्थ शिंदे, प्रथमेश अलकुटे, जयश्री आळंदकर, कावेरी शिंगाडे, समृद्धी मुटकुळे, वैष्णवी गुजले, नंदीनी दहिहंडे, वैष्णवी ढेगळे, समृद्धी ढेरे, समृद्धी जाधव, आदिती जवान.

# महाराष्ट्राला १० सुवर्णांसह २३ पदके

### ईश्वर टाकला सुवर्ण पदक

### खेलो इंडिया पॅरा स्पर्धा

**नवी दिल्ली, २५ मार्च**

खेलो इंडिया पॅरा स्पर्धेतील ॲथ्लेटिक्समध्ये महाराष्ट्राच्या क्रीडापटूंनी १० सुवर्णांसह एकूण २३ पदकांची लयलूट करीत दमदार कामगिरी केली. महाराष्ट्रासाठी दहावे सुवर्णपदक पुण्याच्या ईश्वर टाक याने भालाफेक प्रकारात पटकावले.

जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये संपलेल्या ॲथ्लेटिक्सच्या मैदानात अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राच्या खेळाडूंनी नेत्रदीपक यश मिळवले. महाराष्ट्राने पॅरा स्पर्धेत प्रथमच १० सुवर्ण, ६ रौप्य व ७ कांस्यासह एकूण २३ पदकांची कमाई केली आहे. गतस्पर्धेत ॲथ्लेटिक्समध्ये ७ सुवर्णांसह एकूण १६ पदकांची कमाई केली होती. अकुताई उनभगत, भाग्यश्री जाधव यांनी दुहेरी पदकाचा पराक्रम करीत ॲथ्लेटिक्सचे मैदान गाजवले. प्रथमच पॅरा स्पर्धेत खेळताना १२ खेळाडूंनी पदार्पणातच पदक जिंकण्याचा विक्रम केला. दिल्ली दौऱ्यावर आलेले क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, पथकप्रमुख मिलिंद दीक्षित यांनी खेळाडूंचे कौतुक केले आहे.



स्नेहल बेनाडे, अकुताई उनभगत, पथकप्रमुख मिलिंद दीक्षित आणि रुही शिंगाडे



ईश्वर टाक

ॲथ्लेटिक्सच्या एफ १२ या प्रकारात २५ वर्षीय ईश्वरने ६२.६६ मीटर अंतरावर भाला फेकत सुवर्णपदकावर नाव कोरले. भालाफेकमध्येच एफ १३ या प्रकारात महाराष्ट्राच्या प्रतीक पाटील याने कांस्यपदक मिळवले. त्याने ४९.०१ मीटर कामगिरी नोंदवली. ईश्वराचा उजवा डोळा पूर्णपणे निकामी असून त्याच्या डाव्या डोळ्याचीही ५० टक्के दृष्टी गेलेली आहे. येत्या काळात जागतिक अजिंक्यपद स्पर्धेची तयारी करणार असल्याचे त्याने सांगितले.

कोल्हापूरच्या स्नेहल बेनाडे हिने महिलांच्या गोळाफेकमध्ये एफ १२/१३ प्रकारात महाराष्ट्रासाठी रौप्यपदक जिंकले. तिने ७.४० मीटर अंतरावर गोळा फेकला. २० वर्षीय स्नेहल सध्या गोवा येथे आयआयटीमध्ये अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षाला शिकत आहे. दीड वर्षापूर्वीपासून तिने गोळाफेक करायला सुरुवात केली. खेळ आणि करीअर दोन्ही सुरू ठेवण्याची इच्छा तिने व्यक्त केली.

महिलांच्या एफ ५६ प्रकारात मीना पिंगाने हिने १७.०३ मीटर थाळीफेक करत तिसरे स्थान मिळवले. राजश्री कासदेकर हिने भालाफेकमध्ये एफ १२, १३ प्रकारात २०.२४ मीटर कामगिरीसह कांस्यपदक प्राप्त केले. (वृत्तसंस्था)

# मुंबई, पुणे व ठाण्याचे निसटते विजय

### कै. भाई नेरूरकर चषक राज्य खो-खो स्पर्धा

**इचलकरंजी, दि. २५ मार्च-**

कै. भाई नेरूरकर चषक राज्य खो-खो स्पर्धेत मंगळवारी तीन सामने केवळ एका गुणाच्या फरकाने झाले.

राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथील विठ्ठल रामजी शिंदे शाळा क्रमांक २१च्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. पुरुष गटात मुंबईने धाराशिवला, पुण्याने ठाणेला तर किशोरी गटात पुण्यानेच ठाणेवर केवळ एका गुणाने मात करीत मंगळवारचा दिवस गाजविला.

पुरुष गटातील चुरशीच्या सामन्यात सनी तांबेचा (१.५०, १.00 मिनिटे २ गुण) अष्टपैलू खेळ व वेदांत देसाईच्या ५ बळीच्या जोरावर मुंबईने धाराशिवला एक गुणाने नमविले. मध्यंतराची १0-८ ही २ गुणाची आघाडीच त्यांना विजय मिळवून दिली. धाराशिवच्या रवी वसावे (१.३0, १.00 मिनिटे) व श्रीशंभो पेठे (४ गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले. आणखी एका चुरशीच्या सामन्यात पुण्याने ठाणेवर १८-१७ अशी एका गुणानी मात केली. मध्यंतराच्या ९-१0 असा एका गुणाच्या पिछाडीवरून पुण्याने बहारदार खेळी करीत विजय खेचून आणला. पुण्याच्या साहिल चिखले याने ७ गडी बाद करीत १.४0 मिनिटे संरक्षण केले. ठाण्याकडून शुभम जाधव १.१0, १.५0 मिनिटे पळती केली.

किशोरी गटातील पुणे विरुद्ध ठाणे हा सामनाही १९-१८ असा एका गुणाने झाला. मध्यंतराच्या ९-७ ही दोन गुणाची आघाडीच त्यांनी विजयश्री मिळवून दिली. पुण्याकडून आरती घट्टे ( १.४0 मि. व ५ गुण) तर ठाण्याकडून प्रणिती जगदाळे (२.१0 मि. व ५.४0 मिनिटे) यांनी अष्टपैलू कामगिरी केली.



अन्य गटातील सर्व सामने एकतर्फीच झाले.

**अन्य निकाल असे :**

**किशोर :** सांगली वि. वि. धाराशिव १४-११ तीन गुण व ५.२0 मिनिटे राखून, कोल्हापूर वि. वि. सातारा २0-१३ दोन गुण व एक मिनिटे राखून, सातारा वि. वि. ठाणे १३-१२ एक गुण व ३ मिनिटे राखून, सांगली वि. वि. नागपूर १७-८ नऊ गुण व डाव राखून, पुणे वि.वि. नागपूर ११-७ एक डाव ४ गुणानी.

**किशोरी :** पुणे वि. वि. नागपूर १३-१0 एक डाव ३ गुणांनी, सांगली वि. वि. धाराशिव १५-८ सात गुणांनी, ठाणे वि. वि. सोलापूर १४-१0, कोल्हापूर वि. वि. बुलढाणा ११-५ एक डाव ६ गुणांनी.

**पुरुष :** अहिल्यानगर वि. वि. गडचिरोली १४-१२ दोन गुण व ८.२0 मिनिटे राखून, सांगली वि.वि. अमरावती १५-१४ एक गुण व ७.५0 मिनिटे राखून, सोलापूर वि. वि. अमरावती १४-१३ एक डाव १ गुणांनी, कोल्हापूर वि. वि. मुंबई २0-१२ आठ गुणांनी.

**महिला :** सोलापूर वि. वि. नागपूर १३-१0 एक डाव ३ गुणांनी, सांगली वि. वि. अकोला ११-६ एक डाव ५ गुणांनी, कोल्हापूर वि. वि. नाशिक १४-१३ एक गुण व ५.५0 मिनिटे राखून, धाराशिव वि.वि. मुंबई १२-७ एक डाव ५ गुणांनी, मुंबई वि. वि.अमरावती ९-७ एक डाव २ गुणांनी.



# 'ऑर्किड'चा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे स्मॉश २०२५ वार्षिक क्रीडा महोत्सव व रेन्बो २०२५ वार्षिक सांस्कृतिक महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

स्मॅश २०२५ अंतर्गत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, जसे की क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, फुटबॉल आणि मैदानी क्रीडा प्रकारासोबत कॅरम, बुध्दीबळ, टग ऑफ वॉर इत्यादी क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे महोत्सवाला रंगत आली. क्रीडाप्रेमींनी उत्कृष्ट खेळाचा अनुभव घेतला आणि विविध खेळांमध्ये उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना गौरवण्यात आले.

रेन्बो २०२५ सांस्कृतिक महोत्सवाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ दिले. नृत्य, गायन, नाटक, फॅशन शो आणि पेंटिंग स्पर्धांनी महोत्सवाची शोभा वाढवली. यावर्षीचा विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेले ''संस्कृतीचे दर्शन'' या विषयावरील सादरीकरण, ज्याला उपस्थितांनी जोरदार प्रतिसाद दिला.हा द्विदिवसीय कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी नवीन ऊर्जा आणि प्रेरणा घेऊन आला असून, त्यातून टीमवर्क, नेतृत्व आणि सर्जनशीलतेला चालना मिळाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. स्मॅश २०२५ आणि रेन्बो २०२५ महोत्सवाचा समारोप जल्लोषात आणि आनंदाच्या वातावरणात करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### अक्कलकोटमध्ये शरण बसवेश्वर महाराजांची यात्रा उत्साहात

**अक्कलकोट, दि. २५ मार्च-**

कलबुर्गीचे (राज्य कर्नाटका) ग्रामदैवत शरण बसवेश्वर महाराज यांची यात्रा महोत्सव मोठया उत्साहात लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाली. हजारो भाविकांनी रथ ओढला शरण बसवेश्वर महाराज की जय जयघोषाने सारा आसमंत दुमदुमुन गेला होता. रथोत्सवाने यात्रा महोत्सवाची सांगता झाली. कलबुर्गी जिल्हयासह बिदर-विजयपूर महाराष्ट्रातील लातुर सोलापुर उस्मानाबाद जिल्ह्यातील लाखो भाविक शरण बसवेश्वर यात्रेकरिता रथोत्सवाकरिता एकत्र आली होती. पहाटेपासून दर्शनाकरिता भाविकांनी शरण बसवेश्वर देवालय येथे गर्दी केली होती. कलबुर्गी शहरात पहाटेपासुन घरोघरी सडासांमर्जन रांगोळी घालून भाविक दर्शनाकरिता मार्गस्थ झाले होते. शरण बसवेश्वर महाराज की जय च्या घोषात हजारो भाविकांनी सुर्यास्त दरम्यान रथ ओढला. रथावर भाविकांनी खारीक, केळी पुष्पमालाची उधळण केली. यात्रे दरम्यान भाविकांनी श्रीफळ वाढविले पेढे वाटले. कलबुर्गी शहरात ठिकठिकाणी भाविकांसाठी महाप्रसादाची सोय केली होती. यात्रे दरम्यान प्रासादिक वस्तुंची मोठी उलाढाल झाली. लहान मुलांकरिता पाळणे, खेळणीची दुकाने थाटली होती.



### स्व. अण्णासाहेब पाटील यांची पुण्यतिथी साजरी

**पंढरपूर, दि. २५ मार्च-**

क्रांतिसूर्य, कष्टकऱ्यांचे कैवारी, माथाडी कामगार नेते स्व. अण्णासाहेब पाटील यांची पुण्यतिथी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ उपकेंद्र, पंढरपूर कार्यालयामध्ये साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थितांकडून स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अण्णासाहेब पाटील महामंडळाचे जिल्हा समन्वयक सौरभ मगर लोकमंगल बँकेचे वसुली अधिकारी ॲड. शिवाजी दरेकर, लोकमंगल बँकेचे व्यवस्थापक विनोद जगदाळे, महेश यादव, शिवाजी मोरे, विशाल बागडे उपस्थित होते.



### करमाळा येथे कायदेशिषयक शिबीर

**करमाळा, दि. २५ मार्च-**

पंचायत समिती हॉल (ता. करमाळा) येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज एस. शर्मा व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव यु.पी. देवर्षी व तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष संजय घुगे यांचे मार्गदर्शनानुसार कायदेशीर शिबीर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष संजय घुगे व एस.पी. कुलकर्णी, अमित कदम, ॲड आर.ए. बरडे, ॲड. एस.ए. रोकडे, ॲड.पी. व्ही. बागल, ॲड. अक्षय वीर, ॲड.ए. ए. पवार, ॲड. सविता शिंदे, ॲड. डी. एम. कांबळे उपस्थित होते. प्रस्ताविक व सूत्रसंचालन एस. एल. जाधव यांनी केले. कार्यक्रमास ॲड. पी. व्ही. बागल यांनी आम्ल हल्ला, ॲड. अक्षय वीर यांनी बालविवाह प्रतिबंध कायदा, ॲड. सविता शिंदे यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिन हे विषय समजावून सांगितले तर माननीय न्यायाधीश एस.पी. कुलकर्णी यांनी कौटूंबिक हिंसाचार कायदा या विषयावर मार्गदर्शन केले. आभार करमाळा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अमित कदम यांनी केले.



### मारापूर येथील दलित वस्ती समाज मंदिराच्या बांधकामाचे भूमिपूजन

**मंगळवेढा, दि. २५ मार्च-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत मारापूर येथील निधी मंजूर झालेल्या दलितवस्ती समाज मंदिराचे भूमिपूजन सरपंच विनायक यादव यांच्या हस्ते व ग्रामपंचायत पदाधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये तथागत गौतम बुद्ध व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन तसेच श्रीफळ फोडून करण्यात आले. दलित वस्ती भौतिक सोयी- सुविधांच्या अनुषंगाने या भागामध्ये समाज मंदिर उभारण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत होती. या मागणीसाठी आमदार समाधान आवताडे व सरपंच विनायक यादव यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतने संबंधित विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून दलित समाज मंदिरासाठी निधी मंजूर करून घेतला आहे. यावेळी उपसरपंच अशोक आसबे, तंटामुक्ती अध्यक्ष भगवान आसबे, अभिमान जानकर, सिद्धेश्वर बाबर, व्हा. चेअरमन अमोल जानकर,भजनदास जानकर, रामेश्वर माने, मा.सरपंच शुभांगी वाघमारे, सुमन वाघमारे, दिपाली वाघमारे, खंडू कोळी, दासू वाघमारे, अमोल वाघमारे, मंगेश सातपुते, शानूर धनवजीर, स्वप्ना वाघमारे, माधुरी वाघमारे उपस्थित होते.

# मराठा-बहुजन समाजाने एक होऊन पुढे जावे

### सौरभ खेडेकर यांचे प्रतिपादन

### कुर्डूवाडीकरांनी केले जिजाऊ रथयात्रेचे जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २५ मार्च-**

बटेंगे तो कटेंगे हे मराठा आणि बहुजन समाजालाही लागू होते. त्यामुळे मराठा आणि बहुजन समाजाने एक होऊन नव्या उमेदीने पुढे जावे, असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे प्रदेश महासचिव सौरभ खेडेकर यांनी मराठा सेवा संघ संचलित जिजाऊ रथयात्रेच्या कुर्डूवाडीतील सभेत बोलताना केले.

मराठा आणि बहुजन समाजाने एकीने, शांततेने राहून आपली प्रगती केली पाहिजे, युवकांनी भावनिक होऊन आपले आयुष्य बरबाद करू नये. समन्वयाची, समतेची शांततेची जी परिस्थिती महाराष्ट्रात होती ती पुन्हा आणणे गरजेचे आहे. ज्या ज्या देशात धर्मांधता आहे ती राष्ट्रे तळागाळाला गेली आहेत. त्यामुळे बहुजन समाजाने एकीने, समन्वयाने शांततेने राहून वैयक्तिक, सामाजिक प्रगती करणे गरजेचे आहे.




मराठा बहुजन समाजाने विवाहावरील अनावश्यक खर्च टाळावेत. खर्च वाचविणे हे सुद्धा एक उत्पन्न असते असे खेडेकर म्हणाले.

मराठा सेवा संघाच्या वतीने संस्थापक-अध्यक्ष पुरूषोत्तम खेडेकर यांच्या संकल्पनेतून अठरापगड जातीतील मराठा आणि बहुजन समाजबांधवांना एकत्रित करण्यासाठी मराठा सेवा संघाच्या वतीने मराठा जोड़ो अभियान राबविण्यात येत आहे. संपुर्ण महाराष्ट्रभर मराठा जोडो अभियान राबवण्यात येत आहे. यानिमित्तच्या जिजाऊ रथयात्रेचे सोमवारी सायंकाळी कुर्डूवाडीत आगमन झाले. शहरातून रथयात्रेची मिरवणूक काढली. चौकाचौकात जल्लोषात स्वागत झाले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाहीर सभा झाली. यावेळी विचारपिठावर महासचिव खेडेकर, माजी आमदार विनायकराव पाटील, मराठा सेवा संघाचे मार्गदर्शक प्रा.अर्जून तनपुरे, उत्तमराव माने, मनोजकुमार गायकवाड, दिनेश जगदाळे, जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, निता खटके, आशा टोणपे, प्रतिक्षा गोफणे, आशा मोरजकर, मनिषा गाडे, प्रफुल्लता मोहिते, अश्विनी गोरे, अरूणा पाटील, उमाकांत उफाडे, नितीन खटके, आनंद काशीद, तात्यासाहेब पाटील,मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष अमित निमकर, तालुकाध्यक्ष निलेश देशमुख, अरूण जगताप, सर्जेराव बागल, मधुकर भोसले, सुरज मोहिते उपस्थित होते. यावेळी प्रा.अर्जून तनपुरे, मनोजकुमार गायकवाड,सचिन जगताप,हर्षल बागल,आशाताई टोणपे, प्रतिक्षा गोफणे, सचिन काळे यांची भाषणे झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुहास टोणपे,संदेश बागल, तुकाराम भोसले, सचिन महिंगडे, शिवाजीराव गवळी, बाळासाहेब वागज, शंकर नागणे,सतिश महिंगडे, प्रमोद बागल, सौरभ भोसले,प्रशांत बागल, नवनाथ कडबाने,निलेश गवळी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख यांनी तर आभार उपाध्यक्ष मेजर अरूण जगताप यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.सुधीर क्षीरसागर यांनी केले.

## श्रीपूर येथे ४५ वर्षानंतर एकत्र जमले माजी विद्यार्थी



**तभा वृतसेवा,**
**श्रीपूर, दि.२५ मार्च -**

धकाधकीच्या जीवनात माणूस माणसापासून दूर होत चालला आहे . त्यामुळे समाजात आपुलकीची भावना कमी होत असताना ४५ वर्षानंतर दहावीतील माजी विद्यार्थी एकत्र येतात ही आनंदाची पर्वणी तर आहेच तसेच जगण्याची नवीन उमेद व नवीन उर्जा देणारी घटना असल्याचे प्रतिपादन डॉ. सुधीर पोफळे यांनी केले.

येथील ४५ वर्षापूर्वीच्या इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा पार पडला. यावेळी डॉ. पोफळे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी चंद्रशेखर विद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग बनसोडे सहोते. यावेळी माजी विद्यार्थी डॉ. विजय डहाळे, देवा काळे, अशोक शिंगटे व्यासपीठावर उपस्थित होते. चंद्रशेखर विद्यालयास १९८० साली ५० वर्ष पूर्ण झाल्याने ही बॅच सुवर्ण वर्ष म्हणून संबोधली जाते. प्रथम श्रीपूर नगरीचे संस्थापक जेष्ठ उद्योगपती कै . चंद्रशेखर आगाशे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर प्रास्ताविकात रविंद्र गरुड यांनी वर्ग मित्रांची भेट व विशेषतः ज्या शाळाने, मातीने व शिक्षकांनी आपणांस संस्कारीत केले त्यांचे प्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा मेळाव्याचा उद्देश असल्याचे सांगितले. याप्रसंगी प्रा. पांडुरंग बनसोडे तसेच विद्यार्थ्यांमधून राणी कुलकर्णी , रविंद्र गरुड , रोहीणी विभूते, आशुमती पाटील , मोहन वेलणकर यांनी मनोगत व्यक्त केले. स्नेह मेळाव्यास कोल्हापुर , सांगली, पुणे, महाड या भागातून माजी विद्यार्थी आले होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी डॉ . विजय डहाळे , देवा काळे, प्रविण पेंन्डसे, रमेश मिस्कर, हेमंत दिक्षित ,आनंद ताकतोडे , हरी पोखरे, कुमार वाघमारे , प्रभू भगत यांनी परिश्रम घेतले. डॉ . विजय डहाळे यांनी आभार मानले.विद्यार्थी दशेतील अविस्मरणीय आठवणी, मनोरंजनाने मेळाव्याची सांगता झाली.

## नांदेड-एलटीटी, कुर्ला-नांदेड ट्रेनला बार्शी व धाराशिवला थांबा द्या

### मागणी मान्य न केल्यास आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ मार्च-**

मध्य रेल्वेने ९ एप्रिल ते २५ जून या काळात उन्हाळी सुट्टीसाठी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई ते हजूर साहिब नांदेड व्हाया कल्याण, पुणे, कुर्डूवाडी, बार्शी, लातूर मार्गे विशेष गाडीच्या २४ फेऱ्या पूर्ण करण्याचे ठरविले आहे. परंतु या स्पेशल ट्रेनला बार्शी व धाराशिव हे दोन्ही महत्वाचे थांबे दिलेले नाहीत. रेल्वे प्रवासी सेलच्यावतीने हे थांबे देण्याची मागणी करण्यात आली आहे. हा थांबा मिळण्यासाठी आंदोलन करणार असल्याचेही सेलचे अध्यक्ष शैलेश वखारिया, रेल्वेचे अभ्यासक कनिष्क बोकेफोडे व रेल्वे प्रवासी अजित काळे गोरे यांनी सांगितले. ०११०५ ही गाडी लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथून दर बुधवारी पहाटे १२.५५ वाजता निघेल, पुणे पहाटे ४.०५ वाजता, कुर्डूवाडी सकाळी ७.३५ वाजता, लातूर दुपारी १.२० वाजता, नांदेड स्थानकावर त्याच दिवशी संध्याकाळी ९ वाजता पोहोचेल. ०११०६ ही गाडी नांदेडहुन बुधवार दि. १२ मार्च व १९ मार्च रोजी रात्री १०.३० वाजता निघेल लातूर गुरुवारी पहाटे ५.३० वाजता, बार्शी सकाळी ७.३५ वाजता, कुर्डूवाडी सकाळी ८.३५ वाजता, पुणे सकाळी ११.४० वाजता, लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथे गुरुवारी संध्याकाळी ४.०५ वाजता पोहोचेल. डबे संरचना- एक पेंट्री कार, एक फर्स्ट एसी, एक सेकंड एसी, पाच थर्ड एसी, आठ स्लीपर, चार जनरल, एक व्दितीय श्रेणी कम दिव्यांग एसएलआर व एक पॉवर कार असे २२ एलएचबी डबे असतील.

## 'त्या' खून प्रकरणातील आरोपीस चार दिवसाची पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२५ मार्च**

शेतीसाठी लागणारे ठिबक सिंचनाचे साहित्यासाठी घेतलेल्या पैशाच्या कारणावरून मित्र महेश उदयकुमार गोवर्धन याचा खून केल्याप्रकरणी पोलिसांनी भीम राव उर्फ बाळू कृष्णा चौगुले (रा.बोराळे) यास अटक करून मंगळवेढा न्यायालयाचे न्यायाधीश व्ही.के.पाटील यांच्यासमोर उभे केले असता त्यांनी आरोपीस चार दिवसाची पोलिस कोठडी सुनावली.

या घटनेची हकिकत अशी, यातील आरोपी भिमराव उर्फ बाळू चौगुले व मयत महेश गोवर्धन हे दोघे खास मित्र होते. आरोपीने मध्यस्थी राहून मयतास बटईने घेतलेल्या तामदर्डी येथील शेतीसाठी लागणारे ठिबक सिंचनचे साहित्य घेवून दिले होते. या साहित्याचे पैसे मयत याच्याकडून येणे बाकी होते. त्यामुळे आरोपी हा सतत मयतास फोन करून पैसे मागत असल्याने वादावादी झाली होती. याचा राग मनात धरून दि.२३ रोजी ९.३० वा. बोराळे गावातील छत्रपती चौकात मयताच्या छातीत चाकूसारख्या हत्याराने वार करून खून करण्यात आला होता.तपासिक अंमलदार सहाय्यक पोलिस निरिक्षक अंकुश वाघमोडे यांनी आरोपी भिमराव उर्फ बाळू कृष्णा चौगुले यास अटक करून न्यायालयात मंगळवार दि.२५ मार्च रोजी उभे केले. यावेळी सरकार पक्षाच्यावतीने ॲड.अमोल क्षीरसागर यांनी गुन्हयात वापरलेला चाकू जप्त करणे,सदरचे हत्यार कोठून आणले याचा तपास करणे,ठिबक सिंचनचे साहित्य कोणत्या दुकानातून उधारीवर खरेदी केले याचा तपास घेणे,सदर गुन्हयामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे काय याचा शोध घेणे,घटना घडल्यानंतर आरोपी फरार झाला होता.त्याला पळून जाण्यासाठी कोणी मदत केली काय आदींचा शोध घेणे आदी मुद्दे न्यायालयापुढे मांडल्यानंतर न्यायालयाने चार दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. आरोपीच्यावतीने ॲड.धनंजय हजारे व ॲड.दत्तात्रय माने यांनी काम पाहिले.


## पिलीवसह तीन ग्रामपंचायतीत निवडणूक

### आज होणार अंतीम मतदार याद्यांचे प्रसिद्धीकरण

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २५ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव, झिंजेवस्ती व सुळेवाडी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रक्रिया सुरू झाली असून १९ मार्च रोजी प्रभागनिहाय यादयांचे प्रसिद्धीकरण झाले. तर २४ मार्च पर्यंत यावर हरकती घेण्यात आल्या. उद्या बुधवारी दि.२६ मार्च रोजी अंतीम मतदार यादयांचे प्रसिद्धीकरण करण्यात येणार आहे.

पिलीव ग्रामपंचायत ही सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. यामध्ये सहा प्रभागातुन १७ सदस्य तर सरपंच थेट जनतेतुन असे एकुण १८ सदस्य निवडून द्यायचे आहेत. पिलीव येथे ७ हजार ७५७ मतदार आहेत. यंदा सरपंचपद सर्वसाधारण महिलेसाठी राखीव आहे. पिलीव येथे यंदा सत्ताधारी जहागिरदार पार्टी, नागरी आघाडी व भाजपप्रणीत महालक्ष्मी ग्रामविकास पॅनल अशी तिरंगी लढत होणयाची शक्यता आहे. भाजपने माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनी केलेल्या विकासकामांच्या जोरावर महालक्ष्मी ग्रामविकास पॅनलच्या माध्यमातून निवडणुकीत जोरदार तयारी केली आहे. तिरंगी लढत होणयाची शक्यता आहे. झिंजेवस्ती गावात तीन प्रभाग आहेत. यामध्ये प्रत्येक प्रभागात तीन सदस्य व सरपंच पदाचा एक असे एकुण दहा उमेदवार असणार आहेत. येथील मतदार संख्या २ हजार ३०५ आहे. याठिकाणी सरपंचपद हे ओबीसी पुरुष हया प्रवर्गासाठी आरक्षित आहे. येथे सत्ताधारी विरुद्ध माजी सरपंच विठ्ठल मदने यांचे पॅनल अशी दुरंगी लढतीची शक्यता आहे. तर सुळेवाडी गावात एकुण तीन प्रभाग आहेत. यामध्ये प्रत्येकी



तीन उमेदवार असे एकुण ९ सदस्य व एक सरपंच पद असे दहा जागासाठी निवडणुक होणार आहे. या गावची मतदार संख्या दोन हजार ८७२ एवढी आहे. येथील सरपंचपद हे सर्वसाधारण घटकासाठी राखीव आहे. याठिकाणी पारंपरिक दोन पॅनल मध्ये दुरंगी लढत होईल. या गावातील अनेक मतदार हे वसई व इतर ठिकाणी कामाला आहेत. गावात मोजकेच मतदार हे गावात ,वाडयावस्तयावर आहेत.. तर बचेरी गावातील एका प्रभागातील एक सदस्य पद रिक्त आहे. या जागेची पोटनिवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे.

पिलीव जिल्हा परीषद गटातील पिलीव, झिंजेवस्ती व सुळेवाडी या तिन्ही गावातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकांची प्रक्रीया सुरू झाली असुन यासाठी मोर्चे बांधणीला सुरूवात झाली आहे. ऐन उन्हाळ्यात निवडणुकांमुळे वातावरण तापले आहे.

## चव्हाणवाडीच्या सरपंचपदी स्मिता नांगरे-पाटील

**तभा वृत्तसेवा**
**टेंभूर्णी, दि. २५ मार्च-**

चव्हाणवाडी टें (ता. माढा) ग्रामपंचायतच्या सरपंचपदी स्मिता नांगरे-पाटील यांची बिनविरोध निवड झाली.

निवडणूक अधिकारी म्हणून सागर सोनवणे यांनी काम केले. तलाठी शिवाजी घाडगे, ग्रामसेवक आर. डी. यादव, कोतवाल नासिर काळे, धीरज गायकवाड यांनी सहकार्य केले. सरपंचपदासाठी एकच अर्ज आल्याने निवड बिनविरोध झाली. ज्योती इंदलकर सूचक होत्या. यावेळी पाच सदस्य हजर तर दोन सदस्य गैरहजर होते. निवडणूक अधिकारी सोनवणे यांनी सरपंचाचे नाव जाहीर करताच रमेश नांगरे व बाळासाहेब नांगरे यांनी जल्लोष केला. यावेळी सुभाष इंदलकर, मोहन चव्हाण, भागवत खडके, सुभाष चव्हाण, हनुमंत जाधव, सतीश मिस्किन, तानाजी चव्हाण, बाळासाहेब मोटे, सुनील नांगरे, विजय कदम, भीमराव नांगरे, अनिल नांगरे, पोलीस पाटील हनुमंत इंदलकर, जमाल काझी, अनिल जगताप, संचालक महावीर नांगरे, अनिल चव्हाण, विलास नांगरे, रमेश नांगरे, कल्याण नांगरे, अमोल नांगरे, सागर चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, राजकुमार नागणे, अमोल नागणे, खंडू नागणे, ज्योतीराम पवार, ज्योतीराम शिंदे, औदुंबर खडके, रोहन चव्हाण, नितीन चव्हाण उपस्थित होते.



> चव्हाणवाडी टें येथील प्रस्थापित दोन्ही पार्ट्या त्यांच्या विचाराला ठाम राहिल्याने त्यांच्या विरोधात चार सदस्य गेल्याने आज सरपंच पद विरोधात गेले तीच परिस्थिती गेल्या विधानसभा निवडणुकीत सर्व प्रस्थापित नेते एक साईटला व जनता सदस्य एक साईटला झाले होते तेच या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये चव्हाणवाडी पाहायला मिळाले अशीच परिस्थिती प्रस्थापित पार्ट्यांनच्या विचारांची राहीली तर येणाऱ्या काळात ७८ गावातील ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये बरेच ठिकाणी बदल झालेला दिसेल.

## बार्शीतील महावितरण अभियंता सुरेश कु-हाडे निलंबित

### गैरव्यवहार प्रकरणी चौकशी समितीची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २५ मार्च -**

महावितरणच्या बार्शी विभागातील कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणी महावितरण प्रशासनाने कारवाई करत चौकशी समितीच्या अहवालानुसार कार्यकारी अभियंता सुरेश विठोबा कु-हाडे यांस तात्काळ निलंबित केले. याचप्रकरणात सहाय्यक अभियंता गणेश कांबळे यांची चौकशी सुरू असून त्यांच्यावरही लवकरच कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

येथील महावितरणमधील गैरव्यवहाराविरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव शिरीष ताटे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानंतर महावितरणच्या सोलापूर मंडळाचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांनी तातडीने चौकशी समिती गठीत केली. या समितीत कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे, उपकार्यकारी अभियंता संभाजी गायकवाड आणि उपव्यवस्थापक प्रदीप सुरवसे यांचा समावेश होता. समितीने घटनास्थळी भेट देऊन संबंधित अभियंते, कर्मचारी आणि नियंत्रण अधिकाऱ्यांचे जबाब नोंदवून अहवाल सादर केला. अहवालात कु-हाडे आणि कांबळे यांनी टेंडरमध्ये अपात्र ठेकेदारांना कामे देऊन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निष्पन्न झाले. चौकशी अहवालाच्या आधारे सुरेश कु-हाडे यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. निलंबन काळात त्यांना मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम आणि महागाई भत्ता मिळणार आहे. त्यांना आठवड्यातून दोन वेळा बारामती ग्रामीण मंडळ कार्यालयात हजेरी लावावी लागेल. तर सहाय्यक अभियंता गणेश कांबळे यांचीही चौकशी सुरू असून लवकरच त्यांच्यावरही कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी आणि दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा श्री. ताटे यांनी दिला आहे. दोषी अधिकाऱ्यांना त्वरित निलंबित करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे. महावितरणच्या बार्शी विभागातील या गैरव्यवहारामुळे कंपनीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुशिक्षित बेरोजगार अभियंता योजनेचा गैरवापर करून अधिकाऱ्यांनी आर्थिक फायद्यासाठी संगनमत केल्याचे उघड झाले आहे. महावितरण प्रशासनाने भविष्यात अशा गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# शुध्दोहम्च्या 30 वर्षांच्या परंपरेला सलाम...

## विश्वास आणि गुणवत्तेची परंपरा जपणारे दागिन्यांचे दालन

शुद्धतेचा ध्यास धरून २६ मार्च १९९५ शुद्धोहम ज्वेलर्सची सुरुवात झाली. जसे नाव तसे सोने म्हणूनच अल्पकालावधीतच शुद्धतेचा शिरोमणी म्हणून ओळख झाली. ९९.५० शुद्धतेच्या पाटली, बांगडी, अंगठी, पोहे हार देणारे दालन, दागिनेच्या शुद्धतेसह सौंदर्य जपणारी कलाकुसर, पारंपारिक तसेच नाविन्यपूर्ण दागिन्यांच्या असंख्य व्हरायटी, चांदीचे दागिनेसह पूजा साहित्याची स्वतंत्र विभाग. अल्पबचतीमधून मोठी गुंतवणूक होण्यासाठी म्हणून ग्राहकांसाठी सुवर्ण समृद्धी योजना सुरू केली, वाजवी किमती सह सर्टिफिकेट डायमंड ज्वेलरी उपलब्ध आहेत. आजच्या झगमगत्या युगात, अनेक व्यवसाय येतात आणि जातात, परंतु काही व्यवसाय आपल्या विश्वासार्हतेमुळे आणि गुणवत्तेमुळे टिकून राहतात. असे एक नाव म्हणजे शुध्दोहम्, जे गेली ३० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाला पात्र ठरत आहे.

१९९५ पासून शुध्दोहम् ज्वेलर्स

**विश्वास आणि परंपरेचा अनमोल ठेवा :** शुध्दोहम् या दागिन्यांच्या दालनाची सुरुवात २६ मार्च १९९५ साली झाली. त्यावेळी छोट्या स्वरूपात सुरू झालेल्या या व्यवसायाने आपल्या उत्कृष्ट कारागिरीने आणि गुणवत्तापूर्ण दागिन्यांनी ग्राहकांच्या मनात खास स्थान निर्माण केले. पारंपरिक मराठी दागिने असोत किंवा आधुनिक डिझाइन्स येथे प्रत्येक पिढीसाठी काही ना काही खास आहे.

**गुणवत्तेची हमी आणि नावीन्याचा संगम :** ३० वर्षांच्या प्रवासात शुध्दोहम् ने कधीही गुणवत्ता आणि विश्वासावर तडजोड केली नाही. इथले कुशल कारागीर पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुंदर संगम साधून अतिशय नाजूक आणि देखणे दागिने तयार करतात. प्रत्येक दागिना हा केवळ सौंदर्याचा भाग नसून, तो एक भावना आणि परंपरेचा वारसा देखील असतो.

**ग्राहकांचा विश्वास आमची खरी संपत्ती :** एका छोट्या दुकानातून सुरुवात करून, आज शुध्दोहम् हे एक विश्वासार्ह ब्रँड बनले आहे. हा प्रवास सोपा नव्हता, पण ग्राहकांचा पाठिंबा आणि प्रेम यामुळेच आम्ही हे यश मिळवू शकलो. लग्नसोहळा असो, असो किंवा कोणताही खास प्रसंग आमच्या दागिन्यांनी प्रत्येक क्षण अविस्मरणीय केला आहे.

**३० वर्षांचा सोनेरी प्रवास पुढील अनेक वर्षांसाठी**
तीन दशकांचा हा प्रवास फक्त सुरुवात आहे. पुढील काळातही शुध्दोहम् नवीन डिझाइन्स,सेवा आणि विश्वासार्हतेची परंपरा कायम ठेवत आपल्या सेवेत राहील. तुम्ही आम्हाला दिलेल्या प्रेमाबद्दल मनःपूर्वक आभार, आणि भविष्यातही हे नाते असेच टिकून राहो, हीच आमची इच्छा!

**- शुध्दोहम् परिवार**





# राजमाता जिजाऊंच्या रथयात्रेचे हुतात्मा नगरीत जल्लोषात स्वागत

**● पारंपरिक ढोल ताशांचा आणि हलगीचा कडकडाट लेझीम ताफ्यासह जेसीबीने यात्रेवर केली पुष्पवृष्टी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मार्च-**

मराठा सेवासंघ संचलित जिजाऊ रथयात्रेचे संपूर्ण राज्यभर आयोजन करण्यात आले आहे. या रथयात्रेचे स्वागत मंगळवार दि.२५ मार्च रोजी सोलापूरच्या हुतात्मा नगरीत मोठ्या जल्लोषात करण्यात आले. मराठा जोडो अभियानांतर्गत जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड यांच्यावतीने सोलापूर शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे या रथयात्रेचे जल्लोषात स्वागत करून जेसीबीच्या साह्याने रथयात्रेवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

या रथामध्ये विराजित करण्यात आलेल्या राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या सिंहासनाधीश्वर पुतळ्याला अभिवादन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर मराठासेवा संघाचे सर्वेसर्वा पुरुषोत्तम खेडीकर, सौरभ खेडीकर आदींसह मराठा सेवा संघाचे तसेच जिजाऊ आणि संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.

दरम्यान, प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी तुतारीच्या मंगल वातावरणात सदरची जिजाऊ रथयात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे मार्गस्थ झाली. पारंपरिक वेशभूषा परिधान करत डोक्याला भगवे फेटे लावून या यात्रेमध्ये महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यावेळी हिंदू रक्षक प्रतिष्ठानच्या वतीने लेझीमचे सादरिकरण करण्यात आले. त्याच पद्धतीने पारंपारिक हालगी आणि टाळ मृदंग यांचा देखील यात्रामार्गत एकच जयघोष करण्यात आला. मराठा जोडो अभियानासाठी सदरची जिजाऊ रथयात्रा छत्रपती संभाजी नगर येथून (दि.१८) मार्च रोजी सुरू झाली असून (दि.१) मे महाराष्ट्र दिनी या दिवशी यात्रेचे समारोप पुण्यातील लाल महाल येथे होणार आहे. या यात्रेच्या माध्यमातून राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मराठा जोडो अभियान साकारले जाणार आहे. राज्यातील परिस्थिती बदलण्यासाठी युवक-युवती, विद्यार्थी, शेतकरी, प्रौढ महिला-पुरुष यांच्याशी संवाद साधण्यासाठी, समाजाला एकसंघ करण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यात बंधुभाव जपत आपल्या ऐक्याचा जागर घालण्यासाठी मराठा सेवा संघाच्या माध्यमातून जिजाऊ रथयात्रा २०२५ अंतर्गत मराठा जोडो अभियान आयोजित करण्यात येत असल्याचे या ४५ दिवसांच्या रथयात्रेत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील प्रमुख शहरे, निमशहरे आणि गावांमध्ये जनसंवाद साधण्यात येईल. कोकणातील तळ भाग वगळता संपूर्ण राज्यभर हा ऐतिहासिक उपक्रम पार पडणार आहे.

यावेळी मराठा सेवा संघाचे सौरभ पुरुषोत्तम खेडेकर, जिल्हा अध्यक्ष डॉ. जी. के. देशमुख, प्रदेशचे प्रशांत पाटील, शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, प्रकाश ननवरे, माऊली पवार, माजी नगरसेवक विनोद भोसले, राजन जाधव, भाऊसाहेब रोडगे, रवि मोहिते, बबलू गायकवाड, अनंत जाधव, सोमनाथ राऊत, लक्ष्मण महाडिक, अविनाश गोडसे, कृष्णा पवार, मनोज गायकवाड आदींसह मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, आणि संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### जिल्ह्यांमध्ये मराठा जोडो अभियान साकारणार

मराठा सेवा संघ ही नोंदणीकृत सार्वजनिक संस्था असून, गेल्या ३५ वर्षांपासून समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी परिवर्तनवादी, प्रगतशिल आणि सकारात्मक कार्य करीत आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मराठा जोडो अभियान साकारले जाणार आहे. समाजाच्या हितासाठी विविध ३३ कक्षांच्या माध्यमातून महाराष्ट्रासह देशपातळीवर कार्यरत असलेल्या मराठा सेवा संघाने अनेक ऐतिहासिक उपक्रम राबवले आहेत.

**- सदाशिव पवार,**
जिल्हा उपाध्यक्ष मराठा सेवासंघ



# महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे या संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्या विविध शाखेतर्फे सत्कार करण्यात आला.

प्रारंभी बाळे येथील ज.रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मोहनराव घोडके, इंदिरा प्रशाला बाळे च्या मुख्याध्यापिका महादेवी दुर्गे, कोंडी येथील जिजामाता प्रशालेचे मुख्याध्यापक उदय जाधव, जिजामाता प्राथमिक शाळा कोंडीचे मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलू राजीव प्राथमिक शाळा बाळेचे मुख्याध्यापक शिवाजी आतकरे, शरद बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका पुष्पलता जगताप यांनी तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, अंगणवाडी सेविका आदिनी शुभेच्छा दिल्या. नवी पेठ येथील राष्ट्रविकास प्राथमिक शाळा व त्यांचा स्टाफ तसेच इंदिरानगर येथील इंदिरा ज्ञानवर्धिनी संस्थेचे सेक्रेटरी भिकाजी गाजरे यांनीही शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेच्या सचिव शिल्पाताई ठोकळ, सत्वजीत ठोकळ यांची प्रमुख उपस्थिती होती. निर्मलाताई ठोकळ प्रशालेचे मुख्याध्यापक दत्ता गाजरे व त्यांच्या शिक्षक, शिक्षिका सहकाऱ्यांनी केक कापून शुभेच्छा दिल्या. तसेच सोलापूर जिल्हा स्काऊट संघटक श्रीधर मोरे, सोलापूर जिल्हा स्काऊट गाईड संघटिका अनुसया शिरसट, स्काऊट सहाय्यक बंडू बंडगर यांनीही शुभेच्छांचा वर्षाव केला.



# भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकीचे रवींद्र गायकवाड यांची विश्वस्तपदी निवड

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग महाविद्यालयाचे इंजिनियर अध्यक्ष रवींद्र डी. गायकवाड यांची २४ फेब्रुवारी २०२५ पासून पाच वर्षाकरिता नवीन केंद्रीय असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंट ऑफ डिप्लोमा इन्स्टिट्यूट महाराष्ट्र यांची पुणे विभागातून विश्वस्तपदी निवड झाली. असोसिएशनची विशेष सर्वसाधारण सभा १८ फेब्रुवारी रोजी ऑनलाइन द्वारे संपन्न झालेल्या असोसिएशन सभेत दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ ते २३ फेब्रुवारी २०३० या कालावधीसाठी घटनेतील तरतुदी प्रमाणे केंद्रीय व्यवस्थापन समिती पदाधिकाऱ्यांची बैठकी ही निवड झाली. त्यांचा प्राचार्य डॉ. अनिल देशमाने आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतर्फे सत्कार करण्यात आले.

# 'ऑक्टेव २५' भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे सोलापुरात आयोजन

**● ३०० कलाकार करणार ईशान्येकडील कलांचे सादरीकरण; आज उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

संस्कृती मंत्रालय, भारत सरकार, दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर आणि महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभाग मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरात येत्या २६ ते २८ मार्च या कालावधीत '' ऑक्टेव २५'' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभीषण चवरे आणि दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या संचालक आस्था कार्लेकर यांनी ही माहिती दिली.



सोलापूर : ह.दे.प्रशालेच्या मैदानावर पूर्वोत्तर राज्याचा संगीत, नृत्याविष्काराची जय्यत तयारी करण्यात येत आहे. मंगळवारी टिपलेले छायाचित्र (छायाचित्र :केवल तिवारी)

याचे उद्घाटन २६ मार्च रोजी सायंकाळी साडेसहा वाजता मान्यवरांच्या हस्ते होईल. माहिती व तंत्रज्ञान व सांस्कृतिक विभागाचे कार्यमंत्री आशिष शेलार आणि पालकमंत्री जयकुमार गोरे, धाराशिवचे खासदार ओमप्रकाशराजे निंबाळकर, ,सोलापूरच्या खासदार प्रणितीताई शिंदे, माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, सुभाष देशमुख, नारायण पाटील, उत्तमराव जानकर, अरुण लाड, दिलीप सोपल, समाधान आवताडे, राजू खरे, जयंत आसगांवकर, विजय देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, अभिजीत पाटील, बाबासाहेब देशमुख, आणि आमदार देवेंद्र कोठे आदी मान्यवर उपस्थित राहतील.

ईशान्य भारतातील ३०० कलाकारांचा समावेश असलेला हा सांस्कृतिक कार्यक्रम हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर तीन दिवस दररोज सायंकाळी ६.३० ते रात्री ९.३० या वेळेत होईल. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या प्रयत्नातून हा कार्यक्रम येथे होत आहे. या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून ईशान्य भारतातील संस्कृती, हस्तकला,खाद्यसंस्कृती तसेच लोककला यांचा सोलापूरकरांना अनुभव घेता येणार आहे. तीन दिवस चालणारा हा कार्यक्रम विनामूल्य असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले आहे.सांस्कृतिक कार्यक्रम बरोबरच हस्तकला प्रदर्शन, विक्री तसेच स्वादिष्ट पदार्थांचे विक्री स्टॉल्सही असणार आहेत त्यामळे ईशान्येकडील खाद्यपदार्थांचा आस्वादही सोलापूरकरांना घेता येणार आहे. सोलापुरात हा कार्यक्रम प्रथमच होत असून सोलापुरातील कलाक्षेत्रातही या कार्यक्रमाची उत्सुकता राहिली आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक मंत्रालय तसेच कार्य विभागाचे प्रतिनिधी परिश्रम घेत आहेत.

# संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई १८ एप्रिलला प्रदर्शित होणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२५ मार्च -**

सामाजिक छळवादाने होरपळून निघालेल्या विठ्ठलपंतांच्या पोटी निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई या विभूती जन्मास आल्या, ज्ञानसाधना, जीवनाविषयी अनासक्ती, कठोर वैराग्य हीच ज्ञानेश्वरादी भावंडांना वारसा म्हणून लाभलेली संपत्ती होती. वैयक्तिक आत्मोद्धाराला लोकोद्धाराची जोड देऊन आत्मकल्याण आणि विश्वकल्याण साधणाऱ्या मुक्ताई आणि त्यांच्या कुटुंबाचा जीवनप्रवास उलगडून दाखविणारा संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई हा चित्रपट १८ एप्रिलला प्रदर्शित होत असल्याची माहिती दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई या चित्रपटाची प्रस्तुती ए.ए. फिल्म्स ही नामांकित वितरण संस्था करीत आहे. या चित्रपटात आव्हानात्मक संत ज्ञानेश्वरांच्या भूमिकेत अभिनेता तेजस बर्वे तर संत मुक्ताईची भूमिका नेहा नाईक दिसणार आहेत. या चित्रपटाची निर्मिती रेश्मा कुंदन थडानी यांनी केली असून लेखन स्वतःचे असल्याचे दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी प्रारंभी म्हटले. ८४ वर्षानंतर संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई हा चित्रपट घेऊन मराठी सिनेरसिकांपर्यंत येत आहोत. संत मुक्ताई च्या अलौकिक स्वरूपात, मातेचे वात्सल्य, कारुण्याचा परमोत्कर्ष, भगिनीचा अवखळपणा, ज्ञानाचा निरंतर वाहणारा झरा यांसारख्या अनेक गोष्टी एकाच वेळी प्रकटलेल्या पाहायला मिळतात. मुक्ताई संत ज्ञानेश्वरांच्या प्रेरणास्थान होत्या. वारकरी परंपरेत या चारही भावंडांचे कार्य अलौकिक आहे. हे श्रेष्ठत्व सहज मिळालेले नव्हते, तर त्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना मोठ्या दिव्यातून जावे लागले. त्यात सर्वांत लहान असलेल्या मुक्ताईला मोठी जबाबदारी स्वतःवर घ्यावी लागली. मुक्ताई यांचे साहित्य-विचार परखड, जाज्वल, मार्गदर्शक आहेत. ज्ञानी संतांना आपल्या प्रखर विद्वत्तेने आणि अधिकारवाणीने गुरुमंत्र देऊन ही शलाका तळपती झाली. त्यांच्या आठवणींचा, अभंगांचा त्याच्या ध्येयाचा लख्ख उजेड मात्र आजही मागे उरला आहे. त्यांचे ताटीचे अभंग हे संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी निर्मिती मागची प्रेरणा होती. मुक्ताईंनी निभावलेल्या याच माता, भगिनी, गुरू, मैत्रीण अशा विविध भूमिकांचे पदर संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई या चित्रपटातून उलगडणार आहेत, असं दिग्दर्शक लांजेकर यांनी सांगितले. या चित्रपटात संत निवृत्तीनाथांच्या भूमिकेत अक्षय केळकर तर संत सोपानकाकांची भूमिका सूरज पारसनीस यांनी साकारलीय. यासोबत समीर धर्माधिकारी, मृणाल कुलकर्णी, अजय पुरकर, मनोज जोशी, योगेश सोमण, स्मिता शेवाळे, सचिन देशपांडे, अभिजीत शवेतचंद्र, नुपूर दैठणकर, आदिनाथ कोठारे यांच्यासुद्धा चित्रपटात भूमिका आहेत. यावेळी तेजस बर्वे, नेहा नाईक आणि अजय पूरकर उपस्थित होते.



सोलापूर : १८ एप्रिलला रिलीज होणाऱ्या संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई या मराठी सिनेमाच्या कलावंतांनी दैनिक तरुण भारत कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी कलाकारांसमवेत दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने.

### यांनी सांभाळली ही जबाबदारी !

संगीताची जबाबदारी अवधूत गांधी, देवदत्त बाजी यांनी सांभाळली आहे. छायाकन संदीप शिंदे तर संकलन सागर शिंदे, विनय शिंदे याचे आहे. कला दिग्दर्शन प्रतीक रेडीज तर ड्रोन आणि स्थिर छायाचित्रण प्रथमेश अवसरे यांचे आहे. रंगभूषेची जबाबदारी अतुल मस्के तर वेशभूषेची जबाबदारी सौरभ काबळे यांनी सांभाळली आहे. नृत्यदिग्दर्शन किरण बोरकर तर ध्वनी आरेखन निखिल लांजेकर यांचे आहे. पार्श्वसंगीत शंतनू पांडे यांनी दिले आहे. साहसदृश्ये बब्बू खन्ना यांची तर सहनिर्माते सनी बक्षी आहेत,कार्यकारी निर्मात्या केतकी गद्रे अभ्यंकर आहेत, असंही दिग्पाल लांजेकर यांनी म्हटले.

# कॉम्प्युटर ग्रुपमध्ये ए.जी.पाटील पॉलिटेक्निकचा प्रथम क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

ए. जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये ''२२५'' ही राष्ट्रीय स्तरावरील टेक्निकल पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेसाठी कर्नाटक व महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून एकूण १३० स्पर्धकांनी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने भाग घेतला. या स्पर्धेसाठी पाच विभागातून वेगवेगळ्या विषयांवर आधारित टेक्निकल पेपर्स सादर करण्यात आले. यात कॉम्प्युटर ग्रुपमध्ये ए.जी. पाटील पॉलिटेक्निक प्रथम क्रमांक पटकाविला.

त्यातील निवडक पेपर्सचे प्रेझेंटेशन विद्यार्थ्यांनी परीक्षकांसमोर ऑफलाइन व ऑनलाइन माध्यमातून दिले. या स्पर्धेसाठी प्रा. देशमुख एम. एन. (कॉम्प्युटर विभाग), डॉ. साखरे एस. आर. (इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन विभाग), प्रा. जवेरी डी. ए. (मेकॅनिकल विभाग), इंजिनीयर संगमनाथ उप्पीन (सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग) आणि प्रा. साबळे जी. बी. (इलेक्ट्रिकल विभाग)या बाह्य परीक्षकांनी काम पाहिले.

सर्व विजेत्यांचे पारितोषिक वितरण डॉ. आनंद प्रकाश, युनिव्हर्सिटी पुणे यांच्या हस्ते करण्यात आले. विजेत्यांना मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख बक्षीस अशा स्वरूपात पारितोषिक देण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते, २२५ स्पर्धेचे कन्व्हेनर प्रा. एल. एस. मरगूर, शैक्षणिक समन्वयक एस. एन. गवंडी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर एम. एम. कुलकर्णी, सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एन. बी. पवार, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख टी. एल. पाटील, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एस. एस. लिगाडे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एस. आर. बागबान, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख आर. एस. मोटगी व प्रथम वर्ष इन्चार्ज व्ही. आर. आवटे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे बक्षीस वाचन प्रा. एन बी पवार सरांनी केले. एस.एन गवंडी यांनी सूत्रसंचालन केले.



**विभागवार प्रथम क्रमांकाचे मानकरी**

कॉम्प्युटर : अनुष्का सिंदगी व भूमिका दिवटे (ए.जी.पाटील). मेकॅनिकल : प्रमोद उमदी व प्रणित तिऱ्हेकर (एस.इ.एस. पॉलिटेक्निक). इलेक्ट्रिकल : तहनियतुन्नीसा चांदा (व्ही.व्ही.पी.पॉलिटेक्निक). इलेक्ट्रॉनिक्स: अथर्व कुलकर्णी व प्रथम वशिष्ठ (झील पॉलीटेक्निक पुणे). सिव्हिल इंजिनिअरिंग : कृष्णाली मोरे व अक्षय नरळ (शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर).




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# नागरिकांना क्यूआर कोडवर तक्रार नोंदवण्याची सुविधा

## सेतूसंबंधीच्या तक्रारीसाठी क्युआर कोडची सुविधा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ मार्च-**

पंढरपूर उपविभागातील पंढरपूर व मोहोळ तालुक्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्र व सेतू कार्यालयात दर्शनी भागात क्यूआर कोड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. संबंधित नागरिकांनी क्यूआर कोड स्कॅन करून यावर तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, यावरील तक्रारीची तात्काळ दखल घेऊन त्यासंबंधी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

पंढरपूर उपविभागातील पंढरपूर व मोहोळ तालुक्यातील सर्व महा ई-सेवा केंद्र तसेच सेतू कार्यालय, तहसील कार्यालय येथे क्यूआर कोड लावण्यात आले आहेत. यामध्ये केंद्रचालकांनी दाखल्या साठी शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिकची रक्कम मागणी केल्यास, दाखला विहीत मुदतीत दिला नाही अथवा विलंब केला तर, दाखल्या संदर्भात संबधिताला एसएमएसद्वारे माहिती न दिल्यास, एजंटाव्दारे संबधित नागरिकांकडे अधिकचे पैसे मागणी केल्यास अशा कोणत्याहीप्रकारच्या तक्रारी असल्यास नागरिकांनी क्यूआर कोड स्कॅन केल्यास त्यावर तात्काळ आपली तक्रार नोंदविता येईल. नागरिकांनी क्यू आर कोड स्कॅन करून तक्रार नोंदवणीच्या दिलेल्या अद्यावत सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### घरगुती वादातून १७ वर्षीय तरूणीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

घरगुती वादातून १७ वर्षीय तरूणीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. अंबिका शंकर शिवशेट्टी (वय १७, रा. रामपूर, ता. दक्षिण सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या तरूणीचे नाव आहे. २५ मार्च रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास रामपूर शिवारातील स्वतःच्या शेतात असताना अंबिका हिने घरगुती वादातून विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे अंबिकाला त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी भाऊ रवि शिवशेट्टी यांनी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### दुचाकीच्या धडकेत रिक्षाचालक जखमी

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

लघुशंकेसाठी जाणाऱ्या रिक्षाचालकास दुचाकीने धडक देऊन जखमी केले. याबाबत राम रूपलू राठोड (वय ५९, रा. मुक्ती नगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ मार्च रोजी सकाळी दहाच्या सुमारास सैफुल येथील हॉटेल खान चाचा समोर रिक्षा लावून राम राठोड हे लघुशंकेसाठी हॉटेलकडे जात होते. त्यावेळी एमएच १३ ईएन ५६८८ क्रमांकाच्या दुचाकीवरील स्वारोन दुचाकी भरधाव चालवून राठोड यांना जोरदार धडक दिली. यामध्ये राठोड यांस गंभीर जखमा झाल्या आहेत. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

### चारचाकी वाहनाच्या धडकेने महिला जखमी

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

शहरातील एस टी स्टॅन्ड जवळ चारचाकी वाहनाच्या धडकेने महिला जखमी झाली. याप्रकरणी मिहीर अनिल रॉय (वय ४६, रा. अवंती नगर, जुना पूना नाका, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन एमएच ०२ बीआर ०८६२ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाच्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ मार्च रोजी सायंकाळी मिहीर रॉय व त्यांची पत्नी असे मिळून दुचाकीवरून एस टी स्टॅन्डजवळून जात होते. त्यावेळी मागून आलेल्या एमएच ०२ बीआर ०८६२ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाच्या चालकाने वाहन निष्काळजीपणे चालवून रॉय यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. यामध्ये रॉय यांच्या डोक्यास, छातीस, हाता-पायास मार लागून तसेच त्यांच्या पत्नीच्या कमरेस मार लागून जखमी केले व मोटारसायकलचे ४ हजार रुपयांचे नुकसान केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

### साप चावल्याने महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

साप चावल्याने महिलेचा मृत्यू झाल्याची घटना शिरापूर (ता. मोहोळ) येथे घडली.कोमल गोपाळ चाबुकस्वार (वय ३०, रा. शिरापूर) असे मरण पावलेल्या महिलेचे नाव आहे. कोमल चाबुकस्वार या २५ मार्च रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास राहत्या घरी काम करीत असताना त्यांच्या डाव्या पायास साप चावला. त्यामध्ये त्यांना उलट्या होऊन बेशुध्द पडल्याने त्यांना उपचारासाठी सासू उर्मिला चाबुकस्वार यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी कोमल यांचा उपचारापूवीच मृत्यू झाल्याचे डॉ. अक्षय इमडे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पैशाच्या व्यवहारातून अकलूज येथे एकास मारहाण

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

पैशाच्या व्यवहारातून अकलूज येथे एकास मारहाण करण्यात आली. सोमलिंग रेवणसिध्द माळी (वय ४८, रा. अकलूज, ता. माळशिरस) असे जखमीचे नाव असून त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. सोमलिंग माळी हे २५ मार्च रोजी सायंकाळी अकलूज पोलिस ठाण्याजवळ थांबले असता पैशाच्या व्यवहारातून अनिकेत संतोष कोळेकर, जया कोळेकर या दोघांनी मिळून दगडाने व लाथाबुक्क्याने सोमलिंग यांस मारहाण केली. त्यामध्ये सोमलिंग यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# महापालिका आयुक्तांच्या 'त्या' इशाऱ्याकडे अक्षम्य दुर्लक्ष

## भाजी व फळ विक्रेत्यांकडून विजापूर रोडवर अतिक्रमण कायम

## पाहणीनंतर देखील परिस्थिती जैसे थे ! आयुक्तांच्या भूमिकेकडे लागले शहरवासीयांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२५ मार्च-**

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी सोमवारी शहरातील विविध सर्विस रोडची पाहणी केली. या पाहणी दरम्यान त्यांनी विजापूर रोड येथील फुटपाथवर भाजी व फळ विक्रेत्यांनी केलेल्या वाढीव अतिक्रमणावर इशारा देताना सर्विस रोडवरील अतिक्रमण तात्काळ हटवा अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल. असे सांगितले होते. मात्र आयुक्तांच्या या आवाहनाला विक्रेत्यांनी केराची टोपली दाखवलेली दिसत आहे. विजापूर रोडवर मंगळवार दि. २५ मार्च रोजी देखील अतिक्रमण केलेले चित्र दिसून आले. आयुक्तांनी इशारा देऊन देखील विक्रेत्यांनी खोकी तसेच फेरीवाल्यांनी हातगाडे आणि भाजी विक्रेत्यांनी आपला पसारा गुंडाळाला नसल्याने आयुक्त या विरोधात नेमकी कोणती भूमिका घेतात. याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान, सोलापूर शहरातील विविध रस्त्यांवर वाढलेले अतिक्रमण शहराच्या विद्रुपीकरणासाठी पोषक ठरत आहे. त्या अनुषंगाने महापालिका आयुक्तांनी शहरातील विविध सर्विस रोडवरील अतिक्रमण हटवण्याची मोहीम हाती घेतलेली आहे. त्याच पार्श्वभूमीवर सोमवार दि.२४ मार्च रोजी आयुक्त ओंबासे यांनी विजापूर रोड राष्ट्रीय महामार्गाची पाहणी केली. यावेळी, त्यांना विजापूर रोड राष्ट्रीय महामार्गावर विविध खाद्यपदार्थांची दुकाने, चायनीज गाड्या, पक्की बांधकामे, वाळू आणि खडी विक्रीचे डेपो, असे वाढत चाललेले अतिक्रमण निदर्शनास आले. यावेळी त्यांनी तात्काळ अधिकाऱ्यांना याबाबत सवाल मात्र यावर संबंधित अधिकाऱ्यांकडे कोणतेही उत्तर मिळाले नाही.

विजापूर रोड राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या ताब्यात आहे. तर सर्विस रोड महापालिकेच्या ताब्यात आहे. दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी रस्त्याची मोजणी करून हद्द निश्चित करावी. हद्दीच्या आतमध्ये असलेल्या खोकी व बांधकामांना नोटीस बजावण्यात याव्यात. लोकांना बांधकाम काढून घेण्यासाठी दहा दिवसांची मुदत द्या. नंतर कारवाई करा अशा सूचना आयुक्तांनी दिल्यानंतर देखील विजापूर रोड येथे आज दिवसभर कोणतीच हालचाल दिसून आली नाही. त्यामुळे नागरिकांनी तसेच विक्रेत्यांनी आयुक्तांच्या आवाहनाला केराची टोपली दाखवली की काय? असा प्रश्न निर्माण होत आहे.





### यापुढील काळात या मार्गांवरील अतिक्रमणावर होणार कारवाई

यापुढील येत्या काळात अतिक्रमण हटवण्याची मोहीम ७० फूट रोड, होटगी रोड, अक्कलकोट रोड, येथील सर्विस रोडवर असणार आहे. येथे देखील मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. त्या अनाधिकृत अतिक्रमणवर देखील आता अतिक्रमण प्रतिबंधात्मक विभागा मार्फत कारवाई करण्यात येणार आहे. असेही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

### विजापूर रोडवर परिस्थिती जैसे थे!

सोमवारी महापालिका आयुक्त डॉ.ओंबासे यांनी विजापूर रोडवरील वाढत चाललेले अतिक्रमण तसेच सर्विस रोडची पाहणी केली. या पाहणी दरम्यान त्यांना रस्त्यावर वाढत असलेले अतिक्रमण निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी संबंधित अतिक्रमण काढून घेण्यासाठी सर्व विक्रेत्यांना इशारा वजा सूचना केली. मात्र आज मंगळवारी देखील शहरातील विजापूर रोडवर परिस्थिती जैसे थे असलेले चित्र दिसून आले. धर्मवीर संभाजी तलाव ते शासकीय मैदान येथे रोडच्या बाजूला आणि सर्विस रोडवरील अतिक्रमण हटवण्याची मोहीम राबविण्यात येणार असल्याने विक्रेत्यांनी आयुक्तांच्या आवाहनाला प्रतिसाद द्यावा. आणि केलेले अतिक्रमण काढून घ्यावे, असे झोन कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

# व्यापाऱ्यांच्या एकीसाठी संघटनेच्या उमेदवारांना विजयी करा



## बाजार समिती निवडणूक

## श्री सिद्धेश्वर टर्मिनल सोशल ग्रुप पदाधिकाऱ्यांच्या बैठकित सूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

लोकशाहीमध्ये निवडणूक लढण्याचा सगळ्यांना अधिकार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करून तो अर्ज संघटनेकडे जमा करा, त्याचा विचार करून त्यातील योग्य उमेदवार श्री सिद्धेश्वर टर्मिनल सोशल ग्रुप जाहीर करेल. त्याच उमेदवाराला विजयी करून व्यापाऱ्यांची एकी दाखवण्याचा सूर बैठकीत निघाला.

श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक पार्श्वभूमीवर बाजार समितीतील सिद्धेश्वर बँकेच्या काडादी सभागृहात झालेल्या बैठकीत भाजीपाला व्यापाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी माजी संचालक केदारनाथ उंबरजे, सिद्धेश्वर टर्मिनल सोशल ग्रुपचे अध्यक्ष गजानन होनराव, मुस्ताफा खलिफा, मुस्ताफा चौधरी, रेवणसिद्ध आवजे, रियाज बागवान, दिनेश उपासे, एन. डी. जावळे, सिद्रामप्पा हुलसुरे, सिद्धाराम बावकर, मारुती बिराजदार यांच्यासह राणी लक्ष्मीबाई मंडई, कस्तुरबा मंडई व सिद्धेश्वर मार्केट यार्डातील भाजीपाला व कांदा व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बाजार समितीवर संचालक झाल्याने व्यापाऱ्यांच्या अडचणी सोडवण्याबरोबरच सेवा करण्याची संधी मिळते. या संधीचा वापर करून व्यापाऱ्यांना समस्यामुक्त करता येते. यासाठी काम करणे अपेक्षित असल्याचे केदारनाथ उंबरज यांनी सांगितले. यावेळी रेवणसिद्ध आवजे, मुस्तफा खलिफा, मुस्तफा चौधरी, रियाज बागवान, अमोल बिराजदार, नेताजी पांढरे, नारायण माशाळकर, मुन्ना बिराजदार, केंचप्पा खांडेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

## २५० अर्जांची विक्री; १२ उमेदवारी दाखल

### उमेदवारी दाखल करण्यात हसापुरे गट आघाडीवर

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक प्रक्रियेला मंगळवारपासून सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी २५० अर्जांची विक्री झाली असून पहिल्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात सुरेश हसापुरे गटाने आघाडी घेतली असून बारा जणांनी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केला आहे.

सहकारी संस्था सर्वसाधारण मतदारसंघामध्ये सुरेश हसापुरे, शिवानंद बगले-पाटील, राजशेखर सगरे, राजशेखर शिवदारे, वसंत पाटील, सुरेश कराळे, श्रीशैल पाटील, सहकारी संस्था महिला राखीव- माहेश्वरी बिराजदार, सहकारी संस्था इतर मागासवर्ग सुरेश हसापुरे, सहकारी संस्था विमुक्त जाती भटक्या जमाती प्रथमेश पाटील, व्यापारी प्रतिनिधी अरुणा होसमठ, हमाल-तोलार प्रतिनिधी चांदा गब्बार या उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे.



ही निवडणूक व्यापाऱ्यांच्या एकीची आहे. यात आपली एकी दाखवण्यासाठी प्रत्येकाने संघटनेच्या मार्फत उभ्या असलेल्या उमेदवारांना विजयी करून आपल्या संघटनेला बळकटी प्राप्त करून द्यावे. संघटनेशिवाय ताकद निर्माण होऊ शकत नाही. यानिमित्ताने ताकद निर्माण करा.
**-गजानन होनराव, अध्यक्ष, सिद्धेश्वर टर्मिनल सोशल ग्रुप, मार्केट यार्ड, सोलापूर**

निवडणुका येतात जातात. आपला व्यापार इथे कायमच असतो. याचा विचार करून संघटनेला प्रत्येकाने प्राधान्य द्यावे. संघटनेच्या उमेदवाराला ताकद देऊन विजयी करावे.
**- केदारनाथ उंबरजे, माजी संचालक, बाजार समिती, सोलापूर**

# सख्खा भाऊ झाला वैरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ मार्च -**

सोलापुरात एक धक्कादायक घटना घडली असून अवघ्या पाचशे रुपयांसाठी सख्ख्या भावाने भावाच्याच डोक्यात दगड घातला. यामध्ये नेताजी लक्ष्मण मोरे (वय ५०) गंभीर जखमी झाले आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबी दारफळ येथे हा प्रकार घडला असून याप्रकरणी तानाजी लक्ष्मण मोरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेताजी मोरे हे २२ मार्च रोजी नेहमीप्रमाणे आपल्या शेतात काम करून हातपाय धुवूत होते. तेव्हा सख्खा भाऊ तानाजी मोरे तेथे आले. दोघांच्या शेतात सामाईकमध्ये बसविलेले एम.एस.सी.बी.चे खांब आहेत. या खांबाला तान दिला असून त्यासाठी १ हजार रुपयांचा खर्च आला आहे. हे पैसे मी भरले असून त्यातील निम्मे पैसे तू दे अशी मागणी केली. त्यावर नेताजी यांनी तानाचे पैसे देत नाही अशी भूमिका घेतली. यावरून दोघांत वाद झाला. तेव्हा तानाजी यांनी शिवीगाळ करत नेताजी मोरे यांच्या शर्टाला धरून डोक्यात दगड घातला. यामध्ये नेताजी जखमी झाले आहेत.

**अवघ्या ५०० रुपयांसाठी घातला डोक्यात दगड**

**सोलापुरातील बीबी दारफळ येथील प्रकार**

सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे या घटनेची नोंद झाली आहे. नेताजी मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तानाजी मोरे यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता २०२३ बी.एन.एस ११५ (२),११८(१),३५१(२),३५२ याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अद्याप पोलिसांनी कोणालाही अटक केली नाही. जखमी फिर्यादीवर रुग्णालयात उपचार करण्यात आल्याचे सांगण्यात आले. या घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार महिंद्रकर हे करत आहे.

# महिला किसान शक्तीपंख योजना महिलांसाठी वरदान

## सुधारित औजारे व साधनांसाठी निधीची तरतूद; शेतीत महिला बचत गटांसाठी रोजगार निर्मितिचे प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च,**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी ग्रामीण भागातील बचत गटाच्या महिलांना शेती क्षेत्रात रोजगार मिळवून देण्यासाठी अनुदानावर ड्रोनद्वारे औषध फवारणी यंत्र पुरविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेऊन यासाठी ५० लाख रूपयांची भरीव तरतूद केली आहे. राज्यात प्रथमच जिल्हा परिषद प्रशासनाने अनोखा उपक्रम सुरू केला असून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याला चार लाख अनुदान देण्यात येणार असून यामुळे महिला बचत गटाचे शेतीक्षेत्रात एंट्री होऊन रोजगार मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे महिलांसाठी ही योजना वरदान ठरणार आहे.

सीईओ कुलदीप जंगम यांनी कृषी विभागासाठी मागील वर्षीच्या तरतुदीपेक्षा १४ लाख वाढीव निधीची तरतूद केली आहे. यामुळे कृषी विभागासाठी ३ कोटी ८६ लाख निधीची तरतूद करून शेतकर्यांसाठी विविध योजनेतून अनुदान देण्याचे जाहीर केला आहे. बहुतांश शेतकरी जिल्हा परिषदेतील औजारे, कृषी साधने व विद्युत पंपाच्या लाभासाठी जिल्हा परिषदेकडे चकरा मारताना दिसतात. म्हणून जिल्हा परिषद प्रशासनाने मागील योजना सुरू ठेऊन ग्रामीण भागातील शेतकरी बचत गटाच्या महिलांसाठी ' महिला किसान शक्तीपंख योजना ' ही नाविन्यपूर्ण योजना सुरू केली आहे. शेतीमध्ये आधुनिक औजारांचे वापर वाढावे म्हणून कृषी विभागातील अभियांत्रिकी योजनेअंतर्गत ट्रॅक्टरचलित औजारे, रोटावेटर, नांगर, पेरणी यंत्र, टिलर, विडर यासाठी ९५ लाख निधीची तरतूद, शेतकर्यांसाठी कडबाकुट्टी, ताडपत्री, मधुमक्षिका पेटी, स्लरी फिल्टर या सुधारित औजारांसाठी ९५ लाख निधीची तरतूद, कृषी सिंचनासाठी सुधारित औजारे व साधने पुरविण्यासाठी पेट्रोकेरोसिन , ऑईल इंजिन, ५ व ७.५ एचपी ओपनव्हेल पंप तसेच तुषार सिंचन यासाठी ७५ लाख निधीची तरतूद केली आहे.

### महिला शक्तीपंख किसान योजना

ज्या महिला शेतकरी बचत गट चांगल्या प्रकारे काम करत आहे. अशा जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एक असे एकूण अकरा तालुक्यातून अकरा ड्रोन देण्यात येणार आहे. जिल्हा परिषद त्यासाठी ४० टक्के म्हणजे चार लाख अनुदान, तर ६० टक्के म्हणजे ६ लाख रक्कम ही लाभार्थ्यांना स्वहिस्यातून भरावी लागणार आहे. जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर ही योजना सुरू करण्यात येणार आहे. योजना यशस्वी होऊन महिलांना रोजगार उपलब्ध झाल्यास पुढील वर्षापासून निधीमध्ये वाढ करण्यात येणार आहे.

### अर्थसंकल्पात निधी तरतूद

- महिला किसान शक्तीपंख योजना या नाविन्यपूर्ण योजनेसाठी ५० लाख
- अभियांत्रिकी योजनेअंतर्गत औजारे.. ९५ लाख,
- शेतकऱ्यांसाठी सुधारित औजारे व साधने.. ७५ लाख,
- कडबाकुट्टी, ताडपत्री, मधुमक्षिका पेटी व स्लरी फिल्टर.. ९५ लाख

### शेतकऱ्यांना बळ मिळणार

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी ग्रामीण भागातील बचत गटाच्या महिलांना रोजगार मिळण्यासाठी महिला किसान शक्तीपंख योजनेसाठी ५० लाख निधीची तरतूद केली आहे. या योजनेत महिलांचा स्वहिस्सा असल्याने महिला स्वयंप्रेरणेने काम करण्याचे प्रयत्न करतील. शिवाय शेतीक्षेत्रात नवनवीन औजारे व साहीत्यासाठीही मोठया प्रमाणात निधीची तरतूद केल्याने शेतकऱ्यांना बळ मिळणार आहे.

**- हरीदास हावळे,**
**कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर**

### असा मिळणार रोजगार

विविध पिकांसाठी औषध फवारणी गरजेचे आहे. शेतीमध्ये औषध फवारणीसाठी फवारणी पंपाचा वापर करण्यात येते. मात्र सुधारित शेतीमध्ये महिला बचत गटांना औषध फवारणीसाठी ड्रोन उपलब्ध करून देण्यात येणार असून बचत गटातील महिलांनी दररोज चार ते पाच एकर फवारणी केल्यास महिलांना पाचशे रूपयापासून दोन हजार रूपयांपर्यंत रोजगार मिळणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०६७

**ऐसी बात बोलीए कोई न बोले झुट ।**
**ऐसी जगह बैठीये कोई न बोले उठ ।।**

यादव कुळाचा (यादवी) जो नाश झाला तो प्रामुख्याने आपसात बोलतांना भांडण तंटा होऊन झाला. इंद्रप्रस्थाला भेट द्यायला आलेल्या दुर्योधनाला पाणी न दिसल्याने तो पाण्यात पडल्याचे पाहून द्रोपदीने म्हटले की, आंधळ्याचा पुत्र आंधळा. यावर दुर्योधनाने चिडून आपले डोळे द्रोपदीचे विवस्त्र शरीर सुद्धा पाहू शकतात हे दाखविण्यासाठी वस्त्रहरण घडवून आणले. पुढे त्याचा परिणाम महायुद्धात झाला. लाखो लोक दुर्योधनासह मारले गेले. द्रोपदीने बोललेल्या शब्दांसाठी दुर्योधनाने व यादवांनी आपआपल्या कानावर हात ठेवला असता तर एवढा अनर्थ घडला नसता. बऱ्याचवेळा बाहेरून घरी आल्यावर माणूस छोटया छोटया बाबीवरुन घरात आदळ आपट करू लागतो. लेकराबाळांवर, पत्नीवर रागंरागं करतो. तेंव्हा सुजान पत्नी पतीला म्हणते, आज आपल्यावर कोणी रागावले, चिडले, बोलले आहे का? आमचे काही चुकले आहे का? तेव्हा पतीच्या लक्षात येते की आपण चुकीचे वागत आहेत. पत्नीने समजुन घेतले नाही तर घरातील वातावरण बिघडू शकते. जर तेवढ्या वेळेपुरते बाहेरच्या घटनेबाबत त्या पुरुषाने आपल्या कानावर हात ठेवले असते किंवा आपल्या चुकीची दुरूस्ती करून घेण्याचा प्रयत्न केला असता तर त्याचा विपरीत परिणाम घरात झाला नसता. आपल्या घरातील अयोग्य वागण्याचा परिणाम मुलाबाळांवर सुद्धा होत असतो. म्हणून आपण बाहेर घडलेल्या घटनेचा विपरीत परिणाम आपल्यावर होणार नाही याची काळजी घ्यायली हवी. आपण काहींच्या बाबतीत ऐकतो की, त्यांना कोणीही कितीही बोलले तरी ते संत एकनाथ महाराजांसारखे शांत राहतात. काय बोलायचे असेल तेवढे त्यांना बोलू दया, माझ्या अंगाला काही भोके पडत नाहीत, असे म्हणतात. अशी माणसं सुखी असतात. हत्ती चलता है । कुत्ता भोंकता है ।। असे म्हणून शांतपणे जीवन जगणारी माणसं आपण पाहतो. निसर्गाने माणसाला प्रत्येक अवयव, इंद्रीय हे चांगले कार्य करण्यासाठी दिली आहेत. माणूस मात्र त्याचा दुरुपयोग करुन आपल्याबरोबर ईतरांनाही दु:खात ओढवत असतो. आपण असे बोलावे की, कोणी आपल्याला खोटे बोलणार नाही, अयोग्य बोलणार नाही. आपण असेच ऐकावे की ते खरोखर आपल्यासाठी, इतरासाठी सुखकारक आहे. हिंदीमध्ये पुढीलप्रमाणे एक पद आहे,



**ऐसी बात बोलीए कोई न बोले झूट ।**
**ऐसी जगह बैठीये कोई न बोले उठ ।**

अशी पदे, वचने आपणाला जिवनाचा खरा अर्थ दाखऊन देतात. आपण मात्र याकडे दुर्लक्ष करीत असतो. शांतीब्रम्ह एकनाथ महाराजांना अनेकांनी चिरडीला आणण्यासाठी वेगवेगळयाप्रकारे त्रास दिला. तरीही त्यांनी शांती ढळू न देता त्या लोकांत परिवर्तन केले. आपण लोकांत परिवर्तन करु शकत नसलो तरीही आपल्यात तरी करु शकतो. अशाने आपल्या आनंदलहरी वाढतील.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - भागवत एकादशी, संत श्री बाळूमामा उत्सव - आदमापूर, ता. भुदरगड |
| दि. २६ मार्च २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०-८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - फाल्गुन | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. द्वादशी (२५.४२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - धनिष्ठा (२६.२९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - सिध्द (१२.२५) | |
| करण - कौलव (१४.४९) | |

### राशीभविष्य

**मेष :** व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ :** जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन :** आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

**कर्क :** आर्थिक योजनेमध्ये यश मिळेल. कार्यकुशलते मुळे आपला फायदा होईल. विरोधकांपासून सावध रहा. कौटुंबिक संबंध चांगले राहतील. परमेश्वरावरील विश्वास वाढणार आहे.

**सिंह :** आपले ध्येय्य साध्य करण्याच्या दिशेने हालचाल करा. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजना सुरू होतील. वडीलधाऱ्या व्यक्तिंच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**कन्या :** धावपळ केली तरच आपल्याला यश मिळणार आहे. स्वविवेक बुद्धीने निर्णय घेऊनच व्यवहार करा. सामाजिक स्थिती चांगली राहणार आहे.

**तुळ :** आपली कार्यक्षमता वाढणार असून आपल्या योग्यतेची समाजात प्रशंसा होईल. कौटुंबिक स्थिती आनंददायी राहील. प्रवास करण्याचे शक्यतो टाळावे.

**वृश्चिक :** सकारात्मक परिस्थिती राहील. कोणत्याही प्रकारच्या जोखमीचे कामे करू नका. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ होईल. कौटुंबिक तणाव निर्माण होईल.

**धनु :** आपल्या ज्ञानात भर पडणार आहे. व्यावसायिक अडचणी दूर होतील. नवीन संबंध फायदेशीर राहतील. उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ ठेवा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मकर :** घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा.

**कुंभ :** उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन :** आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका.

# इफ्तार पार्टीत घडले एकात्मतेचे दर्शन

### जि.प.मध्ये मराठा सेवा संघ जि.प. शाखेच्या वतीने आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये मराठा सेवा संघ जिल्हा परिषद शाखेच्या वतीने रमजान सणानिमित्त रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुस्लिम धर्मियांच्या पवित्र रमाजन निमित्तानं होणारी 'इफ्तार पार्टी' म्हणजे हिंदू मुस्लिम एकतेचं प्रतीक आहे.

या प्रंसगी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम उपस्थित होते. यावेळी सीईओ कुलदीप जंगम यांच्याकडून शिक्षणाधिकारी कादर शेख यांना खजूर भरवून रोजा सोडण्यात आला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, प्रसाद मिरकले, अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, संतोष कुलकर्णी,मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष जी. के. देशमुख मराठा सेवा संघाचे शहर अध्यक्ष सुर्यकांत पाटील, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष अविनाश गोडसे, सूर्यकांत मोहिते, अनिल जगताप, सुहास चेळेकर, कामगार नेते अशोक इंदापुरे, राज्य उपाध्यक्ष महसुल कर्मचारी संघटना शंतनु गायकवाड, सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे कार्यकारी अध्यक्ष रणजित थिटे, नागेश भाकरे, जुनी पेन्शन संघटनेचे जिल्हाध्यक्ष राम शिंदे, आशिष चव्हाण, कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष राजेश देशपांडे, राज्य सहसचिव दिनेश बनसोडे, आरोग्य संघटनेचे समीर शेख, संतोष जाधव, रणजीत घोडके, सुधाकर माने-देशमुख, चेतन भोसले, रोहीत घुले, विकास भांगे, व्हीव्हीपी इंजिनिअर कॉलेजचे प्राचार्य संतोष माने, दयानंद निचळ संतोष शिंदे, गणेश साळुंखे, गणेश कलुबर्मे, चिन्मय घाडगे, वासुदेव घाडगे, गणेश कलुबर्मे, विशाल घोगरे, विठ्ठल मलपे, संजय पाटील, भूषण काळे, रणजीत गव्हाणे, उमेश खंडागळे, सचिन खराडे, प्रसाद काशीद, संतोष निळ, जयंत पाटील, सचिन लामकाने, राजु देशमुख, किरण देशमुख, राजु आतकरे, महेंद्र माने, अजित देशमुख, गोपाल शिंदे, नितीन जाधव, ऋषिकेष जाधव, अभिजीत निचळ, संतोष सातपुते, पी.बी. पवार, अमरसिंह पताले, सुरज कव्हाळे, संजय चव्हाण,रोहन भोसले, प्रकाश शेंडगे, विनायक कदम, प्रदिप सुपेकर, मनोज वडगावे,तानाजी पवार, प्रविण पवार, महेश आदमाने, रोहन भोसले उपस्थित होते.

इप्तार पार्टीस शिक्षणाधिकारी कादर शेख, वरिष्ठ भूवैज्ञानीक मुस्ताक शेख, उपअभियंता वसोमोद्दीन शेख, तजवील मुतवल्ली, समीर शेख, महताब शेख, रफीक शेख, महिबुब निटोरे, आदरम मनसुर नाईक, बी.एम. शेख,जहिरूद्दीन पठाण, जावेद शेख, फरहान शेख, फरजाना शेख, रफीक अहमद शेख, सुरज नदाप, आसीप शेख, साहेबलाल शेख, अय्युब शेख, एम.ए.शेख, आर.एम. काझी, एम के मुल्ला, हुसेन शेख, हारून नदाप, मुशीर जिलानी, ए बी सय्यद, बागवान, रफीक शेख, रफीक मुल्ला, आर एम काझी, सेवा निवृत्त उप अभियंता मुनाफ आडते, गुलाम दस्तगीर गदवाल, शहनवाज शेख,रशीद शेख, आदम नाईक, खजीरपाशा सय्यद, इजाज शेख, मिसबा शेख, यासीन यादगीर, अकबर बागवान, सना बेगम उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर शेंडगे, शिवानंद म्हमाणे, संजय चव्हाण, सुरेश साळुखे, विनायक कदम, राजश्री रोजी, वैशाली शिंदे, अनिता तुपारे, छाया क्षीरसागर, अंजना बनसोडे, सुरेश साळूंखे, संजय चव्हाण, रोहित शिंदे, गणेश वटवटवाले, दत्तात्रय वेदपाठक यांनी परिश्रम घेतले.

## बेलाटी येथे विविध धार्मिक कार्यक्रम

### रविवारी संत बाळूमामा व माता सत्यव्वांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

प्रति आदमापूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील बाळूमामा मंदिर परिसरात मंगळवार दि. २५ ते ३१ मार्चदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संत सद्गुरू संत बाळूमामा मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील-बेलाटीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

मंगळवार दि. २५ मार्च रोजी सकाळी अभिषेक व तसेच सकाळी ११ ते ५ यावेळेत भजन, कीर्तन, महाप्रसाद, बुधवार दि. २६ मार्च रोजी सकाळी सकाळी ११ ते ५ यावेळेत प्रति आदमापूरप्रमाणेच उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील बाळूमामा मंदिर परिसरात भंडारा उत्सवाचा कार्यक्रम होणार आहे. याचदिवशी रक्तदान शिबिर, वृक्षारोपण,पाणपोईचे उद्घाटन होणार आहे. दि. २७ मार्च रोजी सकाळी सकाळी ११ ते ६ यावेळेत भजन, कीर्तन, भारूड, धनगरी ओव्यांचा कार्यक्रम. सायंकाळी ६ वाजता स्वामी समर्थ महाराजांची साप्ताहिक आरती होणार आहे. दि. २८ मार्च रोजी सकाळी सकाळी १० ते दुपारी १२ यावेळेत श्याम महाराज भोसले-कवठे यांच्या कीर्तन होणार आहे. दि. २९ मार्च रोजी सकाळी सकाळी ११ ते ६ यावेळेत अमावास्यानिमित्त बाळूमामा पालखी, भजन, कीर्तन, धनगरी ओव्यांचा कार्यक्रम होणार आहे. दि. ३० मार्च रोजी सकाळी ११ वाजता बाळूमामा मंगल कार्यालयाचे उद्घाटन, सद्गुरू संत बाळ व माता सत्यव्वा यांच्या मूर्तीचे प्राणप्रतिष्ठापना, संत बाळूमामा मेंढीतळाचे भूमिपूजन, संत बाळ भक्तनिवासाचे लोकार्पण सोहळा विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार गोरे, मंत्री दत्ता भरणे, खा. प्रणिती शिंदे, आ. विजयकुमार देशमुख, आ. देशमुख, सचिन कल्याण शेट्टी, गोपीचंद पडळकर, बाबासाहेब देशमुख, समाधान आवताडे, देवेंद्र कोठे, उत्तमराव जानकर, नारायण पाटील, माजी आ. रामहरी रूपनूर, दिलीप माने, भाजप शहर नरेंद्र काळे, चेतन नरोटे, गणेश वानकर, लक्ष्मण हाके, प्रवीणसिंह परदेशी, अ‍ॅड. सोमनाथ वैद्य उपस्थित राहणार आहेत. सोमवार, सकाळी १० ते १२ यावेळेत घंटे (मनगोळी) महाराज यांच्या काल्याचे कीर्तन व पालन होणार आहे. भाविक-भक्तांसाठी दररोज बाळूमामा अन्नछत्र येथे महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे. यावेळी चेतन नरोटे, दिलीप देवकते आदी उपस्थित होते.

## संत काशीबांच्या चरणी पुरस्कार मिळणे हे भाग्य : देवेंद्र औटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

संतश्रेष्ठ काशीबा महाराजांच्या पुण्यतिथी दिनी त्यांच्या समाधीजवळ पुरस्कार मिळणे ही माझ्यासाठी जीवन सार्थक करणारी अमुल्य गोष्ट असून हा पुरस्कार प्रसाद स्वरुपात मी स्विकारत आहे, असे प्रतिपादन कवी देवेंद्र औटी यांनी केले.



संत काशीबा महाराज पुण्यतिथीनिमित्त गोपाळपूर येथील बाराव्या शतकातील त्यांच्या मुळ समाधी मंदिरात कवी देवेंद्र औटी यांना गोपाळपूर गुरव समाजाचे वतीने गेली ३५ वर्षे साहित्य, आरोग्य, सामाजिक क्षेत्रात निरपेक्ष अखंडपणे भरीव योगदान देत समाज बांधवांना मदतरुप ठरलेल्या कवी औटी यांना गुरव गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रारंभी समाजाचे ज्येष्ठ नेते दिलीपभाऊ गुरव यांनी प्रास्ताविक केले. कवी देवेंद्र औटी रचित संत काशीबा महाराज काव्यफलकाचे अनावरण अखिल गुरव समाज युवाध्यक्ष गुंडु (दत्तात्रेय) गुरव यांचे हस्ते करण्यात आले. माऊली महाराज यांचे प्रवचन होऊन कमलाकर गुरव, भूषण गुरव, विकास गुरव यांचे पौरोहित्याखाली धार्मिक विधी पार पडले. समाजाचे नेते सुभाषराव गुरव (पंढरपूर), प्रतापराव गुरव (पुणे) यांनी मार्गदर्शन करताना समाजाचे प्रश्न मांडले.

याप्रसंगी माजी सभापती सुरेखा गुरव, वीर महाराज, पंढरपूर विठ्ठल मंदिर समितीच्या शकुंतला नडगिरी, भारुडकार चंदा तिवाडी, चंद्रहास गुरव, युवा नेते निलेश गुरव, विनायक गुरव उपस्थित होते. भोजनमहाप्रसादानंतर सोहळा संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी निलेश गुरव यांनी परिश्रम घेतले.

## सोलापूर विद्यापीठ व कौशल्य विकास सोसायटी यांच्यात सामंजस्य करार

### उद्योगस्नेही कौशल्ये प्रदान करून विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्यास मदत





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

कौशल्य विकास, रोजगार व नाविन्यता विभाग, महाराष्ट्राचे मंत्री श्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्यात कौशल्यविकास क्षेत्रात सहयोग करण्यासाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य कराकरण्यात आला आहे. या करारामुळे संलग्न महाविद्यालयांमध्ये कौशल्याधारित अभ्यासक्रम प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल.

या कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी अल्पकालीन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातील, जे त्यांची व्यावसायिक कौशल्ये विकसित करून रोजगारसंधी वाढवतील. हे प्रशिक्षण उद्योग क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन विकसित केले जाईल, त्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक रोजगार साठी उत्तम संधी मिळतील. या सामंजस्य कराराच्या स्वाक्षरी समारंभास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा हे उपस्थित होते. या करारावर कुलसचिव योगिनी घारे आणि कौशल्य विकास मंत्रालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम विभागाचे सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे हे उपस्थित होते.यावेळी कौशल्य विकास विभाग संचालक प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर, कायदा अधिकारी अ‍ॅड. जावेद खैरदी, अधिसभा सदस्य चन्नवीर बंकुर, डॉ. वीरभद्र दंडे, उद्यम फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेश गुराणी, मयंक चौहान, कौशल विकास सोसायटीचे दत्तात्रय देवळे, मिलिंद अहेर, मोहसीन तांबोळी यांची उपस्थिती होती. हा करार करण्यासाठी कौशल्य विकास विभागाचे आनंद मापुस्कर आणि संदीप पिसके यांचे सहकार्य लाभले.

## कोंडी येथे उद्यापासून अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

जगतगुरु संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या सदेह वैकुठ गमनानिमित्त गेले वर्षभर दररोज चालू असलेल्या गाथा पारायण सांगता सोहळ्यानिमित्त समस्त ग्रामस्थ कोंडी व भजनी मंडळाच्या वतीने विठ्ठल मंदिर कोंडी, उत्तर सोलापूर येथे गुरुवार दि. २७ मार्च ते ३ एप्रिल २०२५ या कालावधीत अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती वारकरी मंडळाचे शहराध्यक्ष संजय पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या सप्ताहामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा आरती, ७ ते ८ गाथा पारायण, दुपारी १० ते १२ गाथा भजन, दुपारी २ ते ४ महिला भजन, सायंकाळी ४ ते ५ हरीपाठ, ५ ते ६ प्रवचन, रात्री ७ ते ९ हरीकिर्तन नंतर हरीजागर कार्यक्रम होणार आहेत. हभप ज्ञानेश्वर महाराज बचुटे, हभप कालीदास महाराज चव्हाण, हभप सोपान महाराज पवार, हभप सुरेश कुलकर्णी महाराज, हभप पंकज गुंड महाराज, हभप पुरुषोत्तम सुतार महाराज, हभप अभिमान पाटील महाराज, यांची प्रवचने होणार आहेत. नामवंत किर्तनकार हभप गुरुवर्य सागर महाराज बेलापूरकर (पंढरपूर), ह.भ.प. गुरुवर्य सुधाकर इंगळे महाराज (सोलापूर), ह.भ.प. गुरुवर्य जयवंत बोधले महाराज (पंढरपूर संत मानकोजी बोधले महाराज वंशज), हभप श्रीगुरु कान्होबा महाराज देहूकर, हभप कृष्णा महाराज चवरे, हभप गुरुवर्य योगीराज गोसावी, ह.भ.प. श्रीगुरु बापूसाहेब महाराज देहूरकर (पंढरपूर-जगतगुरु तुकाराम महाराजाचे वंशज) यांचा किर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. कीर्तनानंतर दररोज पंचक्रोशीतील गावातील व सोलापूरातील विविध भजनी मंडळाचा जागराचा कार्यक्रम होणार आहे.शनिवार दि. २९ मार्च रोजी रात्री ९ ते ११ मस्तान मुल्ला व सहकारी माचणूर यांचा साप्रदायिक भजनाचा कार्यक्रम होणार आहे. गुरुवार दि. ३ एप्रिल रोजी सकाळी ८ वा. दिंडी सोहळा, नगरप्रदक्षिणा होवून सकाळी १० ते १२ वाजता ह.भ.प. गुरुवर्य पांडूरंग घुले महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर दुपारी १ ते ३ वेळेत महाप्रसाद होऊन या कार्यक्रमाची सांगता होणार आहे. या पत्रकार परिषदेला बाळासाहेब निळ, वासुदेव बोबडे, निवृत्ती पवार, बापू पाटील, किसन कापुरे, पुरुषोत्तम सुतार आदी उपस्थित होते.

## अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये करा

### खासगी शाळा कृती समितीचे शिक्षण उपसंचालक यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

अल्पसंख्यांक खासगी अनुदानित प्राथमिक शाळेतील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची समायोजन शासन आदेशानुसार स्थानिक स्वराज्य स्ंस्थेच्या शाळांमध्ये करण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक हारुन अत्तार यांना दिल्याची माहिती डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनिल चव्हाण यांनी दिली.

डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद,महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना,युवक शिक्षक कर्मचारी संघटना व अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटनेच्या संयुक्त कृती समितीच्या शिष्टमंडळाच्यावतीने हे निवेदन शिक्षण उपसंचालकांना देण्यात आले. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाच्या संचमान्यतेनुसार अल्पसंख्यांक खाजगी अनुदानित प्राथमिक शाळेतील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची समायोजन प्रक्रीया १५ मार्च २०२४ च्या शासन आदेशानुसार राबविण्यात यावी.मराठी,कन्नड व उर्दु माध्यमातील अतिरिक्त ठरलेल्या ५४ शिक्षकांचे समायोजन खाजगी अल्पसंख्यांक शाळेत करण्यात आले आहे. अल्पसंख्यांक शाळांना अतिरिक्त शिक्षकांना रुजु करुन घेणे बंधनकारक नसल्यामुळे अद्याप शिक्षकांना रुजू करुन घेण्यात आलेले नाही. त्यामुळे शासननिर्णयातील पुढील टप्प्यानुसार या सर्व अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमध्ये करण्यात यावे.अशी मागणी यावेळी करण्यात आली. या निवेदनावर सुनिल चव्हाण, आप्पाराव इटेकर, आप्पासाहेब पाटील, अ. गफुर अरब यांच्या सह्या आहेत.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक :- ८९ राष्ट्रीय मार्गदर्शन

डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या मृत्यूने सारा देश हादरला. डॉक्टर मुखर्जीसारखा मोहरा बळी गेला, तरी तेव्हा काश्मीर प्रश्न सुटला नाही. काश्मीरच्या भवितव्याचा प्रश्न हा काश्मिरी लोकांचा आहे. असा युक्तिवाद पंडित नेहरूंचा होता. त्यावर श्री. गुरुजींनी प्रतिवाद केला तो असा की हिमालयापासून कन्याकुमारी पर्यंत संपूर्ण भारत एक आहे. या संपूर्ण प्रदेशावर भारतीयांचा हक्क आहे. राष्ट्र हे एका सजीव शरीराप्रमाणे असते. एकेका अवयवाचा स्वतंत्र विचार करू नका. परंतु नेहरूंनी भारतीय जवानांना काश्मीर मधून परत बोलावले व काश्मीर प्रश्न युनो (णछज) कडे सोपवून जबाबदारी झटकून मोकळे झाले. ही नेहरूंनी केलेली अक्षम्य चूक आजतागायत ७५ वर्षे आपण भोगत आहोत. त्याशिवाय आज सुद्धा ईशान्य भारताचा प्रश्न स्फोटक होऊन बसला आहे. मेघालय - मिझोराम- नागालँड आसाम- त्रिपुरा- मणिपूर- अरुणाचल प्रदेश इथे केवळ मतासाठी नेहरूंनी प्रचंड प्रमाणात इस्लामिक घुसखोरी वाढू दिली. ख्रिस्ती धर्मप्रचारकांना हिंदूंचे धर्मांतर करण्यास संमती दिली. परंतु या धोरणाचा परिणाम राष्ट्राचे संरक्षण- त्याची सांस्कृतिक एकात्मता-त्यांचे भारतमाते विषयीचेप्रेम- त्यांचा आत्मविश्वास याबाबत विपरीत होईल हे श्री गुरुजींनी वारंवार सांगितले. खाजगीत व जाहीर भाषणातून समजावले. परंतु संघ ही जर राजकीय संघटना नाही, तर राजकारणावर टीका करणे चूक आहे असा सवाल करून नेहरू श्री गुरुजींना धाक दाखवू लागले. परंतु गुरुजींनी सत्ता संपादन करणे हा संघाचा उद्देश नाही; परंतु परिस्थितीची कल्पना सर्वांना करून देणे हे संघाचे कर्तव्य आहे असे ठणकावून सांगितले. व इथेच संघाच्या विविध क्षेत्री- विविध संघटना असणे ही काळाची अपरिहार्य गरज आहे, या भूमिकेतून संघाने पुढची दमदार पाऊले टाकली.

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### महाराणा प्रताप यांच्या पुतळा विटंबनाप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**करमाळा, दि. २५ मार्च-**

अखिल भारतीय क्षत्रिय महासभा यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे मा जिल्हाधिकारी यांना दिल्ली येथील काश्मिरी गेट परिसरामधील वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या अश्वारूढ पुतळ्याची विटंबना करण्यात आल्याच्या निषेधार्थ शिष्टमंडळाद्वारे निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, देशाची राजधानी दिल्ली येथील काश्मिरी गेट आयएसबीटी या परिसरामध्ये महापुरुष वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचा अश्वारूढ पुतळा आहे. येथील पुतळ्यास काही असामाजिक प्रवृत्ती कडून पुतळ्यास खंडित केलेले आहे ही बाब अत्यंत निंदनीय असून या देश विघातक प्रवृत्तीचा आम्ही हिंदू समाज राजपूत समाजाकडून निषेध करीत असून या कृत्यांमध्ये जे जे दोषी आहेत त्यांना तात्काळ शोधून अशा देशद्रोही विचारांच्या प्रवृत्तीला कठोरातील कठोर शासन करावे तसेच या परिसरामध्ये हे स्थळ संरक्षित करावे सीसीटीव्ही बसावेत सुरक्षारक्षक नेमावेत तसेच लवकरात लवकर नवीन पुतळा उभा करण्यात यावा देशाच्या रक्षणासाठी हजारो वर्षापासून अनेक महापुरुष योध्दे समाज क्रांतिकारक यांनी आपल्या जीवाची परवा न करता भारत मातेच्या रक्षणासाठी प्राण अर्पण केलेले आहेत आणि क्रांतीकारांनी मातृभूमीसाठी आपले सर्वस्व अर्पण केले.दिल्ली येथील घटना अत्यंत निंदनीय असून अशा महापुरुषाची विटंबना काही सडलेल्या मानसिकतेतून होत असेल तर ते देशाच्या हिताच्या दृष्टीने घातक आहे अशा प्रवृत्तीला वेळीच ठेचून काढले पाहिजे त्यांचा शोध घेऊन त्यां देशद्रोह्यांना कठोर शासन करावे अन्यथा पुढील काळामध्ये तीव्र आंदोलन छेडले जाईल. यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बादलसिंह ठाकूर, नरेंद्रसिंह ठाकुर,रवींद्रसिंह ठाकुर, किसनसिंह राजपूत,प्रमोदसिंह बायस, रणजितसिंह राजपूत, मनोहरसिंह राजपूत, संजयसिंह मंडवाले व विजयसिंह राजपूत उपस्थित होते.




### जगदाळे फाउंडेशनच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन

**माढा, दि. २५ मार्च-**

माढा शहरातील सामाजिक संस्था जगदाळे फाउंडेशनच्या वतीने मुस्लिम बांधवांचा पवित्र समजला जाणारा रमजान महिन्याचे औचित्य साधून इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. सर्व धर्म समभाव या उद्देशाने गेली दहा वर्षापासून जगदाळे फाउंडेशनच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येत आहे. सध्याच्या राज्यातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेता जातीय सलोखा राखण्यासाठी अशा उपक्रमाची सर्वत्र गरज आहे त्यानुसारच या फाउंडेशनच्या वतीने इफ्तार पार्टी आयोजित केली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे होते. प्रास्ताविक जगदाळे फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी जगदाळे यांनी केले. कार्यक्रमास जगदाळे फाऊंडेशनचे उपाध्यक्ष भिवाजी जगदाळे, माढा पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नेताजी बंडगर, महादेव जगदाळे, महेश जाधव, चंद्रकांत कांबळे, बशीर आतार, बाबुल बागवान, युवराज जगदाळे पृथ्वीराज जगदाळे, रविराज जगदाळे उपस्थित होते. आभार शिवम जगदाळे यांनी मानले.




### गोपाळपूर येथील स्वेरीच्या फार्मसी कॉलेजमध्ये पालक मेळावा उत्साहात

**पंढरपूर, दि.२५ मार्च -**

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये बी. फार्मसी, डी. फार्मसी व एम. फार्मसीच्यावतीने झालेल्या पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला यामध्ये सुमारे दीडशे जणांनी सहभाग घेतला. मेळाव्याची सुरवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, महिला पालक प्रतिनिधी म्हणून सुरेखा काटकर, प्रा आर. जे. शिंदे, प्रा. पी. ए. जाधव, प्रा.एस.डी.पाटील, प्रा.एल.एन.पाटील, प्रा.एच.बी.बनसोडे, प्रा.एस.डी.पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी पालक प्रतिनिधी सोपान गोरे होते. प्राचार्य डॉ. मणियार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जाधव यांनी फार्मसी पदवीनंतर नोकरीच्या संधी कशा उपलब्ध होतात ते सांगितले. यावेळी संतोष पाडोळे, अन्सार शेख व मोहन बेणारे या पालकांनी मनोगत व्यक्त केले. स्वेरीमध्ये संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगेच्या मार्गदर्शनाखाली आमच्या पाल्यांचा शैक्षणिक विकास होत आहे. प्रा.एस.डी. पाटील व प्रा. एल.एन.पाटील यांनी समन्वयन केले. प्रा.एच.बी. बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.एस.डी.पाटील यांनी आभार मानले.

### शासनातर्फे आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार

**टेंभुर्णी, दि. २५ मार्च-**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार सुरू करण्यात आल्याची माहिती जय मल्हार क्रांती संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दौलत नाना शितोळे यांनी दिली. समाजप्रबोधन करणारे साहित्य व्यक्ती व संस्था यांना आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे त्यामुळे रामोशी बेरड बेडर समाजाच्या इतिहासात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे या पुरस्काराबद्दल अध्यक्ष शितोळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अजित पवार मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या आभार मानले.

# जिजाऊ रथयात्रेचे माळशिरसमध्ये स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २५ मार्च-**

मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व संभाजी ब्रिगेडचे प्रदेश महासचिव सौरभ खेडेकर, जेष्ठ मार्गदर्शक प्रा. अर्जुन तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर मराठा जोडो अभियानांतर्गत निघालेल्या रथयात्रेचे माळशिरस तालुक्यात सोमवारी दु १२:३० वा दसुर या ठिकाणी आगमन झाले यावेळी माळशिरस तालुक्याच्या सरहद्दीवर मराठा सेवा संघाचे माळशिरस तालुका अध्यक्ष निनाद पाटील, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दिगंबर मिसाळ ,जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष शारदा चव्हाण यांच्यासह केंद्रीय सदस्य उत्तम माने-शेंडगे, सचिन गायकवाड, प्रा. मीनाक्षी जगदाळे, संपूर्णा सावंत, रंजना शिरसाट, कल्पना चव्हाण, सुदर्शन हंबीरे, अमोल जगदाळे, सचिन पराडे, गणेश कदम, उदय कदम, निलेश चव्हाण आदींनी स्वागत केले.

दसुर ग्रामस्थांच्या वतीने जिजाऊ रथाचे पूजन करून ही रथयात्रा तोंडले या गावात गेल्यानंतर तोंडले ग्रामस्थांच्या वतीने जेसीबीच्या साह्याने रथावर फुलांची उधळण करून रथयात्रेचे स्वागत केले यानंतर ही रथयात्रा बोंडले गावात गेल्यानंतर बोंडले ग्रामस्थांच्या वतीने रथयात्रेचे रांगोळीने व पाण्याचा कलश अर्पण करून स्वागत करण्यात आले वेळापूर या ठिकाणी छ शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला व पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले यानंतर चौंडेश्वर वाडी या ठिकाणी या रथयात्रेचे ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करून माळेवाडी, अकलुज या ठिकाणी राष्ट्रमाता जिजाऊ चौकात माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले.



यानंतर प्रतापसिंह चौकात डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेच्या वतीने पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी स्वागत करून जिजाऊ रथयात्रेचे पूजन केले यानंतर ही रथयात्रा अकलूज मधील महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून माळीनगरच्या दिशेने रवाना झाली. माळीनगर या ठिकाणी माळीनगर व बिजवडी ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करून ही रथयात्रा २५/४ लवंग या ठिकाणाकडे रवाना झाली लवंग या ठिकाणी रथयात्रेचे स्वागत करून ही रथयात्रा संगमकडे रवाना झाली.

संगम व पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने या रथयात्रेचे स्वागत करण्यात आले यानंतर ही रथयात्रा माढा तालुक्याकडे रवाना झाली. यावेळेस माळशिरस तालुक्यातील मराठा व बहुजन समाजाच्या वतीने या रथयात्रेला निरा व भीमा नदीच्या संगमावर निरोप देण्यात आला

# पंढरपुरात सोनार समाजाचा राज्यस्तरीय सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ मार्च-**

अखिल सोनार समाज प्रतिष्ठान अंबेजोगाई व सर्व शाखीय सोनार हक्क परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७५ समाज रत्नाचा सन्मान व पुरस्कार प्रदान सोहळा कार्यक्रम शुक्रवार दि.२८ मार्च रोजी सकाळी १० वाजता आनंदीविनायक मंगल कार्यालय पंढरपूर वाखरी रोड पंढरपूर येथे आयोजित करण्यात आला असल्याचे संयोजक तथा सोनार समाज हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष राजेशभाऊ पंडित रेणापूरकर यांनी माहिती दिली आहे.

सर्व शाखीय सोनार समाजातील अनेक समाज रत्ने समाजाच्या भल्यासाठी तन मन धनाने कार्यरत आहेत, अशा ७५ सुवर्ण रत्नाचा सन्मान व पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यासाठी हा सोहळा आयोजित केला आहे कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिलशेठ धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष श्रीगोंदा, स्वागताध्यक्ष सुभाष दादा वेदपाठक मोडनिंब, उद्घाटक श्रीनिवास बानकर इंदापूर, मार्गदर्शक शिवानंदजी टाकसाळे, समन्वयक राजेद्र पारखे, समन्वयक निलेशभैय्या धाराशिवकर, समन्वयक माधवी पोतदार आदी मान्यवर मंडळी यांच्या उपस्थितीने सोहळा आयोजित केला आहे. सोनार समाजाच्या ऐकतेसाठी, समाज संघटनेसाठी, समाज बलवान व समृद्ध होण्यासाठी अशा कार्यक्रमाची गरज ओळखून दूरदृष्टी ठेऊन, समाजासाठी सतत कार्यरत लढवय्ये संघर्ष यात्री नेते राजेशभाऊ पंडित रेणापूरकर यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केली आहे. सोनार समाज बांधवानी कार्यक्रमास वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक राजेशभाऊ पंडित रेणापूरकर व सोनार हक्क परिषदचे सर्व पदाधिकारी यांनी केली आहे.




# चौघुले यांच्या हास्यमैफलीने रसिक मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ मार्च-**

येथील मायबोली सांस्कृतिक मंडळाच्यावतीने नुकतेच प्रसिद्ध हास्य अभिनेते (हास्य जत्रा फेम) समीर चौघुले यांच्या 'सम्या सम्या मैफिलीत माझ्या' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रेम या विषयावरील या अभिवाचनाच्या कार्यक्रमात चौघुले यांनी प्रेमाच्या प्रवासातील पहिली भेट, पहिला स्पर्श, कांदा पोह्याचे कार्यक्रम, लग्नाची बैठक, प्री-वेडिंग शूटिंग, विवाह सोहळा,पुढचे प्रापंचिक जीवन आणि काहीजणांच्या बाबतीत होणारे अफेयर या सर्व टप्प्यांचा खुसखुशीत आढावा घेतला. प्रेमविषयक विनोद, चारोळ्या, कविता यांची समयोचित पखरण करीत त्यांनी प्रेक्षकांना मनमुराद हसवले. कार्यक्रमाच्या समारोपात प्रत्येक प्रापंचिकाच्या




जीवनात असलेले पत्नीचे महत्त्वपूर्ण स्थान त्यांनी अधोरेखित केले. प्रारंभी श्री ज्ञानेश्वर माऊली आणि मायबोलीचे संस्थापक स्व. विजयकुमार माढेकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाला. प्रास्ताविक अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सचिव डॉ. प्रशांत मोहिरे यांनी करुन दिला. मायबोलीचे संचालक जितेंद्र माढेकर आणि निलेश माढेकर यांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. मायबोलीचे सहकोषाध्यक्ष राजेंद्र श्रीमाळ यांचाही सत्कार करण्यात आला. शयान वजीफदार (सुलाखे), प्रतीक भारती आणि वैभव बुटे यांनी पाहुण्यांना त्यांची रेखाचित्रे भेट दिली. याप्रसंगी बार्शीचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांचाही सन्मान करण्यात आला. राजेंद्र श्रीमाळ यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नेटके, काव्यमय निवेदन अमिता कुलकर्णी आणि पल्लवी माढेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरुण शहा, सुनील पाटील, डॉ. वैशाली मोहिरे, प्रमोदिनी कोठारी, सुवर्णा कुलकर्णी, गुरुदत्त कुलकर्णी, दिनकर सापनाईकर, उमेश अक्कलकोटे यांनी परिश्रम घेतले.

# शेरीकर मित्रपरिवाराच्या इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ मार्च-**

रमजान महिन्याचे औचित्य साधून नगरसेवक तथा बांधकाम सभापती पै.सद्दाम शेरीकर, एस.एम.सोशल ग्रुप पंच तालीम अक्कलकोट मित्र परिवाराच्या वतीने सालाबादप्रमाणे पवित्र रमजान महिन्याचे मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने रोजा दावते इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. 'दावत ए इफ्तार' ला हिंदू-मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्रचे विश्वस्त अमोलराजे भोसले, तम्मामामा शेळके, मराठा समाज संघर्ष समितीचे अध्यक्ष सुरेशचंद्र सूर्यवंशी, दिलीपभाऊ सिद्धे यांच्या प्रमुख उपस्थितीत दावत ए इफ्तार पार्टी संपन्न झाली.




मुस्लिम बांधवांसोबत हिंदू बांधवही उपस्थित होते. माजी गृहराज्यमंत्री सिद्धारामजी महेत्रे यांनी सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. रोजा दावते इफ्त्यार पार्टीला अक्कलकोट शहर व परिसरातील नागरिक सहभागी झाले होते. सर्व मुस्लिम बांधवांचे स्वागत पै.सद्दाम शेरीकरव एस.एम.सोशल ग्रुप पंच तालीम अक्कलकोट यांनी केले.

राजेंद्र टाकने, निलेश भागवत, हजरत मस्तुर शाह कादरी, काका पाटील, महेश हिंडोळे, निखिल पाटील, गोटु माने, प्रवीण घाटगे, शिवराज स्वामी, शाकीर पटेल, गुलाबसाब तडमुड, सुनील सिध्दे, शिकुर शेख, इरफान दावना, कोरबु, लखन झंपले,सलीम यळसंगी पत्रकार मारुती बावडे, स्वामिराव गायकवाड, योगेश कबाडे, नंदकुमार जगदाळे, दयानंद दनुरे, राजेश जगताप, रमेश भंडारे उपस्थित होते.

# आई, वडील हेच प्रत्येकांचे दैवत : हंकारे



### कै. तुकाराम कांबळे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त ३६५ झाडांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २५ मार्च-**

वडील हेच खरे आपले दैवत असून त्यांची मान खाली जाईल अश्याप्रकारे वागू नका, आई-वडील तुम्हाला तुमच्या जन्मापासूनच तळहाताच्या फोडासारखे जपतात त्यामुळे आपण त्यांचा म्हातारपणी आधार बनले पाहिजे. त्यांच्यामुळेच आपण हे सुंदर जग पाहू शकलो हे विसरु नका, असे मत ख्यातनाम व्याख्याते वसंत हंकारे यांनी व्यक्त केले.

कै. तुकाराम बाबू कांबळे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. प्रथमतः कै. तुकाराम कांबळे यांच्या पत्नी भागिरथी कांबळे, वसंतराव हंकारे, धनाजी कांबळे, जयश्री कांबळे, प्रसन्न, अथर्व, श्रद्धा कांबळे, शरदचंद्र पांढरे, राहुल पुरवत, अमोल शेळके, सतीश देशमुख, ज्ञानेश्वर दुधाणे सचिन शिंदे, अमर चव्हाण, प्रा. किसन सलगर यांच्या उपस्थितीत व शुभहस्ते श्री.विठ्ठल व कै. तुकाराम कांबळे यांच्या प्रतिमांचे पूजन व आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपात करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीम, कांबळे परिवार, वसंत हंकारे यांच्या हस्ते बेलाच्या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. यानिमित्त ३६५ वृक्षप्रेमींना वृक्षांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धनाजी कांबळे, कांबळे परिवार, अरुण कुंभार, गोपाळ कुंभार, गणेश नरसाळे, औंदुबर कुंभार, अशोक कुंभार, गजानन शिंदे, बंडू अभंगराव, संत रोहिदास महाराज व संत गोरोबा काका सामाजिक संघटना यांनी अधिक परिश्रम घेतले. सूत्रसंचालन बाळासाहेब कुंभार, शिक्षक खांडेकर यांनी तर आभार ज्ञानेश्वर दुधाणे यांनी मानले.

### विद्या विकास मंदिरच्या ५० विद्यार्थिनींची उपस्थिती

ख्यातनाम व्याख्याते वसंत हंकारे यांचे आई, वडिलांबद्दलचे विचारधन ऐकण्यासाठी करकंबपासून १२कि.मी. अंतरावरती असणाऱ्या विद्या विकास मंदिर उंबरे (पागे) (ता. पंढरपूर) येथील ५० विद्यार्थीनींनी रात्रीची वेळ असतानाही करकंब येथे उपस्थित राहून या व्याख्यानाचा आनंद घेतला. यासाठी शिक्षक एस.के. पाटील,शिक्षीका यु.एस.बुगड व इतर शिक्षकांनीही परिश्रम घेतले.

# बार्शीत स्त्री सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ मार्च-**

नीताई बहुद्देशीय संस्था आणि सुलाखे डॉटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्त्री सन्मान सोहळा' 'उत्सव कला स्पर्धांचा' अशा अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन बार्शी येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात करण्यात आले होते.

महिलांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांचा उत्सव व्हावा या प्रांजळ हेतूने या दोन्ही संस्थांच्या संचालिका नीता देव आणि स्वराली सुलाखे यांनी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे वय वर्ष १५ ते ८० वयोगटातील महिलांचा सहभागी होता येईल अशा स्पर्धांचा समावेश या कार्यक्रमात करण्यात आला होता. या कार्यक्रमात मेहेंदी रेखाटन, ब्रायडल मेकअप, पाक कौशल्य स्पर्धा, गायन स्पर्धा, लोकनृत्य सादरीकरण, भजन मंडळ सादरीकरण आणि ब्रायडल रॅम्पवॉक अशा वैविध्यपूर्ण स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच बचतगटांच्या महिलांकडून रुचकर खाद्य पदार्थ, उन्हाळी टिकाऊ पदार्थ तसेच आकर्षक सजावटीच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीचे स्टॉल या ठिकाणी मांडण्यात आले होते.

या सोहळ्याचे उद्घाटन महाराष्ट्रातील जेष्ठ भारुडकार चंदाताई



तिवाडी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दयानंद महाविद्यालयाच्या संस्कृत विभाग प्रमुख रेवा कुलकर्णी यांनी भूषवले तर प्रमुख पाहुण्या अभिनेत्री स्वाती हनमगर यांची उपस्थिती होती. अतिथींचा सत्कार करुन स्पर्धांची सुरवात झाली.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी नीता देव, स्वराली सुलाखे यांच्यासोबतच डॉ. सारंगा बुरगुटे, डॉ. श्रद्धा पाटील, प्रणाली जगताप, सायली शहा, सारीका संघवी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. या कार्यक्रमाला आमदार दिलीप सोपल, डॉ. बी.वाय. यादव, डॉ. किरण मांजरे, डॉ. प्रणिता मांजरे, डॉ. प्रकाश बुरगुटे, डॉ. अजित आव्हाड, डॉ. संदीप व पल्लवी तांबारे, जयकुमार शितोळे, अमोल सुलाखे आदी मान्यवरांनी आवर्जुन हजेरी लावली. यावेळी झालेल्या स्पर्धांमध्ये मयुरी उबाळे, प्रतिक्षा देशमुख, (मेहेंदी रेखाटन), उषा सोमाणी (मेकअप), ज्योती सापनाईकर, लोहिया (पाककला), शुभांगी काळे, (कराओके गायन), विनिता भानुशाली, किर्ती नगरकर (लोकनृत्य स्पर्धा) यांनी परीक्षक म्हणून उपस्थिती नोंदवली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते परीक्षक महिलांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिवा कल्पना बारबोले, अबोली सुलाखे आणि डॉ. प्रणीता मांजरे उपस्थित होत्या. विविध स्पर्धामधील विजेत्या स्पर्धकांना प्रमुख पाहुण्या अभिनेत्री स्वाती हनमगर, कल्पना बारबोले, डॉ. प्रणीता मांजरे यांच्या हस्ते भेट देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन नीता देव आणि अर्चना पोळ यांनी केले.

# आ. समाधान आवताडे यांनी उपजिल्हा रुग्णालयास अचानक दिली भेट

### प्रशासनास योग्य नियोजनाच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ मार्च -**

येथील उपजिल्हा रुग्णालयास आमदार समाधान आवताडे यांनी अचानक भेट देत आढावा घेतला. यावेळी त्यांनी रुग्णांकडून समस्या जाणून घेऊन रुग्णालय प्रशासनास धारेवर धरत रुग्णांना त्वरीत उपचार करण्यासाठी तंबी दिली.

पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये अनेक गैरसोयी आहेत. उपचाराकरिता दाखल झालेल्या रुग्णांना व त्यांच्यासोबत येणाऱ्या नातेवाईकांना शौचालय, स्वच्छतागृह उपलब्ध नाहीत. त्याचबरोबर रुग्णालय प्रशासनाकडून नागरिकांशी असभ्य वर्तणूक केली जात असल्याच्या अनेक तक्रारी यापूर्वी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीची दखल घेत पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयाला अचानक भेट देऊन पाहणी केली. या भेटीदरम्यान तेथील रुग्णांनी आमदार समाधान अवताडे यांच्यासमोर पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयामधील असुविधांचा पाढाच वाचला. स्वच्छतागृहाची आमदार आवताडे यांनी पाहणी केली असता स्वच्छतागृहांच्या दारांना दोरीने बांधून ठेवल्याचे निदर्शनास आले. याबाबत आमदार आवताडे यांनी संबंधित विभागाचे अधिकारी यांना चांगलेच फैलावर घेतले. नागरिकांना होणाऱ्या गैरसोई तात्काळ दूर कराव्यात. नागरिकांसाठी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावेत अशा सूचना त्यांनी यावेळी हॉस्पिटल प्रशासनाला दिल्या आहेत.

यावेळी अनेक रुग्णांनी आम्हाला विविध कागदपत्रे, आधारकार्ड, मोबाईल क्रमांक मागितले जातात. आमच्याकडे मोबाईल नाही मग आमच्यावर उपचार होणार नाहीत का..? अशा प्रकारचे सवाल उपस्थित रुग्णांनी विचारला असता आ. समाधान आवताडे यांनी एकाही व्यक्तीचा उपचार नाकारला जाणार नाही. सर्वांना योग्य पद्धतीने उपचार दिला जाईल असे आश्वासन दिले. तसेच उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाला धारेवर धरत नागरिकांना योग्य पद्धतीने उपचार देण्यात यावा. रुग्णांची कोणत्याही प्रकारे आडवणुक केली जाणार नाही याची दक्षता घ्यावी. यापुढे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी येता कामा नये अशी तंबी देखील दिली. यावेळी अनेक पीडित रुग्णांनी सिटीस्कॅन रिपोर्ट एक्स-रे रिपोर्ट देण्यासाठी चार चार दिवसाचा कालावधी लागतो असे सांगितले.

यानंतर आमदार आवताडे यांनी प्रशासनाला चार तासांमध्ये सिटीस्कॅनचा रिपोर्ट देण्याचे निर्देश दिले. आमदार आवताडे यांनी अचानक भेट देऊन तेथील रुग्णांची आपुलकीने विचारपूस करीत रुग्णालय प्रशासनाला तंबी वजा सूचना देखील दिल्याने नागरिकांमधून आ.आवताडेंच्या कामाबद्दल समाधान व्यक्त होत आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ‘शिवरत्न’च्या युवा महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २५ मार्च-**

शिवरत्न शिक्षण संस्था व शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट आयोजित झील २०२४ च्या युवा महोत्सवाचे चेअरमन इशितादेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.



प्रमुख अतिथी म्हणून विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्टचे सदस्य चंद्रकांत कुंभार, महाराष्ट्र ग्रामीण साहित्य विकास मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे हे उपस्थित होते. भिसे म्हणाले, महाविद्यालयीन जीवन हे जेवढे मौजमजेचे असते तितकेच जबाबदारीचे असते. या वयातच जीवनाचे ध्येय ठरवायचे असते. यशस्वी जीवनाचा पाया येथेच रचला जातो असे सांगून कॉलेजचं वय हे असच असत ही कविता त्यांनी सादर केली. या महोत्सव उद्घाटन प्रसंगी संस्थेचे संचालक नितीन बनकर, श्रीकांत राऊत, प्रशासकीय अधिकारी अशरफ शेख, पराग गायकवाड, प्राचार्य डॉ.एस यु शिंदे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### वीट तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत दवणे बंधूंचे वर्चस्व

**करमाळा दि.२५ मार्च**

संजीवनी आणि इन्स्पायर मी फाउंडेशन व श्री छत्रपती शिवाजी विद्यालय वीट यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या या वक्तृत्व स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात आल्या होत्या. इयत्ता पाचवी ते सातवीच्या गटामध्ये त्रिमूर्ती विद्यालय व रामराजे कोकाटे जुनिअर कॉलेज टाकळीचा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी स्वराज दवणे प्रथम, प्रज्योत पिंपळे द्वितीय, वैभव कोकरे तृतीय, सुखदा गणगे उत्तेजनार्थ आला. इयत्ता आठवी ते दहावीच्या गटामध्ये वडशिवने हायस्कूलची विद्यार्थिनी श्रावणी कुंडलकर प्रथम, श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल कोर्टीचा विद्यार्थी तनवीर दवणे द्वितीय, कीर्ती कुदळे तृतीय, रोशनी काळे उत्तेजनार्थ. बक्षीस वितरण कार्यक्रम ंमध्ये यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश भाऊ करे-पाटील, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ढेरे, संजीवनी इन्स्पायर मी चे संस्थापक अध्यक्ष चोपडे, मुख्याध्यापक विटकर, गोरख ढेरे, पत्रकार काळे, बरडे उपस्थित होते.



### बार्शीतील महाराष्ट्र विद्यालयात करिअर मार्गदर्शन व गुणवंतांचा सत्कार

**बार्शी, दि.२५ मार्च -**

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महाराष्ट्र माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय बार्शी यांच्यातर्फे दि.२४ मार्च रोजी विद्यार्थी करिअर मार्गदर्शन व गुणवंतांचा सत्कार झाला. यावेळी लातूर विभागाचे उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षपदी संस्थेचे सचिव पी. टी. पाटील होते. प्राचार्या के. डी. धावणे यांनी प्रास्ताविक केले. यु.एच.क्षीरसागर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली. डॉ. मोरे यांनी दहावीनंतर मुलांनी करिअर कसं घडवायचे याबद्दल मार्गदर्शन केले. पी.टी. पाटील यांचेही भाषण झाले. कार्यक्रमास संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, विज्ञान विभाग प्रमुख आर.एस.पाटील, उपमुख्याध्यापक आर.बी.सपताळे उपस्थित होते. सूत्रसंचालन नीता देव यांनी केले. संजय बागल यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### स्वामीनाथ हेगडे वैशालीताई हावनूर यांचा जाधव परिवारातर्फे सत्कार

**अक्कलकोट, दि.२५ मार्च -**

शिवसेना बांधकाम कामगार जिल्हा उपप्रमुखपदी स्वामीनाथ हेगडे व शिवसेना बांधकाम कामगार जिल्हा संघटकपदी वैशालीताई हावनूर यांची निवड झाल्याबद्दल अक्कलकोट तालुका कामगार सेना तालुका उपप्रमुख परशुराम जाधव परिवारातर्फे शाल, श्रीफळ, हार देऊन सत्कार करण्यात आला.



### मनाला व शरीराला लागलेली सवय आयुष्याला उपयोगी पडते : प्रा. काळे

**सदाशिवनगर, दि. २५ मार्च-**

मनाला व शरीराला लागलेली सवय आपल्या आयुष्याला उपयोगी पडते अभ्यासाच्या सरावामुळे विद्यार्थी हा परिपूर्ण होतो, असे प्रतिपादन प्राध्यापक बाळासाहेब काळे यांनी केले. कोहिनूर फौंडेशनच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर इंजिनियर सत्यवान खांडेकर, अरबाज तांबोळी, सत्यजित काळे, कोहिनूर फाउंडेशनचे संचालक अमोल चोरमले, अनंत दोशी, एल. डी. वाघमोडे, श्रीमंत बनकर उपस्थित होते. यावेळी सत्यजित काळे व अरबाज तांबोळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले सूत्रसंचालन आरती भैस तर आभार प्रांजल सुळे यांनी मानले.

# १० एप्रिलपासून माण व कोरडा नदीवरील सर्व बंधारे भरणार

**● भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. २५ मार्च-**

सांगोला तालुक्यातील रब्बी हंगाम ातील पिकांना जीवदान देण्यासाठी तसेच पाणी टंचाई दूर करण्यासाठी येत्या १० एप्रिल पासून टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करून माण व कोरडा नदीवरील बंधारे भरून देण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.



मंत्रालयात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दालनात झालेल्या बैठकीत सांगोला तालुक्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी तात्काळ टेंभू व म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खा.रणजीतसिंह निंबाळकर यांच्यासह अधिकारी व आमदार उपस्थित होते. सध्या सांगोला तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून विहिरी व कूपनलिकांची पाणी पातळी खालावली आहे. नदी, तलाव,बंधारे ओढे, नाले कोरडे पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकरी चांगलेच धास्तावले आहेत. पाणी प्रश्न मार्गी लावण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली जात आहे. त्यामुळे या बैठकीत सांगोला तालुक्यातील भीषण पाणी टंचाईवर चर्चा करण्यात आली.

> टेंभूचे पाणी माण नदीत सोडण्यात येणार असल्याने बलवडी, वझरे, नाझरे, चिणके, अनकढाळ, वाटंबरे, कमलापूर, वासुद, अकोला, कडलास, वाढेगाव, बामणी, सावे, मांजरी, देवळे, मेथवडे या गावांसह अन्य १५ ते २० गावांना फायदा होणार असून या पाण्यामुळे सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे.
>
> **- चेतनसिंह केदार सावंत,**
> जिल्हाध्यक्ष, भाजपा

येत्या १० एप्रिल पासून सांगोला तालुक्यासाठी टेंभू व म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. टेंभू योजनेतून जुनोनी व बुद्धेहाळ तलाव भरून माण नदीत सोडून बलवडी ते मेथवडे पर्यंतचे सर्व बंधारे पूर्ण क्षमतेने भरून देण्यात येणार आहेत. तसेच म्हैसाळ योजनेतून घेरडी तलाव भरून कोरडा नदीवरील सर्व बंधारे भरून देण्यात येणार असल्याचे चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.

## विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या पूजा नोंदणीस प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ मार्च-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा, तुळशी अर्चन पूजा, चंदन उटी पूजा इत्यादी सर्व प्रकारच्या पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दि.०१ एप्रिल ते ३१ जुलै, २०२५ या कालावधीतील पुजांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणीची सुरवात दि.२५ मार्च रोजी स११.०० पासून करण्यात आली होती. त्यास भाविकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला असून, पहिल्याच दिवशी श्री विठ्ठलाच्या नित्यपुजा व चंदनउटी पुजेची नांदणी पूर्ण झाल्याची माहिती मंदिरे समितीचे व्यवस्थापक म नोज श्रोत्री यांनी दिली.



यापूर्वी पहिल्या टप्प्यात दि. ७ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२४ व दुसऱ्या टप्प्यात दि.१ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीतील व आता तिस-या टप्प्यात दि. १ एप्रिल ते ३१ जुलै या कालावधीतील श्रींच्या सर्व पुजा भाविकांना ऑनलाईन पध्दतीने नोंदणीस उपलब्ध करून दिल्या होत्या. या तिस-या टप्प्यामध्ये आपल्या राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली आहे. त्यामध्ये श्री विठ्ठलाच्या नित्यपूजा व चंदनउटी पूजा फ ुल्ल झालेल्या आहेत. याशिवाय, रूक्मिणीमातेच्या नित्यपुजा व चंदनउटी पूजा अनुक्रमे ६६२ व १८ तसेच पाद्यपुजा २४० व तुळशी अर्चन पुजा ९० बुकींग झालेल्या आहेत. यामधून सुमारे ७५ लक्ष इतकी देणगी मिळाली आहे. भाविकांना https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून पूजेची नोंदणी करता येईल. ऑनलाईन पध्दतीमुळे भाविकांना घरबसल्या पूजा नोंदणी करता येत असल्याने भाविकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

## अभिरुप शिष्यवृत्ती परीक्षेत केंद्र विराज मदने तृतीय

**पिलीव, दि. २५ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर शाळेचा इयत्ता चौथी मध्ये शिकत असणारा विराज विजय मदने भारतीय अभिरुप शिष्यवृत्ती परीक्षेत केंद्रात तिसरा क्रमांक मिळवित केंद्र गुणवत्ता यादीत आला.तो केंद्र शिष्यवृत्तीधारक ठरला आहे.



त्याने ३०० पैकी तब्बल २६३ गुण मिळविले. त्याला मुख्याध्यापक सुहास कोल्हे, सहशिक्षक सुनील डुरे याचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या हया यशाबददल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत घडयाळे, उपाध्यक्ष स्वाती गारुळे, संजय पाटील, स्वाती मदने, सर्जे राव मदने, प्रगतशील बागायतदार विजय मदने, माजी अध्यक्ष देवीदास पाटील तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे आजी माजी पदाधिकारी यांच्याकडून विराजचे या यशाबद्दल अभिनंदन होत आहे.





## दुधनी मल्लिकार्जुन मंदिर जीर्णोद्धाराचे काम लोकवर्गणीतून पूर्णत्वाकडे

**● ग्रामस्थांकडून सुमारे ६० लाख रुपये वर्गणी केली एकत्रित**

**तभा वृत्तसेवा,**
**दुधनी,दि.२५ मार्च-**

दुधनी येथील ग्रामदैवत श्री म ल्लिकार्जुन मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम सध्या वेगाने सुरू आहे. मंदिराच्या गर्भगृह व शिखराचे काम पूर्णपणे दगडी बांधकामात करण्यात आले आहे. हे काम येत्या १४ एप्रिल पर्यंत पूर्णत्वास जाईल अशी माहिती मंदिराच्या संयोजकांनी दिली.

अतिशय प्राचीन असणारे श्री मल्लिकार्जुन मंदिर असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान आहे. परंतु अलीकडच्या काळात मंदिराची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली होती. दुधनीतील श्रद्धावान नागरिकांनी एकत्र येत ५० ते ६० लाख रुपये वर्गणी गोळा केली आहे. त्या पैशातून गर्भगृहाच्या जीर्णोद्धाराचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. दरम्यान, मंदिरासमोरील सभामंडपाच्या इमारतीचीही पडझड झाली आहे. मंदिराच्या गर्भगृहाच्या पूर्णत्वानंतर मंदिरासमोरील सभामंडपाचे काम ही सुरू करण्यात येणार आहे. यासाठी खासदार प्रणिती शिंदे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे व शंकर म्हेत्रे यांच्याकडे विविध शासकीय योजनांच्या माध्यम ातून निधीची मागणी करण्यात आली आहे. या ठिकाणी यात्री निवास, मंगल कार्यालय व सभा मंडपाच्या सुशोभीकरण कामासाठी अंदाजे तीन कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी यापूर्वी वीस लाख रुपयांची रक्कम मंजूर केली होती. ज्या सद्भक्ताना मंदिर जीर्णो ध्दास देणगी, वर्गणी द्यावयाचे आहे. त्यांनी मंदिराचे खाते क्र. ६०४७२२०२२६४ आय.एफ.सी. कोड क्र. एमएएचबी०००२१२९ (बँक ऑफ महाराष्ट्र, दुधनी शाखा) या क्रमांकावर देणगी द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

> **नंदी, शंभू महादेवाची नवीन मूर्ती**
>
> जीर्णोद्धार केलेल्या मंदिरामध्ये नंदीची नवीन मूर्ती बसवण्यात येणार आहे. तसेच श्री मल्लिकार्जुनाच्या प्राचीन मूर्तीवर नवीन कव्हर बसवले जाणार आहे. यामुळे दोन्ही मूर्ती अधिक देखण्या व सुबक होतील.

## माढ्यात मुलीच्या जन्माचे अनोख्या पद्धतीने स्वागत

**शिंदे कुटुंबियांनी हलग्यांच्या कडकडाटात फटाक्यांची आतषबाजी करत केले स्वागत**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २५ मार्च-**

सध्या समाजात ‘मुलगी नको मुलगा हवा’ मुलगी म्हणजे खर्चाला भार या विचाराने तिला नकोशी केली जाते आणि मुलीचा जन्मच नाकारण्याची प्रवृत्ती समाजात वाढत असताना मात्र माढा शहरातील शिंदे कुटुंबियांनी घरात जन्मलेल्या पहिल्या मुलीचे स्वागत हलग्यांच्या कडकडाटात फटाक्यांची आतषबाजीसह मिठाई वाटत मायलेकींचे औक्षण करून अनोख्या पद्धतीने करत समाजापुढे आदर्श मांडला आहे.



माढा येथील जयदीप शिंदे व भाग्यश्री शिंदे या दाम्पत्यांला पहिलीच मुलगी झाली. घरात पहिलेच कन्यारत्न जन्मल्याने शिंदे कुटूंबियांच्या आनंदाचा पारा उरला नसून, जन्मलेल्या बाळाला घरी आणण्यासाठी गाडीवर फुलांची आरास करत. घराजवळ आल्यानंतर हलग्यांच्या कडकडाट, फटाक्यांची आतषबाजी, सर्वत्र फुलांची सजावट करून मायलेकीचे औक्षण केले. तसेच तृतीयपंथी आणि माढा नगरपंचायतच्या महिला सफाई कामगारांना गोडधोड व साडीचोळीचे वाटप करत अनोख्या पद्धतीने मुलीच्या जन्माचे स्वागत केले आहे. जयदीप यांचे मोठे बंधू संदीप यांना दोन मुलेच असल्याने शिंदे कुटुंबियांना घरात एकतर मुलगी असावी अपेक्षा होती. त्यांची ही इच्छा या कन्यारत्नाने पूर्ण झाली असल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.


## तारामाता उद्यानातील कारंजे चालू करा

**● नागरिकांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२५ मार्च-**

नुकतेच कमलाराजे चौक येथील कारंजे चालू करण्यात आले. त्यामुळे अक्कलकोट तीर्थक्षेत्राच्या सौंदर्यात मोठी भर पडली ही बाब अभिनंदनीय आहे. मात्र खरा ऐतिहासिक ठेवा असलेले कारंजा चौकातील तारामाता उद्यानातील लक्षवेधक कारंजा शिल्प नादुरुस्त आहे. येथील दुर्लक्षित कारंजे चालू करून अक्कलकोट तीर्थक्षेत्राच्या सौंदर्यात अधिक भर घालावी, अशी मागणी व्यक्त केली जात आहे.

अक्कलकोट नगर पालिकेने कमलाराजे चौक येथील अनेक दिवसांपासून बंद असलेले कारंजे चालू केले आहेत. मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी अक्कलकोटच्या सौंदर्यात भर पडेल यासाठी हे कारंजे चालू केल्याबद्दल जनतेमधून समाधान व्यक्त केला जात आहे. कमलाराजे चौकातील ऊंचच ऊंच उडणारे हे पाण्याचे कारंजे साऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहेत. उन्हाळ्याच्या दिवसात अल्हादायक दिलासा देत आहेत. कारंजा शिल्प दुर्लक्षित बंद अवस्थेत असल्याने इतिहास प्रेमींसह पालतिकीट संग्रहक, इतिहासप्रेमी विजय शिंदे यांनीही खंत व्यक्त केली आहे.



तारामाता उद्यानातील कारंजा शिल्पामध्ये लहान मुलगा वाजवत असलेली तुतारी, तुतारीतून पडत असलेले पाणी, बदक, मासे माश्याच्या तोंडातून पडणारे पाणी हे कारंजा शिल्प चालू असलेले यापूर्वी अनेकांनी पाहिले आहे. उद्यानातील कारंजा शिल्पातील एक मासा चोरीला गेला. त्याचा तपास लागला नाही. किमान हे कारंजाशिल्प मुख्याधिकारी डाके यांच्या कार्यकाळात चालू व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. हे कारंजा शिल्प चालू करावे, अशी मागणी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनीही केली आहे.

# सांगोला न.प.चा थकीत व चालू वर्षाचा कर वेळेत भरावा

**मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ मार्च-**

सांगोला शहरातील नागरिकांना सुख सुविधा पुरविण्यासाठी तसेच शहराचा विकास करण्यासाठी घरपट्टी, पाणीपट्टी, गाळा भाडे, खुली जागा भाडे याची थकीत व चालू वर्षाची कर वसुली होणे अत्यंत गरजेचे आहे. तरी शहरातील सर्व मालमत्ता धारकांनी आपल्या थकीत रकमेचा भरणा त्वरित नगरपरिषद कार्यालयात करावा अन्यथा नगरपालिका प्रशासनास नाईलाजास्तव नळ कनेक्शन कट करणे, थकीत मालमत्ता धारकांची यादी वर्तमानपत्रात तसेच चौकात बोर्ड लावून प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच नगरपरिषद मालकीचे गाळे सील करून ताब्यात घेण्यात येतील. अशा प्रकारची कटू कार्यवाही टाळायची असेल तर शहरातील सर्व मालमत्ता धारकांनी आपल्या थकीत व चालू रकमेचा भरणा नगरपरिषद कार्यालयात करावा असे आवाहन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी केले आहे. सांगोला नगरपरिषद हद्दीतील मालमत्ता धारकांची घरपट्टी, पाणीपट्टी, गाळा भाडे, आणि खुली जागा भाडे वसुलीची मोहीम मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांचे मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



> सद्यस्थितीत सांगोला शहरामध्ये भुयारी गटार योजना या महत्वकांक्षी प्रकल्पाचे काम सुरू आहे. सदर कामामुळे शहरात धुळीचा त्रास वाढला आहे, याची जाणीव नगरपरिषद प्रशासनास आहे. सदर प्रकल्प लवकरच पूर्ण करून शहरात नवीन रस्ते तयार करण्यात येतील. यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. भुयारी गटार योजना पूर्ण झाल्यास उघड्यावरील सांडपाण्याची समस्या कायमस्वरूपी बंद होणार असून नागरिकांचे आरोग्य चांगले राखण्यास मदत होणार आहे.
>
> **- डॉ.सुधीर गवळी, मुख्याधिकारी, सांगोला नगरपरिषद**

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**धाराशिव :** येथील मध्यवर्ती बसस्थानकाच्या बांधकामाची पाहणी करून काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. धारशिवकरांना लवकरच सुसज्ज असं नवीन बसस्थानक मिळणार असून, यामुळे प्रवाश्यांची गैरसोय दूर होणार आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### दिव्यांगांच्या खात्यावर निधी जमा करा

**परंडा, दि.२५ मार्च -**

परंडा येथील नगरपरिषद कार्यालयाने दिव्यांग पाच टक्के निधी रमजान ईद व गुढीपाडवा या सणापूर्वी दिव्यांगाच्या खात्यावर पाच टक्के निधी तात्काळ वितरित करावा असे लेखी निवेदन दिव्यांग उद्योग समूह परंडा शहराध्यक्ष गोरख देशमाने यांनी नगरपरिषद कार्यालय येथे लेखी निवेदन सादर केले निवेदनात पुढे म्हटले आहे की परंडा शहरातील नगरपरिषद कार्यालय मार्फत दरवर्षी पाच टक्के दिव्यांग निधी नगरपरिषद कार्यालय शासनाच्या नियमानुसार दिव्यांगाच्या खात्यावर निधी वितरित केला जातो परंतु यावर्षी रमजान ईद व गुढीपाडवा हे दोन्ही सण चार ते पाच दिवसावर आलेले आहेत या सणाच्या अगोदर दिव्यांगाच्या खात्यावर पाच टक्के निधी नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ वितरित करावा असे लेखी निवेदनात म्हटले आहे हे लेकी निवेदन माहितीस्तव जिल्हाधिकारी साहेब जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव माहितीस्तव सादर केले.





### जनावरांची वाहतूक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**लोहारा, दि.२५ मार्च -**

प्राण्यांना निर्दयपणे वागणूक देत बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध लोहारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपी सय्यद अंजीर जानुमिया (वय ३०, रा. माकणी, ता. लोहारा, जि. धाराशिव) हा २३ मार्च रोजी दुपारी १:३० वाजता छोटा हत्ती (वाहन क्र. चक ४२ च् ६४१२) मधून दोन गोवंशीय बैलांची बेकायदेशीर वाहतूक करताना आढळला. या बैलांची किंमत अंदाजे ९० हजार रूपये असून, त्यांना कोणत्याही प्रकारच्या चारापाण्याची व्यवस्था न करता निर्दयपणे कत्तलीसाठी घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. लोहारा पोलिसांनी कारवाई करत सदर वाहनासह एकूण २ लाख ४० हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपीवर प्राण्यांस क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० अंतर्गत कलम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### मोटरसायकलमध्ये हवा भरण्यावरुन वाद

**धाराशिव, दि.२५ मार्च -**

मोटरसायकलमध्ये हवा भरण्याच्या कारणावरून झालेल्या वादात दोघांनी एका व्यक्तीस चाकूने मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली. विशाल उर्फ पप्पु सुरेंद्र धालगडे आणि शाहीन उर्फ चॉद अली सय्यद (दोघे रा. कडकनाथवाडी, ता. वाशी) यांनी शब्बीर नसीर शेख (रा. येरमाळा) यांना शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी तसेच चाकूने मारहाण केली. यामध्ये फिर्यादी गंभीर जखमी झाले असून, आरोपींनी त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी शेख यांनी दिलेल्या तक्रारीनुसार येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# तुळजापूरातील सार्वजनिक ठिकाणे बनले नशिड्यांचे अड्डे

संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेल्या ड्रग्स प्रकरणामुळे व्यसनाधींच्या अड्ड्यांवर रात्रीच्या वेळी पोलीस पेट्रोलिंगच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी...



मंडई...



बाजार कट्टा...



नविन बस स्थानक...

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२५ मार्च -**

संपूर्ण महाराष्ट्रात कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेचे तीर्थक्षेत्र ड्रग्समुळे बदनाम झाले असून शहरातील अनेक सार्वजनिक ठिकाणी व्यसन करणाऱ्या दारुड्यांच्या ओल्या पार्ट्या अंधाराचा फायदा घेऊन खुलेआम चालू असतात.

शहरात ड्रग्स तस्करी प्रकरणामुळे नागरिक भयभीत झाली असून पालक वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे. अशातच शहरात अनेक सार्वजनिक ठिकाणी नशिलेगंजडी दारुड्यांच्या ओल्या पार्ट्या अंधाराचा फायदा घेऊन खुलेआम चालू असतात. आशा दारुड्यांवर पोलीस प्रशासनाने अंकुश आणल्याशिवाय शहरातील ड्रग्स माफियांवर देखील वचक निर्माण होणार नाही, अशी चर्चा नागरिक करत आहेत.

आठवडा बाजार, हेलीपॅड, पापनास तीर्थकुंड, धाराशिव, लातूर बायपास रोडच्या कडेला, जुन्या बस स्टँडच्या पाठीमागील भाजी मंडईत व्यसनींची थवेच्या थवे बसलेले असतात. शहरात मध्यवर्ती असणारे ठिकाण म्हणजे आठवडा बाजार या ठिकाणी रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेत दारुड्यांच्या दारूच्या पार्ट्या मोठ्या प्रमाणात उघड उघड चालतात.

याकडे देखील पोलीस प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे या भागात रोड लाईट नाही याचाच फायदा घेऊन शहरातील समाजकंटक लोक दारूच्या बाटल्या घेऊन ओल्या पार्ट्या करतात. या भागात ठिकठिकाणी दारू पिणाऱ्याचे टोळकेच्या टोळके बसलेले असतात.

या टोळक्यांच्या धिंगाम स्तीला या भागातील रहिवाशी वैतागले आहेत सकाळी दारूच्या बाटल्यांच्या फुटलेल्या काचा सर्वत्र पडलेल्या दिसतात. सकाळी म ॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांना चोहीकडे फुटलेल्या दारूच्या बाटल्या दिसतात.

शहरातील या सर्व भागात पोलीस प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. त्याचप्रमाणे शहरातील या सर्व भागात उघड्यावर मध्य पिणाऱ्या लोकांची संख्या चांगलीच वाढलेली आहे.

सार्वजनिक भागात दारूच्या बाटल्या घेऊन मोठ्या संख्येने ओल्या पार्ट्यांचा उत सध्या तुळजापूर मध्ये आला असून ड्रग सारखे गंभीर प्रकरण गाजत असताना अशा सार्वजनिक ठिकाणी दारुड्यांच्या होत असलेल्या पार्ट्यांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन कोणते ठोस पावले उचलणार याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

तामलवाडी येथे ड्रग्स तस्करी करताना पकडलेल्या तीन आरोपीम ुळे तुळजापूर शहराचे मुंबई ड्रग्स कनेक्शन असल्याचे समोर आले. पोलीस यंत्रणेने तपास चक्र फिरवून ड्रग्स तस्करीचा पडदा फ्लॅश करत आत्तापर्यंत ड्रग्स तस्करीत १९ आरोपींना शोधून काढण्यात पोलिसांना यश आले आहे. चार नावे पोलिसांनी गोपनीय ठेवली आहेत. ते चार नावे पोलीस डायरीत नमूद करून न्यायालयाकडे देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. पोलिसांनी गोपनीय ठेवलेल्या चार नावाबद्दल मात्र शहरात उलट सुलट चर्चेला उधान आले आहे.

जो तो प्रत्येकाकडे संशयाच्या नजरेने बघत असून जोपर्यंत हे चार नाव उघड होत नाहीत तोपर्यंत शहरात चाललेल्या उलट सुलट चर्चेला पूर्णविराम लागणार नाही हे निश्चित आहे.

**शहरातील सार्वजनिक ठिकाणी तरुणांचे टोळकेच्या टोळके...**

सार्वजनिक ठिकाणी खुलेआम दारुड्यांच्या होणाऱ्या पार्ट्यांवर आळा आणण्यासाठी पोलीस प्रशासनाने ठोस पावले उचलणे गरजेचे असल्याची चर्चा संपूर्ण शहरात सुरू झाली आहे.दारुड्यांच्या पार्ट्यांच्या आडून ड्रग्स विक्री आणि व्यसनची शक्यता देखील नाकारता येऊ शकत नाही. सार्वजनिक ठिकाणी तरुणांचे टोलकेच्या टोळके आढळून येत आहेत. पोलीस प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी गस्त वाढवणे आवश्यक असल्याचे मत देखील जाणकारातून व्यक्त होत आहेत.

## प्रशिक घेणार नवोदयमध्ये शिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२५ मार्च -**



येथील प्रशिक सुमेध वाघमारे हा याने नुकतेच झालेल्या नवोदय विद्यालय येथील प्रवेश परीक्षा मध्ये यश मिळवले असून तो नवोदय विद्यालय साठी पात्र ठरला आहे.

तालुक्यातील हिंगळजवाडी येथील आयडियल इंग्लिशस्कूल मधील इयत्ता पाचवी मध्ये शिकत असलेला प्रशिक वाघमारे यांनी नुकतेच नवोदय विद्यालय प्रवेश पात्र परीक्षा उत्तीर्ण झाला असून तो सहवी साठी प्रवेश पात्र ठरला आहे. संस्थाध्यक्ष अनिल देशमुख, प्राचार्य वैशाली आडसूळ, सहशिक्षक मीनाक्षी लोमटे, उमा कोथिंबीर, राजकन्या नाडे, ज्ञानदा घुटुकडे, भाग्यश्री खोडवे, सारिका मुळे, शुभांगी घेवारे, नंदिनी शिंदे यांनी अभिनंदन केले.

# गाय गोठ्याचे अनुदान रखडले; अनुदानासाठी शेतकऱ्यांची पायपीट





**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.२५ मार्च -**

ग्रामीण भागात शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात करतात आहेत. दुग्ध व्यवसायातून मि ळालेल्या पैशातून शेतकऱ्यांचा आठवडाभर वरखर्च भागतो परंतु मागील काही दिवसांपासून दुधाचे दर कमी झाल्याने आलेले पैसे खर्चातच जातात. त्यामुळे दुग्ध व्यवसाय मोडकळीस आला आहे.

त्यात शासनाने राज्यात शेतकऱ्यांसाठी गाई म्हैस गोठा महत्वाची योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत गोठा बांधण्यासाठी गाई म्हशीच्या संख्येनुसार शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते. शासनाकडून आर्थिक मदत मि ळाल्यामुळे शेतकरी मजबूत गोठ्याची बांधणी करत आहेत. मात्र ते अनुदान मागील अनेक वर्षे झाली रखडले आहे.

वाशी तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी देखील या योजनेत अर्ज करून गोठा बांधणी केली आहे. तात्काळ अनुदान मिळेल अशेने शेतकऱ्यांनी पहिल्यांदा स्वतःच्या खिशातले पैसे गोठा बांधण्यासाठी खर्च केले.

तर ज्या शेतकऱ्यांकडे पैसे नाही त्या शेतकऱ्यांनी गोठा बांधण्यासाठी लागणारे साहित्य दुकानदारांकडून उद्धार पादर घेऊन गोठ्याची बांधणी केली. आज पैसे येतील उद्याल पैसे येतील म्हणत आता जवळपास दोन ते तीन वर्षे झाली शेतकऱ्यांचे पैसे आणखी जमा झाले नाहीत. गोठ्याचे बिल कधी काढता साहेब म्हणत लाभार्थ्यांना दररोज वाशी पंचायत समिती कार्यालयाच्या पायऱ्या झीजवाव्या लागत आहेत. शेतकऱ्यांनी विचारणा केली असता संबंधित अधिकाऱ्यांकडून बजेट उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे.

मग निधी उपलब्ध नाही तर बिन पैशाची योजना सुरू करून शेतकऱ्यांची थट्टा का लावली अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे. आता बजेट कधी येणार आणि शेतकऱ्यांना अनुदान कधी मिळणार असा सवाल लाभार्थी विचारात आहेत. तर दुसरी गंभीर बाबत म्हणजे गाय गोठा योजनेतील अनेक लाभार्थ्यांच्या फाईल देखील गहाळ झल्याचा प्रकार समोर आला आहे. लाभार्थ्यांनी पंचायत समिती कार्यालयात फाईल कोठे आहे विचारणा केली असता फाईल सापडत नसल्याचे सांगितले जाते. आता वरिष्ठ अधिकारी गहाळ झालेल्या फाईल प्रकारावर कशी नजर टाकतात हे पाहणे गरजेचे आहे.

तर गोठा बांधणीसाठी उधारीवर घेतलेल्या साहित्याचे पैसे दुकानदार शेतकऱ्यांना मागत असल्याने आता शेतकऱ्यांना खाजगी सावकाराकडून व्याजाने पैसे घेतल्याशिवाय पर्याय नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. शासनाने आता लवकरात लवकर बजेट उपलब्ध करून अनुदान वाटप करावे अशी मागणी लाभार्थी करत आहेत.

## स्कूलबसच्या धडकेत ९० वर्षीय वृद्धाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ मार्च -**

कोळेवाडी येथे रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ९० वर्षीय वृद्धाला स्कूलबसची जोरदार धडक बसून त्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, विठ्ठल आबाजी चव्हाण (वय ९०, रा. कोळेवाडी) हे २० मार्च २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता ग्यानदेव सर्जे यांच्या घरासमोर रस्त्यालगत उभे होते. यावेळी स्कूलबस (क्र. चक २५ ५५८१) च्या चालकाने बस हायस्पीड व निष्काळजीपणे चालवून त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात विठ्ठल चव्हाण गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी मयताच्या मुलाने, शहाजी चव्हाण यांनी फिर्याद दिली असून, ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

शिवाजी महाविद्यालयात पाणी परिषद कार्यशाळेस ३९ गावच्या सरपंचाचा सहभाग...

# जलसंवर्धनासाठी ग्रामस्थांचा सहभाग महत्त्वाचा : प्रा. सुरेश बिराजदार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ मार्च -**

वाढते कॉंक्रिटीकरण आणि जलसंवर्धनाच्या अभावामुळे सध्या पाण्याची समस्या गंभीर बनली असून शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सर्वत्र जाणवतो. यातून बाहेर पडायचे असेल तर जल संवर्धनाबरोबर पाण्याचे योग्य नियोजन होणे गरजेचे आहे आणि हे काम ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागाशिवाय शक्य होणार नाही, असे मत सुरेश बिराजदार यांनी व्यक्त केले. ते श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सरपंच पाणी परिषद आणि कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते.

येथील श्री छत्रपती शिवाजी म हाविद्यालयात आंतरराष्ट्रीय जल दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या आयक्यूएसी जलसाक्षरता विभाग रोटरी क्लब उमरगा रोटरी क्लब किल्लारी भूजल सर्वेक्षण विभाग छत्रपती शिवाजी बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा-लोहारा तालुका सरपंच पाणी परिषद आणि कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत छत्तीस गावातील सरपंचांनी आणि ग्रामपंचायत सदस्यांनी सहभाग घेतला. यावेळी बोलताना मा. सुरेश बिराजदार यांनी जिल्ह्यातील जल संवर्धनाच्या काम ाबद्दल माहिती दिली. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात धाराशिव येथील डॉ. नितीन पाटील यांनी पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत, पाण्याचे योग्य नियोजन, शेतीसाठी आणि पिण्यासाठी दिवसाकाठी लागणारे पाणी याची शास्त्रीय मांडणी करून जल संवर्धन कसे करावे यांनी सविस्तर माहिती उपस्थित सरपंचांना दिली.

दुसऱ्या सत्रात शहरातील प्रसिद्ध डॉक्टर दीपक पोफळे यांनी रोटरी क्लबच्या माध्यमातून राज्यभरात जल संवर्धनासाठी केलेल्या कार्याची माहिती पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे दिली. २०१२ ते २०१६ या दरम्यान दुष्काळी परिस्थितीत ही जलसंवर्धनची कामे फायदेशीर ठरल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी विभागीय स्पर्धेत पारितोषिक प्राप्त जकेकुरवाडीचे सरपंच अमर सूर्यवंशी आणि ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी नायब तहसीलदार सचिन बिराजदार, जुगल किशोर खंडेलवाल, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ.पी.ए. पीटले, उपप्राचार्य प्रा.जी.एस. मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, डॉ. एस.एम. सुरवसे आदींची उपस्थिती होती. कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. विनोद देवरकर, प्रास्ताविक डॉ. अस्वले यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.एस.एम. सुरवसे यांनी मानले.

# बर्ड फ्लू रोखण्यात आरोग्य विभाग अपयशी; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मार्च -**

जिल्ह्यात दिवसेंदिवस बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव वाढत असून, आरोग्य विभाग त्यावर नियंत्रण मिळवण्यात अपयशी ठरत आहे. यामुळे पोल्ट्री व्यवसायिक, शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे रोगाचा प्रसार अधिक गतीने होत असल्याची स्थानिक नागरिकांची तक्रार आहे.

गेल्या काही महिन्याभरापासून जिल्ह्यात विविध ठिकाणी पक्षांचे मोठ्या प्रमाणावर मृत्यू होत असल्याचे आढळून आले. प्रयोगशाळेत तपासणी केल्यानंतर याला बर्ड फ्लू जबाबदार असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, आरोग्य विभाग आणि पशुसंवर्धन विभागाने वेळीच आवश्यक ती उपाययोजना न केल्याने रोगाचा फैलाव झपाट्याने वाढला आहे. बर्ड फ्लूवर नियंत्रण मिळवण्यासाठी संक्रमित पक्ष्यांना नष्ट करणे, संक्रमित भाग सील करणे, पोल्ट्री फार्मवर कडक निर्जंतुकीकरण करणे आणि नागरिकांम ध्ये जनजागृती करणे आवश्यक असते. मात्र, जिल्हा प्रशासनाच्या उपाययोजना अत्यंत मर्यादित राहिल्या आहेत. बाधित भागातील पोल्ट्री फार्मम धील पक्षी नष्ट करण्याची कारवाई संथ गतीने सुरू आहे, तर स्थानिक स्तरावर पुरेशी जनजागृतीही करण्यात आलेली नाही. बर्ड फ्लूमुळे पोल्ट्री व्यावसायिक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. हजारो पक्ष्यांचे मृत्यू झाल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पोल्ट्री उत्पादने विकत घेण्यास नागरिक टाळाटाळ करत असल्याने विक्रीतही घट झाली आहे.



या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. या परिस्थितीवर पशुसंवर्धन प्रशासनाच्या हलगर्जीपणावर टीका केली आहे. बर्ड फ्लू रोखण्यासाठी तातडीने कठोर उपाययोजना लागू करण्याची गरज आहे. विलंब झाला, तर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पोल्ट्री व्यवसाय उद्ध्वस्त होऊ शकतो.

दरम्यान, आरोग्य विभागाने मात्र परिस्थिती नियंत्रणात असल्याचा दावा केला आहे. आम्ही बाधित भागात तपासणी मोहीम राबवत आहोत आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू आहेत, असे आरोग्य अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. मात्र, जमिनीवरील परिस्थिती पाहता, हे दावे फोल ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

बर्ड फ्लूचा परिणाम केवळ पोल्ट्री उद्योगावरच नाही, तर स्थानिक नागरिकांच्याही आरोग्यावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही आरोग्य तज्ज्ञांनी सतर्कतेचा इशारा दिला असून, संसर्ग रोखण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाने वेळीच योग्य ती पावले उचलली नाहीत, तर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

**आरोग्य आणि पशुसंवर्धन विभाग मार्च एंडमध्ये गुंतला...**

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बर्ड फ्लू प्रादुर्भाव असताना आरोग्य विभाग आणि पशुसंवर्धन विभाग हे मार्च यांचे बिले काढण्यात आणि त्यातून मिळणाऱ्या मलईमध्ये मग नसल्याचे दिसून येते. मात्र बर्ड फ्लूमुळे त्रस्त असणारे पोल्ट्री व्यवसायिक आणि नागरिक यांना कोणताही दिलासा मिळत नसल्याचे दिसून येत आहे.

## हनुमान मंदिर मूर्तिप्रतिष्ठापनानिमित्त वरवंटी येथे हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मार्च -**

तालुक्यातील वरवंटी येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर मूर्तिप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळ्यानिमित्त वरवंटी येथे हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन ३ ते १० एप्रिल या कालावधीत करण्यात आलेले आहे. या सोहळ्यात नामवंत कीर्तन व प्रवचनकारांची सेवा होणार आहे. सप्ताहाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन वरवंटी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



हभप ॲड. पांडुरंग लोमटे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या या सप्ताह कालावधीत सकाळी काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, दुपारी महिला हरिभजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री हरिकीर्तन, हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत.

सप्ताहासाठी वरवंटी ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. या सप्ताहाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## गुढीपाडवा दिवशी वृत्तपत्र विक्री बंदचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ मार्च -**

दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. मात्र वृत्तपत्र विक्रीच्या कमिशनमध्ये वाढ होत नाही. यामुळे वृत्तपत्र विक्रेते आर्थिक संकटात सापडले आहेत. यामुळे वृत्तपत्र कंपन्यांनी कमिशनमध्ये वाढ करावी. अन्यथा गुढीपाडवा रविवार दि. ३० मार्च रोजी उमरग्यातील वृत्तपत्र विक्री बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

उमरगा शहर वृत्तपत्र विक्रेता संघटनेची बैठक अध्यक्ष प्रदीप नागदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी प्रदेश सदस्य गोरख भिलारे, जिल्हा उपाध्यक्ष रोहित थोरवे, सदस्य गणेश भातुसे, सुरज बागल, रमेश बसगुडे, युवराज वंटे, विकास मदने, लहू पडवळ, अकबर शेख, मोहन वाघमोडे, सुरेंद्र सक्करगी, हुसेन नुरसे, रामलीग गाडवे, अकबर शेख, मोमीन, यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्रेते उपस्थित होते. यावेळी गोरख भिलारे म्हणाले, ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता वृत्तपत्र विक्रेते घरोघरी जाऊन वृत्तपत्र विक्री करतात. दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. मात्र वृत्तपत्र विक्रीच्या कमिशनमध्ये वाढ झाली नाही. कमिशनमध्ये वाढ जाहीर करावी अन्यथा रविवार दि.३० मार्च रोजी गुढीपाडवा दिवशी उमरगा शहरातील वृत्तपत्र विक्री बंद ठेवण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

तरी वृत्तपत्र कंपन्यांनी वृत्तपत्र विक्रेते यांचा विचार करून कमिशनमध्ये वाढ करावी, अशी मागणी केली.

# वन ट्रीलियन एकोनॉमिच स्वप्न दारववणाऱ्यांनी अगोदर रोजगार हमीवरील मजूराची मजुरी द्यावी

### आ. कैलास पाटील यांचा सरकारवर आसूड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मार्च -**

वन ट्रिलियन एकोनॉमीचा गाजावाजा होतो, विकसित महाराष्ट्र, महाराष्ट्र आता थांबणार नाही असल्या घोषणा होतात पण दुसऱ्या बाजूला तीन महिन्यापासून रोजगार हमीवर असलेल्या मजुरांना मजुरी दिलेली नाही. मग असल्या घोषणाच काय करायच असा परखड सवाल आमदार कैलास पाटील यांनी सरकार केला. अंतिम आठवडा प्रस्तावावर सभागृहात बोलत होते.

यावेळी आमदार पाटील म्हणाले, राज्यातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येमधील एक आरोपी अजूनही फरार आहे. सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पोलीस मारहाणीत झाला हे सिद्ध होऊनही अद्यापही त्या पोलिसांवर कारवाई झालेली नाही हे गृह विभागाचे अपयश आहे. तसेच या राज्यात शिवाजी महाराज यांचं नाव घेउनच आपण कोणतंही चांगल कार्य करतो. पण त्याच महाराजांबद्दल महाराष्ट्र राज्यातच अपशब्द वापरले जात असतील तर आपण या राज्यात राहण्याच्या लायकीचे नाहीत असा वार आमदार पाटील यांनी सरकारवर केला. कोण फालतू कोरटकर महाराजांविषयी फालतू बोलतो व आपण ऐकून घेतो त्याला अटक होत नाही आज त्याला अटक केल असलं तरी त्याला कोणाचा आश्रय होता, तो कोणाचा पाहुणा आहे असाही सवाल आमदार पाटील यांनी विचारला. अमली पदार्थ विक्री अगोदर मोठया शहरात व्हायची पण आता हे लोन ग्रामीण भागापर्यंत पोहचल आहे. धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूरमध्ये पानपट्टीमध्ये ड्रग्ज मिळत असेल तर गृह विभाग काय करत होता. याविषयी लक्षवेधी दिली होती पण ती मांडता आली नाही तसेच दुर्दैवाने त्याच उत्तर अगोदर बाहेर आलं. सात महिन्यापूर्वी परंडा येथे ड्रग्ज सापडले होते, पण ज्या दिवशी लक्षवेधीच उत्तर आलं त्याच दिवशी या परंडा येथे पकडलेलं ड्रग्ज नसून कॅल्शियम क्लोराईड असल्याच पोलीसानी सांगितले.

हा योगायोग म्हणायचा अजून काय याचा शोध गृह विभागाने घ्यावा. तुळजापूरमध्ये तीनवेळा ड्रग्ज पकडण्यात आले याच कनेक्शन सोलापूर - पुणे - मुबंई असं आहे. आतापर्यंत या प्रकरणात १९ जणांना अटक केली आहे. पण मुख्य आरोपी अजूनही मोकाट आहे. यामध्ये कोणी असू द्या मग तो राजकीय व्यक्ती असो की पोलीस, त्यांच्या मुसक्या आवळण गरजेचं आहे. त्यासाठी या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करावी अशी मागणी आमदार पाटील यांनी केली.

शेतकरी सुखी तर सर्व सुखी असं म्हणतो. पण प्रत्यक्षात तस चित्र आहे का? दरवर्षी शेतकऱ्यांच्या आत्महत्या का वाढत आहेत. कर्जमाफी देण्याचं आश्वासन सरकारने दिले, या अधिवेशनात याची घोषणा होईल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती पण ती झालेली नाही. किमान आता तरी राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी कधी मिळणार हे शासनाने सांगावे. कर्जमाफी मिळेल या आशेने शेतकऱ्यांनी कर्ज थकीत ठेवलं त्यांच्या मागे बँकाचा तगादा सुरु आहे तर दुसऱ्या बाजूला सरकार कर्जमाफी कधी देणार यावर बोलायला तयार नाही. यामुळे शेतकरी अजून कर्जात जाणार असल्याच कैलास पाटील यांनी सांगितले.



भावांतर योजनेच आश्वासन या सरकारने दिले होते. सोयाबीनचे विक्रमी खरेदी केल्याचं सांगून सरकार पाठ थोपटून घेत आहे पण प्रत्यक्षात ही खरेदी एकूण उत्पादनाच्या काही टक्केच आहे.

सरकारचाच भाग असलेल्या महाबीज कंपनीने हमीभावा पेक्षा कमी दराने शेतकऱ्यांकडून सोयाबीन खरेदी केल्याची गंभीर बाब आमदार पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत त्यांच्यावर कारवाईची मागणी केली.

पिककर्जाच्या बाबत सीबील व ओटीएस ची सक्ती केल्यास बँकेवर कारवाई करु असे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री म्हणत होते.

प्रत्यक्षात बँकीग राजस्तरीय समितीच्या इतिवृतामध्ये अशी कोणतीही बाब सरकारकडून मांडलेली नव्हती उलट बँकानी त्यांच्या धोरणाप्रमाणे कार्यवाही करण्यास सांगितलं होत. त्यामुळे शेतकऱ्यांना बँकानी कर्ज देण्यास टाळाटाळ केली. किमान यंदा तरी तशा प्रकाराची सक्ती नं करता शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी शासनाने खंबीर भूमिका घ्यावी अशी मागणी आमदार पाटील यांनी केली.

पाण्यामुळे कैलास नागरे यांनी आत्महत्या केली अश्या प्रकारची पाण्याच्या कारणावरून पहिलीच आत्महत्या आहे. त्यामुळं जलसिंचन प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याला प्राधान्य दिली पाहिजे. आमच्या भागातील लोकांच्या तर दोन पिढ्यापासून पाणी येणार आहे एवढंच सांगितलं जात आहे. वेळेत काम पूर्ण नं झाल्याने प्रकल्पाची किंमत वाढत जाते व निधी अभावी हे काम कासवगतीने सुरु राहते. त्यामुळं वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत अशी अपेक्षा आमदार पाटील यांनी व्यक्त केली.

याशिवाय रोजगार सेवकांना आठ हजार मानधन करण्याचा शासन निर्णय तीन ऑक्टोबर रोजी काढला. लाडकी बहीण, कर्जमाफी तसाच हा निर्णय सुद्धा फसवा निघाला असून अद्यापही रोजगार सेवकांना एक रुपया सुद्धा मानधन दिले गेले नाही. निवडणुकीच्या तोंडावर फसव्या घोषणा व फसवे शासन निर्णय काढून शासन फसवणूक करत असल्याचा थेट निशाणा आमदार पाटील यांनी सरकारवर साधला.

नवीन शैक्षणिक धोरण समोर ठेऊन एका बाजूला जिल्हा परिषदेच्या शाळेत सीबीएससी बोर्डाचा अभ्यासक्रम लागू केला जाणार असं सांगण्यात येत आहे. पण दुसऱ्या बाजूला शासन जिल्हा परिषदेच्या बाबतीत पटसंख्या धोरण व संचमान्यता चुकीच्या पद्धतीने राबवत आहे.

पटसंख्या ६० च्या खाली आल्यास एक शिक्षक कमी होतो. मात्र पुन्हा ती संख्या ६१ झाली तरी शिक्षक वाढत नाही तेव्हा ती ७४ व्हावी लागते. तरच एक शिक्षक वाढतो. १५ मार्च २०२४ रोजी काढण्यात आलेला शासन निर्णय रद्द करून जिल्हा परिषद शाळा सुधारणा करण्यासाठी चांगल धोरण राबवावे अशी मागणी पाटील यांनी केली.

## जलजागृती सप्ताहानिमित्त जलसंपदाची जनजागृती मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मार्च -**

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत धाराशिव पाटबंधारे मंडळाच्या वतीने १६ मार्च ते २२ मार्च २०२५ या कालावधीत जलजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहाचा शुभारंभ मंडळ कार्यालयात बोरी, मांजरा, तेरणा आणि सिना नदीच्या पाण्याच्या कलश पूजनाने करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत अधीक्षक अभियंता विजय थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विविध ठिकाणी जनजागृती कार्यक्रम, मेळावे आणि सभांचे आयोजन करण्यात आले. लाभक्षेत्र, कार्यक्षेत्र, शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती आणि सार्वजनिक ठिकाणी पाणी संवर्धन, जलव्यवस्थापन, पाण्याची बचत आणि त्याचे महत्त्व या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.



याशिवाय, भिंतीवर पाणी बचतीची संदेशपर भित्तीपत्रके लावण्यात आली.

पाण्याच्या जपणुकीसाठी नागरिकांनी जलप्रतिज्ञा घेतली. त्यानुसार, पाण्याचा काटकसरीने वापर, जलस्रोतांचे संरक्षण आणि पाण्याच्या कायद्यांचे पालन करण्याचे संकल्प करण्यात आले.

या अभियानाचा भाग म्हणून २१ मार्च रोजी सिंचन भवन ते समता कॉलनी मार्गे पुन्हा सिंचन भवन येथे जलदौड काढण्यात आली. तसेच, जलसंपदा विभागाच्या कार्यपद्धती, प्रकल्पांचे सर्वेक्षण, अंदाजपत्रक, निविदा प्रक्रिया, भूसंपादन कायदे आणि आस्थापना विषयक नियम याबाबत एक दिवसीय प्रशिक्षणही घेण्यात आले.

या कार्यक्रमास कार्यकारी अभियंते इंजि.प्रविण चावरे, इंजि. अमोल नाईक, इंजि. दिनेश खट्टे, सहाय्यक अधीक्षक अभियंता इंजि. चंद्रकांत पाटील विभागीय अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नळदुर्ग शहरातील रस्त्यांचा विकास : आ. पाटील यांचे महत्त्वपूर्ण योगदान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ मार्च -**

नळदुर्ग शहरात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर विकास कामे सुरू आहेत. या विकासकामांमध्ये रस्त्यांचे नूतनीकरण, पाणीपुरवठा योजना, हरीत क्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या स्मारकाचे काम आणि भीमनगर येथे बुद्ध विहाराच्या कामाचा समावेश आहे. त्याचबरोबर, ९३ कोटी रुपयांच्या निधीतून नळदुर्ग शहरातील रस्त्यांच्या समस्यांवर उपाय करण्यात आले आहेत.

आ. पाटील यांनी राष्ट्रीय महामार्ग ते खंडोबा मंदिर आणि नळदुर्ग-तुळजापुर रस्ता ते खंडोबा मंदिर या दोन महत्त्वपूर्ण रस्त्यांच्या कामांना सुरुवात केली आहे. या रस्त्यांच्या कामामुळे नागरिकांना आणि खंडोबा मंदिराच्या भक्तांना मोठा फायदा झाला आहे. सध्या, या रस्त्यांच्या कामांमध्ये गटार व्यवस्था तसेच ५० फुट रुंदीचे रस्ते तयार करण्याचा कार्य सुरू आहे. या कामामुळे वाहने, शेतकरी, पशुपालक आणि अन्य नागरिकांना मोठा आराम मिळणार आहे.



तथापि, नळदुर्ग शहरातील इतर रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. बसस्थानक ते शास्त्री चौक, शास्त्री चौक ते किल्ला गेट आणि चावडी चौक ते बोरी घाट या महत्त्वाच्या रस्त्यांवर मोठे खड्डे पडले आहेत. यावर लाखो रुपये खर्च होऊनही रस्त्यांची अवस्था सुधारली नाही. यामुळे शहरवासीयांनी आ. पाटील यांच्याकडे मागणी केली आहे की, या रस्त्यांची सुधारणाही याच निधीतून केली जावी.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडून सध्या सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांमुळे भविष्यात नळदुर्ग शहरात कायम स्वरूपी आणि दर्जेदार रस्ते तयार होणार आहेत. खोदकाम करून सिमेंट रस्ते तयार करण्याचे काम सुरू असून, यामुळे दीर्घकाळ टिकणारे रस्ते बनवले जात आहेत.

याशिवाय, खंडोबा मंदिर परिसरातील रस्त्यांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे, जेणेकरून मंदिर परिसराला भव्यता प्राप्त होईल. आगामी काळात, यात्रेसाठी व्यापारी दुकाने थाटणार्या रस्त्यांना रुंद करून व्यापाऱ्यांसाठी दुकाने लावण्यासाठी कठडे बांधले जातील, ज्यामुळे यात्रा व्यवस्थित पार पडेल.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नांनी नळदुर्ग शहरात एक नवा विकासाचा मार्ग दाखवला आहे.

## तेरच्या पीएमश्री उर्दू शाळेत क्युरियन कंपनीद्वारे कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२५ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील पीएमश्री जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शळेत क्युरियन एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी द्वारे दोन दिवसीय मार्गदर्शनपर कार्यशाळा संपन्न झाली.

सदर कार्यशाळेत विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरता आणि जागरूकता, आर्थिक साक्षरता, एकविसाव्या शतकातील शिक्षण आणि माहिती कौशल्ये नागरिकत्व कौशल्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता याबद्दल विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये दि.२२ रोजी सदर विषयांवर विद्यार्थ्यांची प्री-टेस्ट घेण्यात आली. चाचणी झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे व्हिडिओ प्रोजेक्टर द्वारे दाखवण्यात आले. दि.२४ रोजी व्हिडिओ वर आधारित पोस्ट-टेस्ट घेण्यात आली. या सर्व विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावे आणि डिजिटल साक्षरता व दैनंदिन व्यवहार विद्यार्थ्यांना सुरक्षित रित्या करता यावेत या हेतूने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व माहितीचे पेन ड्राईव्ह शाळेला क्यूरियन कंपनी द्वारे भेट म्हणून देण्यात आले ज्यामध्ये सर्व विषयांचे काळानुरूप व्हिडिओ आहेत.

क्युरियन कंपनीच्या टीम मध्ये ट्रेनर म्हणून नंदा पुनगुडे, मैना भोसले, रूपाली शेंडगे तसेच सहाय्यक म्हणून सुरज माने, विवेक वडणे आणि विकास शेंडगे उपस्थित होते.

## धाराशिवमध्ये दरोड्याच्या तयारीतील तीन जणांना स्थानिक गुन्हे शाखेची अटक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मार्च -**

जिल्ह्यात दरोड्याच्या तयारीत असलेल्या तीन संशयितांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. धाराशिव जिल्ह्यातील ढोकी येथे, तेरणा सहकारी साखर कारखान्याजवळ, जुना पळसप रोड परिसरात संशयास्पद हालचाली आढळल्याने पोलिसांनी कारवाई करत तिघांना रंगेहात पकडले.

स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि सुदर्शन कासार आणि त्यांच्या पथकाने गस्तीदरम्यान अंधारात पाच इसमांना उभे असलेले पाहिले. पोलिसांना पाहताच त्यातील दोन इसम मोटरसायकलसह पळून गेले, तर उर्वरित तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. झडती घेतल्यावर त्यांच्या जवळ दरोड्याचे साहित्य, कटावणी, कत्ती, कटर, रोख रक्कम ६०० रूपये, तीन मोबाईल (३० हजार रूपये किंमत), तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या मोटरसायकली (६०,००० किंमत) असा एकूण ९० हजार ७०० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

संतोष प्रभाकर कुराडे (वय ३६, रा. सुभाष नगर, अंकलखोप, ता. पलूस, जि. सांगली), अविनाश प्रभाकर कुराडे (वय ३४, रा. सुभाष नगर, अंकलखोप, ता. पलूस, जि. सांगली), प्रविण राजाराम मोरे (वय ३०, रा. चांदोल वसाहत, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली). तपासादरम्यान



या आरोपींवर धाराशिव आणि सांगली जिल्ह्यात जबरी चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले. त्यामुळे ते दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची खात्री पटल्यावर पोलीस उपनिरीक्षक सुदर्शन कासार यांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल केली. या तिन्ही आरोपींविरोधात पोलीस ठाणे ढोकी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, पोलीस हवालदार शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, चालक रत्नदीप डोंगरे आणि नितीन भोसले यांच्या पथकाने केली.

अटक केलेल्या आरोपींना वैद्यकीय तपासणीनंतर पुढील कारवाईसाठी पोलीस ठाणे ढोकी येथे हजर करण्यात आले आहे.

### लाईट घेण्याच्या कारणावरून वाद

**धाराशिव, दि.२५ मार्च -** बेंबळी (ता. धाराशिव) - गावात लाईट घेण्याच्या कारणावरून झालेल्या वादात दोघांनी एका व्यक्तीस लोखंडी पक्कडने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना बेंबळी येथे घडली. मिळालेल्या माहितीनुसार, नजीर गफुर शेरीकर आणि फशोद्दिन गफुर शेरीकर (दोघे रा. बेंबळी) यांनी दि. २३ मार्च रोजी सकाळी ९ वाजता फिर्यादी जुनेद मदीन शेरीकर (वय ३७, रा. बेंबळी) यांच्याशी वाद घालून शिवीगाळ केली.

## यात्रा मैदानासाठी रस्ता रोको आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ मार्च -**

शहरालगत धाराशिव रोडवरील छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी यात्रा मैदानासाठी दि.२८ फेब्रुवारी १९९८ या तारखेला २ हे ६३ आर इतकी जमीन भूसंपादन झालेली होती, त्या भूसंपादीत शासनाच्या जागेवर झालेले बोगस लेआऊट रद्द करून कायदेशीर कार्यवाही करून त्या ठिकाणी भाविकांसाठी यात्रा मैदान होण्यासाठी आणि महसूल दप्तरी महाराष्ट्र शासन याची नोंद घेण्याच्या मागणीसाठी शहरातील सर्व महिला भाविक व पुजारी बांधवांच्या वतीने धाराशिव रोड मलबा हॉस्पिटल, यात्रा मैदानासमोर दि.२५ मार्च रोजी सकाळी रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

शहरातील पुजारी बांधवांच्या जिव्हाळयांचा व भावनेचा प्रश्न असल्याने मोठ्या संख्येने महिलांसह पुजारी या आंदोलनात सहभागी झाले होते. या जागेत यात्रा मैदान झाल्यावर भाविक भक्तांना सोईचे होईल व जवळच ५०० मीटर अंतरावरच तुळजाभवानी देवीचे मंदिर असल्याने भाविकाची सोय होईल आणि किती जरी भाविक आले तरी यात्रा मैदानात गाडया लागू शकतात. तरी लवकरात लवकर संबंधितावर कारवाई करून सदरील सर्वे नंबरच्या महसूल दप्तरी महाराष्ट्र शासन याची नोंद घेण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

रस्ता रोको आंदोलन स्थळी तहसीलदार अरविंद बोळंगे यांना निवेदन आंदोलनकर्त्यांनी दिल्यानंतर या मार्गावरील वाहतूक सुरळीत चालू झाली.

## शील, समाधी प्रज्ञा हे तत्त्वज्ञान मूळ बुद्धाच्या धम्माची इमारत आहे : भंतेजी पय्यानंदथेरो

### कराळी : बौद्ध धम्म परिषदेला मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ मार्च -**

बुद्ध धम्माचा अंगीकार केल्यास माणसाच्या जीवनात आमूलाग्र बदल होतो.धम्म अभ्यास महत्वाचा असून धम्माचे अंतरंग, बुद्धा धम्माचा अंतर्मन पाहावे लागेल, धम्माची व्याख्या पहावी लागेल धम्माच स्वरूप काय, धम्माचं फळ काय धम्माची परिमिती काय धम्माचं पायरी काय पहिली सर्व गोष्टी तुम्हाला धम्माचा अभ्यासाअंती समजतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती प्रमान मानून विचारांचे परिवर्तन करत (दि.२२) प्रतिज्ञचे पालन करावे लागेल असे भंतेजी पय्यानंद यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील कराळी येथे शनिवारी दि.२२ रोजी दि लॉर्ड बुद्धा रिलिजियस अँड चॅरिटेबल ट्रस्ट व भन्ते सुमंगल यांच्या पुढाकाराने आयोजित सातव्या धम्मपरिषदेस भंतेजी पय्यानंद थेरो यांनी संबोधित केले. यावेळी उदघाटक म्हणुन माजी मंत्री आमदार संजय बनसोडे तर कार्यकमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष कैलास शिंदे हे होते. धम्मपीठावर भंतेजी धम्मसार, भंतेजी सुमेध नागसेन, भंतेजी कश्यप, भंतेजी अमरज्योती, भंतेजी सुमंगल, भंतेजी विनयशील, स्वागतध्यक्ष दिलीप भालेराव, ट्रस्टचे अध्यक्ष विलास खिल्लारे, अनु.जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम, ट्रस्टचे उपाध्यक्ष मच्छिंद्र सरपे, सचिव संजय ओव्हळ, डॉ. कमलाकर कांबळे, आबासाहेब साबळे, डॉ. श्रीकांत गायकवाड, एस.के. चेले, विजय वाघमारे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना भन्तेजी पय्यानंद थेरो म्हणाले की, धम्मामध्ये तुम्ही सुद्धा पंचशीलधारी झाले पाहिजे. तुम्ही सुद्धा अष्टशील दिल पाहिजे. शील, समाधी प्रज्ञा हे तत्त्वज्ञ मूळ बुद्धाच्या धम्माची इमारत आहे. त्याचा गाभा म्हणजे समाधी आहे आणि त्याचा कळस म्हणजे प्रज्ञा आहे. मनाची शुद्धता म्हणजे त्याची समाधी आहे.

एकाग्रता शांती ही समाधी आहे आणि त्याच्यातून मिळणारे जे अशुद्ध शुद्ध ज्ञान आहे अशा पद्धतीत धम्माच ज्ञान निर्माण होत. धम्माचा अभ्यास केल्याशिवाय श्रद्धा कळणार नाही धम्माच ज्ञान घेतल्याशिवाय बुद्ध कळणार नाहीत. विद्वान लोकांनी बुद्ध आणि धम्माला आधी स्वीकारले. आपल्या जीवनामध्ये दुःख आलं नाही पाहिजे, जीवन नीतिमान, सुखी झालं पाहिजे. जीवनामध्ये कलह वाद विवाद अशा प्रकारची कुठलीही गोष्ट नको



असेल तर धम्म स्विकारल्याशिवाय पर्याय नाही तेंव्हाच जीवन सन्मार्गाचे होईल. यावेळी कार्यक्रमाचे उदघाटक व मार्गदर्शक माजी मंत्री संजय बनसोडे यांनी या कपिलवस्तु बुद्धविहाराच्या चालू कामासाठी लागणाऱ्या निधीसाठी सर्व प्रयत्न करू तसेच हे धम्मज्ञानाचे, धम्म प्रचार व प्रसारचे प्रमुख केंद्र व्हावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत मांडले.

अध्यक्षीय समारोप कैलास शिंदे यांनी धम्मपरिषदेच्या आयोजनाचा उद्धेश विषद केला. जगात धम्म झपाट्याने वाढत असून धम्म चळवळ गतिमान करण्यासाठी बौद्ध अनुयायांची जबाबदारी मोठी असल्याचे ते म्हणाले. यावेळी साधूकाराच्या जयजयकार करीत विविध ठराव घेण्यात आले.

यावेळी भन्तेजी धम्मसार, भंतेजी सुमेध नागसेन यांची धम्मदेसना तर ट्रस्टचे अध्यक्ष विलास खिल्लारे, डॉ. कमलाकर कांबळे, डॉ. श्रीकांत गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. धम्म परिषदेसाठी ट्रस्टचे उपाध्यक्ष एम.एस. सरपे, कोषाध्यक्ष कैलास शिंदे, संचालक दिलीप भालेराव, डी.टी. कांबळे, बालाजी गायकवाड, संतोष सुरवसे, समीर सूतके, गो.ल. कांबळे आदींनी पुढाकार घेतला.

प्रारंभी भीमगीताच्या कार्यक्रमातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तत्वाला उजाळा देण्यात आला. स्वागतध्यक्ष दिलीप भालेराव यांनी प्रास्ताविक केले. धम्ममित्र जी.एल. कांबळे यांनी सूत्रसंचलन केले. तर एम.एस. सरपे यांनी आभार मानले.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## क्षुल्लक कारणावरुन घराची केली तोडफोड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** शेजाऱ्यांमध्ये क्षुल्लक कारणांवरुन भांडणे ही काही नवीन नाही. पण शहरातील विक्रम नगरात हीच भांडणे पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचली आहेत. एवढेच नाहीतर परस्परविरोधात फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

त्याचे झाले असे, घरासमोर गैरकायद्याची मंडळी जमवून तुम्ही सुनीता कांबळे हिची साथ का देता म्हणत भांडणाची कुरापत काढत मारहाण केली. शिवाय घराच्या खिडकीची व दारात लावलेल्या वाहनाची तोडफोड करुन ३५ हजाराचे नुकसान केल्याची फिर्याद सुशीला तात्याराव सोनवणे (वय ५८, रा. विक्रमनगर, लातूर) यांनी दाखल केली.

याप्रकरणी दत्तू कांबळे, त्यांची पत्नी मंगल कांबळे, दिपमाला कांबळे, यश कांबळे, सुनील दत्तू कांबळे, सम्राट गंगावणे, जया माने, टिकू माने, शिला गंगावणे, महेंद्र गंगावणे, माया बलभीम कांबळे (सर्व रा. विक्रमनगर, लातूर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पोलिसांत तक्रार का दिली, यावरुन भांडणाची कुरापत काढत घराच्या खिडकीच्या काचा फोडत २५ हजार रुपयांचे नुकसान केल्याची फिर्याद दीपमाला बलभिम कांबळे यांनी दिली. अक्षय तातेराव सोनवणे, आकाश कांबळे, सुनीता धोंडीराम कांबळे, सुशीला तातेराव सोनवणे, अंकिता तातेराव सोनवणे, प्राजक्ता धोंडीराम कांबळे, अक्षय सोनवणे व त्याच्या चार मित्रांनी तु अक्षयच्या विरोधात का पोलिसांत तक्रार केलीस म्हणत शिवीगाळ व घराची तोडफोड केल्याचे फिर्यादीमध्ये नमूद आहे. या दोन्ही घटनांचा तपास पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे. गणेश बुजारे हे करीत आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## मालमत्ताकर दात्यांसाठी व्याज व शास्तीमध्ये ५० टक्के सूट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्षाच्या सुरूवातीपासूनच मालमत्ताधारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुटची योजना लागू करण्यात आल्या होती . अद्यापही मालमत्ताधारकाकडे मालमत्ताकराची व पाणी पट्टी कराची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी असल्याने या वर्षातील शेवटची संधी म्हणून एक रक्कमी कराचा भरणा करणा-या मालमत्ताधारकांस लातूर शहर महानगरपालिकेमार्फत दि.२५ मार्च ते ३१ मार्च २०२५ पर्यंत थकीत करावरील व्याज/शास्तीमध्ये ५० टक्के सूट देण्यात येत आहे.

जे मालमत्ताधारक कर भरणा करणार नाहीत अशा मालमत्ताधारकावर कार्यवाही करण्यासाठी लातूर शहर महानगरपालिकेमार्फत क्षेत्रीय कार्यालय ए,बी,सी,डी निहाय विशेष वसूली व जप्ती पथकाची नियुक्त करण्यात आली असून सदर पथकामार्फत जप्तीची कार्यवाही तिव्र करण्यात येणार असून सदर कार्यवाही अंतर्गत मालमत्ता सिल करणे,आटकाव करणे,नळ कनेक्शन बंद करणे,इत्यादी कार्यवाही करण्यात येणार असून मालमत्ता जप्त किंवा सिल करून मुदतीमध्ये मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव /विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे. तरी व्याज/शास्ती माफी योजनेचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा करावा व जप्तीसारखी कठू कार्यवाही टाळावी असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

## पोखरा : सूक्ष्म नियोजनातून होणार कामांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** नानाजी देशमुख कृषी संजीवनी परियोजना अर्थात पोखरा योजनेच्या दुसऱ्या टप्प्याच्या अनुषंगाने तयारी सुरु झाली आहे. यामध्ये जिल्ह्यातील २१६ गावे निवडण्यात आली असून आता गावनिहाय सूक्ष्म नियोजन करुन कोणत्या स्वरुपाची कामे असणार हे ठरवले जाणार आहे. यामध्ये ग्रामकृषी विकास समितीची महत्त्वाची भूमिका राहणार आहे.

जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात २८२ गावांमध्ये जलसंधारणापासून ते वैयक्तिक लाभापर्यंतच्या योजना राबविण्यात आल्या होत्या. आता दुसऱ्या टप्प्याला सुरुवात होणार आहे. यापूर्वी नियोजनाच्या अनुषंगाने निवड झालेल्या गावच्या सरपंचांना मार्गदर्शन झाल्यानंतर कृषी विभागातील अधिकाऱ्यांचीही नागपूर येथे कार्यशाळा पार पडली होती. पोखरा योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली असून अधिकतर अधिकार हे ग्राम कृषी विकास समितीला असणार आहे. यामध्ये सरपंच, सदस्य तसेच कृषी विभागातील पर्यवेक्षकांचा समावेश असणार आहे. गावची स्थिती, भौगोलिक रचना तसेच कोणती कामे होणे गरजेचे आहे त्याअनुषंगाने गावनिहाय सूक्ष्मनियोजन केले जाणार आहे.निविदाही ग्राम कृषी विकास समितीच्या माध्यमातूनच गावनिहाय कामे ठरल्यानंतर कामाच्या निविदा या ग्राम कृषी विकास समितीच्या माध्यमातूनच निघणार आहेत. एवढेच नाहीतर कामाच्या ऑर्डरही हीच समिती देणार आहे. कृषी विभागाकडून झालेल्या कामाची पाहणी होणार मात्र अधिकतर अधिकार हे समिती आणि सरपंच यांनाच असणार आहेत.

## शाहू महाविद्यालयात एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे राजर्षी शाहू महाविद्यालय, वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित व डीएसटी फिस्ट प्रायोजित जीवशास्त्रातील प्रगत संशोधन आणि विकास या विषयावर २६ मार्च रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन सेल्युलर आणि मोलेकुलर जीवशास्त्र केंद्र, हैद्राबाद मुख्य शास्त्रज्ञ व प्रकल्प देखरेख आणि मूल्यमापन प्रमुख डॉ. विष्णू प्रिया एम. आर. यांच्या हस्ते होणार आहे.

# कराची थकबाकी :पालिकेच्या संकुलास टाळे

### अनेक दुकाने, ट्रॅव्हल्स कार्यालये बंद असल्याने नागरिकांची गैरसोय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** महापालिकेकडे अकृषी कराची थकबाकी असल्याच्या कारणावरून सोमवारी (दि.२४) तहसील कार्यालयाने महापालिकेच्या मालकीच्या अशोक हॉटेल चौक परिसरातील यशवंतराव चव्हाण संकुलातील सर्व गाळ्यांना टाळे ठोकले. सदर टाळे कोणीही काढण्याचा प्रयत्न करू नये, अशी सूचनाही या नोटीसमध्ये बजावण्यात आली आहे.




अशोक हॉटेल चौक परिसरात महापालिकेच्या मालकीचे यशवंतराव चव्हाण संकुल आहे. या संकुलमध्ये वेगवेगळ्या प्रकारची दुकाने, आस्थापना तसेच अनेकांची कार्यालयेही आहेत. महापालिकेकडे अकृषी कराची थकबाकी असल्याच्या कारणावरून सोमवारी (दि.२४) सकाळी यशवंतराव चव्हाण संकुलला तहसील कार्यालयाने टाळे ठोकले. तेथील सर्व गाळ्यांनाही टाळे ठोकण्यात आले. तहसील कार्यालयाच्या माहितीनुसार २०२४-२५ या वर्षाचा महापालिकेकडे २ कोटी ३६ लाख २८ हजार १२८ रुपये अकृषी कर (एन. ए.) थकला आहे.

महापालिकेने हा कर भरण्यासंदर्भात १५ जानेवारी व २५ फेब्रुवारी अशा दोनवेळा नोटीसाही बजविण्यात आल्या होत्या. २२ मार्च रोजी गाळ्यांना टाळे ठोकण्यात येणार असल्याची माहितीही सर्व गाळेधारकांना देण्यात आली होती. तरीही महापालिकेने अकृषी कर भरला नाही म्हणून सोमवारी सकाळी तहसील कार्यालयातर्फे यशवंतराव चव्हाण संकुलमधील सर्व गाळ्यांना टाळे ठोकण्यात आले. अचानक गाळ्यांना टाळे ठोकल्याने या व्यापाऱ्यांची धांदल उडाली. आता याबाबत महापालिका प्रशासन काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुन्हा दगडाने ठेचून एकाचा तरुणाचा खून

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** शांतताप्रिय जिल्हा अशी लातूरची ओळख आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून शहरासह जिल्ह्यात भरदिवसा खून, गँगवॉर, हाणामारी, शस्त्राचा धाक दाखवत लूट, चोऱ्या अशा अप्रिय घटना घडत आहेत. गेल्या अडीच महिन्यात जिल्ह्यात खुनाच्या दहा घटना घडल्या आहेत. सोमवारी पहाटे शहरातील राजस्थान विद्यालयाच्या समोरील कॉम्प्लेक्समध्ये दगडाने ठेचून एका युवकाचा खून केल्याची अकरावी घटना घडली आहे. हे प्रकार पहाता सुसंस्कृत लातूरची अराजकतेकडे वाटचाल सुरू असल्याचे दिसून येत आहे.

शहरासह जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गंभीर गुन्ह्यांचा टक्का वाढला आहे. सार्वजनिक ठिकाणी खून, हुल्लडबाजी करून गोंधळ घालणे, गँगवॉर, हाणामाऱ्या करणे, शस्त्राचा धाक दाखवत तसेच तोतया पोलिसांकडून आर्थिक लूट अशा घटना घडत आहेत. विशेष म्हणजे सामान्यांत भीतीचे वातावरण पसरविणाऱ्या दादा, भाईंच्या टोळ्या सक्रिय झाल्या आहेत. यामुळे दिवसाढवळ्या खुनासारख्या घटना घडत आहेत. गेल्या अडीच महिन्यांच्या कालावधीत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात खुनाच्या दहा घटनांची नोंद झाली आहे. यातील बहुतांश आरोपींना पोलिसांनी जेरबंद केले आहे.

### लातूरकरांत चिंतेचे वातावरण

शांतताप्रिय आणि सुसंस्कृत लातूरची अराजकतेकडे वाटचाल सुरू असल्याचे लातूकरांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. बेरोजगारी, अंमली पदार्थाच्या प्रभावाखालील तरुणांकडून अशा स्वरूपाचे गुन्हे घडत असल्याचे बोलले जात आहे.

आठवड्याभरापूर्वीच भीक मागून जगणाऱ्या एका इसमाचा शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या समोरच दगडाने ठेचून खून करण्यात आला होता. याच्या दुसऱ्या दिवशी रात्रीच्या सुमारास पैशासाठी रेल्वेस्थानक शेजारी एका परप्रांतीय पाणीपुरी विक्रेत्याचा खून करण्यात आला. दरम्यान, सोमवारी (दि.२४) पहाटेच्या सुमारास अज्ञाताने राजस्थान विद्यालयाच्या शेजारी नव्याने बांधण्यात येत असलेल्या कॉम्प्लेक्समध्ये एका युवकाचा दगडाने ठेचून खून केल्याची घटना उघडकीस आली आहे.

मयताचा चेहरा पूर्णपणे विद्रूप झाला असून बाजूला रक्ताचा सडा पडला आहे. मयत तुरुणाचे नाव अक्षय तेलंगे असून या घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# वंध्यत्व निवारण कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** लातूर स्त्री रोग संघटनेच्या वतीने लातुरातील हॉटेल अरोमा येथे आयोजित करण्यात आलेल्या वंध्यत्व निवारण नवीन उपचार प्रणाली विषयावरील कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यशाळेत डॉ. वसुधा जाजू, डॉ. भालचंद्र, डॉ. शोभराणी कर्पे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर अखिल भारतीय स्त्री रोग लॅप्रोस्कोपी संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. कल्याण बरमदे यांचा या कार्यशाळेत विशेष गौरव करण्यात आला. या कार्यशाळेत एकूण ९८ स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टरांनी सहभाग नोंदवला.

'वंध्यत्व निवारण नवीन उपचार प्रणाली' या विषयावरील कार्यशाळेस मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. कुंदन इंगळे, डॉ. केदार गाणला, डॉ. पंडित पळसकर, डॉ. दिलीप वाळके, डॉ. कल्याण बरमदे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. कुंदन इंगळे यांनी 'एंडोमेट्रिओसिसच्या वैद्यकीय व्यवस्थापनात अलीकडील प्रगती' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. पंडित पळसकर यांनी ' प्रजनन क्षमता वाढविणारी लॅप्रोस्कोपी' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. कल्याण बरमदे यांनी 'प्रजनन क्षमता वाढवणारी हिस्टेरोस्कोपी ' या विषयावर मार्गदर्शन केले.

डॉ. केदार गाणला यांनी लेटेरोझोल इन ओबीजीवायएन प्रॅक्टिस या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी वंध्यत्वाचे वैद्यकीय पैलू' या विषयावर पॅनल डिस्कशन झाले. यामध्ये डॉ. दिलीप वाळके यांनी मार्गदर्शन केले. या चर्चेत डॉ. मनोज पर्बत, डॉ. कुणाल जाधव, डॉ. कलावती मुंदडा, डॉ. सुवर्णा बिराजदार, डॉ. राजश्री गुंडावार , डॉ. रवींद्र सुरवसे, डॉ. पौर्णिमा पाटील आदिंनी सहभाग नोंदवला.

या कार्यशाळेत संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांना पदभार देण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गिरीधर सूर्यवंशी, डॉ. अनिल भुतडा यांच्यासह. नूतन पदाधिकारी डॉ . अनुसया वलसे, डॉ.शीतल लाड यांची उपस्थिती होती. लातूर स्त्री रोगसंघटनेच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा पाटील, सचिव डॉ. मनिषा बरमदे यांनी सर्वांचे स्वागत केले. लातूर स्त्री रोग संघटना चॅम्पियन अवॉर्ड विजेते डॉ.स्वाती गोरे, डॉ. जाकेरा केळगावकर, डॉ. राखी सारडा यांचा सन्मान करण्यात आला.

# दिव्यांगाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत लातूरला १८ पदके

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** दिव्यांग कल्याण आयुक्तालय क्रीडा व युवक कल्याण सेवा संचालनालय व स्व.प्रभाकरराव दटके स्मृती सेवा संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथील रेशीमबाग मैदान येथे झालेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या राज्यस्तरीय स्पर्धेत लातूरच्या दिव्यांग खेळाडूंनी १८ पदके पटकावित घवघवीत यश संपादन केले. यात ०८ सुवर्ण, ०७ रौप्य, व ०३ कास्यपदाकांचा समावेश आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील जवळपास १५ दिव्यांग विशेष शाळांतील ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये मुकबधिर, मतिमंद, अस्थिव्यंग, अंध व बहूविकलांग प्रवर्गाचा समावेश होता.



पदक विजेते खेळाडू - यात हर्षवर्धन रणखांब - सॉप्टबॉल सुवर्णपदक (संत बापुदेव साधू निवासी मतिमंद विद्यालय, लातूर), अभिषेक बंडगर - २०० मी धावणे कास्यपदक (निवासी अपंग कार्यशाळा, चाकूर), ज्ञानेश्वर कपासे - २०० मी धावणे सुवर्णपदक, कलीम शेख - व्हिलचेअर वर बसून गोळा फेक, रौप्यपदक ( निवासी अस्थिव्यंग कर्मशाळा, उदगीर), गोविंद भांगे - १०० मी धावणे सुवर्णपदक, सादीया शेख - ५० मी धावणे रौप्यपदक (सुआश्रय निवासी अपंग विद्यालय, लातूर), दिव्यां मोठे- ५० मी धावणे सुवर्णपदक, १०० मी धावणे कास्यपदक, (निवासी अपंग विद्यालय, अहमदपूर) हरिश पुरी - गोळा फेक सुवर्णपदक पटकावले.

# क्रिडा संकुलात विविध विकास कामासाठी निधी उपलब्ध करावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** येथे डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी क्रीडामंत्री मनसुख मांडविय यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी 'खेलो इंडिया' योजनेअंतर्गत लातूर जिल्हा व विभागीय क्रीडा संकुल येथे विविध विकास कामासाठी शासकीय निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात चर्चा केली. तसेच क्रीडामंत्र्यांना मागण्यांचे लेखी निवेदन देखील दिले.



या निवेदनात जिल्हा क्रीडा संकुल अंतर्गत आवश्यकतेनुसार सिंथेटिक वॉकिंग ट्रॅक करीता निधी उपलब्ध करून देणे, लातूर विभागीय क्रीडा संकुलाचे अद्ययावत सुविधांसह आधुनिकीकरण करणे, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, ज्युडो, कुस्ती, हँडबॉल, कबड्डी इत्यादी खेळांकरिता हॉलच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देणे आदी बाबी नमूद करण्यात आल्या. खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि विविध स्पर्धांच्या तयारीसाठी जागतिक दर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा, यामागील उद्देश असल्याचे डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी सांगितले.लातूर जिल्ह्यातील युवा खेळाडूंना पुरेशा सुविधा मिळाव्यात, त्यांना प्रोत्साहन मिळावे व त्यांचा सर्वांगी विकास व्हावा, हा हेतू ठेवून विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात मनसुख मांडविया यांच्याबरोबर सकारात्मक चर्चा झाल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांचीदेखील भेट घेतली व त्यांनाही लेखी निवेदनाद्वारे निधीची मागणी केली.

# क्षयरुग्ण शोध मोहिमेत आढळले ८९८ क्षयरुग्ण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** लातूर जिल्ह्यात सन २०२४ मध्ये २९७१ क्षयरुग्ण आढळून आले आहेत. सन २०२५ राज्य क्षयरोग विभागाकडून जिल्हयास २८५० क्षयरुग्ण शोधण्याचे उदिदष्ट दिलेले आहे. जिल्ह्यामध्ये जानेवारी व २३ मार्च २०२५ दरम्यान ७०१ क्षयरुग्ण आढळले आहेत.

जागतिक स्तारावरील शाश्वत विकास ध्येयानुसार सन २०३० अखेर क्षयरोगाचे दुरीकरण करणे अपेक्षित आहे. मात्र, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सन २०२५ अखरे देशातून क्षयरोगाचे दुरिकरण करण्याचे महत्वकांक्षी लक्ष्य ठेवलेले आहे. त्याअनुषंगाने देशात राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत.



उपक्रमाचा एक भाग म्हणून केंद्रीय क्षयरोग विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ७ डिसेंबर २०२४ ते दिनांक २४ मार्च २०२५ दरम्यान जिल्हयातील क्षयरोगासाठी अतिजोखीम असलेल्या निवडक कार्यक्षेत्रात १०० दिवस क्षयरुग्ण शोध मोहिम राबविण्यात आली . या मोहिमेदरम्यान १७ मार्च २०२५ अखेर जिल्हयात ८९८ क्षयरुग्णांचे निदान करण्यात आलेले आहे.

जागतिक स्तरावर क्षयरोगाची जागरुकता प्रभावीपणे वाढविण्यासाठी दरवर्षी २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून जागतिक स्तरावर मृत्युच्या प्रमुख कारणांपैकी एक असलेल्या क्षयरोगाकडे सर्वाच्या एकत्रित सहकार्याने लक्ष वेधण्यात येते. या दिनाचे औचित्य साधून क्षयरोगाविषयी जिल्हास्तर, तालुकास्तर व सर्व आरोग्य संस्थास्तरावर व्यापक जनजागृती करण्यात येते.

क्षयरोगाच्या महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना जागतिक क्षयरोग दिनानिमित्त दरवर्षी एक घोषवाक्य प्रसारित करते, ते खालील प्रमाणे आहे,

'होय आपण क्षयरोग निश्चित संपवू शकतो: प्रतिज्ञा करा, तरतूद करा, सेवा द्या' हे यावर्षीचे घोषवाक्य आहे. क्षयरुग्णांच्या फायद्यासाठी प्रतिज्ञेनुसार व केलेल्या तरतूदीनुसार त्यांना दर्जे दार सेवा देणे. जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून दिनांक २४ मार्च २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता राहुल कुमार मीना यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने लातूर येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे सर्व प्रथम डॉ.रॉबर्ट कॉक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.तांबारे एस.एन. यांनी केले. प्रास्ताविकपर बोलताना राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेले विविध मोहीम व उपक्रमाबाबतची माहिती देण्यात आली. तसेच लातूर जिल्हा हा लवकरात लवकर क्षयरोगमुक्त करण्याचा निर्धार केला आणि क्षयरोगाची जास्तीत जास्त प्रमाणात जनजागृती करण्याचे आवाहन केले.

# मानवी जीवन कल्याणासाठी महात्मा बसवेश्वरांनी लिंगायत विचार दिला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च -** माझं घर येथे लिंगायत शरण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन रविवारी रात्री करण्यात आले होते. यावेळी लिंगायत चळवळीची दिशा, लिंगायत विचार व इष्टलिंगाचे वैज्ञानिक महत्त्व यावेळी सांगण्यात आले. यावेळी प्रख्यात व्याख्याते चन्नवीर भद्रेश्वर मठ यांनी लिंगायत चळवळीची दिशा यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.

मानवी जीवन कल्याणासाठी महात्मा बसवेश्वरांनी लिंगायत विचार दिला आहे यामध्ये समता, अनुभव मंटप,कायक सिद्धांत तसेच स्त्री पुरुष समानता अंधश्रद्धा निर्मूलन वैज्ञानिक दृष्टिकोन असंख्य बाबीचा उल्लेख झाला आहे लिंगायत विचार व संविधानातील मूल्य ही सारखीच आहेत. तसेच सध्याचं वातावरण प्रतिकूल बनलं आहे. या काळात महात्मा बसवेश्वरांचे विचार तळागाळापर्यंत नेण्याचे काम आता कार्यकर्त्यांनी केलं पाहिजे. आता प्रत्येक कार्यकर्त्यांनी हा विचार आपल्या खांद्यावर घेऊन तळागाळापर्यंत पोहोचवा असे आवाहन चन्नवीर भद्रेश्वर मठ यांनी केले. तसेच डॉ.अमरनाथ सोलपुरे सर यांनी देह हेच देवालंय असून आपल्या अंतरंगातील परमात्मा चे रूप प्रत्येकाच्या हृदयावर इष्टलिंग आहे. इष्टलिंग हे समतेचे प्रतीक आहे.

संपूर्ण ब्रह्मांडाचं प्रतीक म्हणून आपण त्याची पूजा केली पाहिजे. या इष्टलिंगाचे सकारात्मक परिणाम आपल्या शरीरावर होत असतात. म्हणून ते प्रत्येकाने भक्तीपूर्वक धारण करुन त्याची साधना अर्थात मनोभावे पूजा केली पाहिजे. महात्मा बसवेश्वरांनी मानवी कल्याणसाठी इष्टलिंगाची निर्मिती करून मानवी जीवनाचे कल्याण केले आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

डॉ. सोलपुरे यांनी बसवकल्याण क्षेत्र समिती च्या कार्याची माहिती दिली. बसवकल्याण येथे बाराशे कोटी रुपये खर्च करुन अनुभव मंटपाचे काम चालू असून ते अंतीम टप्प्यात असल्याचे सांगितले. यावेळी माझं घर संयोजक शरद झरे सर यांनी महात्मा बसवेश्वर संदर्भात आपलं मत व्यक्त केले.

यावेळी लिंगायत चळवळीतील राजेश विभुते, सुनील हेंगणे, माधव गंगापुरे मन्मथ कोनमारे, चंद्रशेखर कत्ते, योगेश कारंजे, सुरज विभुते, शोभाताई सलगरे, भुसनुरे बाई, बसवेश्वर हेंगणे, डॉं गताटे साहेब, बसवेश्वर रेकुळगे, किशोर पाटील आदी उपस्थित होते.

CMYK

लातूर
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## प्रो. डॉ. श्रीधर कोल्हे यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ मार्च -**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या करियरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रभर विविध महाविद्यालयात करियर कट्टा हा उपक्रम राबविला जातो. यंदा लातूरच्या जयक्रांती महाविद्यालयात



हा उपक्रम अतिशय पद्धतशीरपणे राबविल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. श्रीधर कोल्हे यांना स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड येथे जिल्हास्तरीय उत्कृष्ट प्राचार्य या पुरस्काराने प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी माजी मंत्री तथा शारदाभुवन एजुकेशन सोसायटीचे सचिव डी.पी. सावंत होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर, प्रमुख पाहूणे म्हणून तर तसेच प्रा.डॉ. किरण कुमार बोदर, कुलसचिव डॉ.डि.डि. पवार, महाराष्ट्र माहिती साह्ययता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, प्राचार्य बाळासाहेब जाधव व प्रा.डॉ. सतिश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### सुभान्या सायंटिस्ट चित्रपट चित्रीकरणाचा शुभारंभ

**अहमदपूर, दि.२५ मार्च -**

अहमदपूर पासून जवळच शिरूर राजबंद येथील प्रसिद्ध अशा भगवान बालाजी मंदिरात नांदेड येथील श्रीनिवासा प्रोडक्शन निर्मिती 'सुभान्या सायंटिस्ट' या मराठी चित्रपटांचा मुहूर्त बालाजी मंदिर देवस्थान चे दत्ता जवळगे यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी चित्रपटाची निर्माती दिपाली देशमाने, दिग्दर्शक दिलीप आंबेकर, कॅमेरामन विकी लकीरी, कलाकार शिवम देशमुख, आकाश पाटील, मनाली कदम, दिलीप आंबेकर, रवी शिंदे, नितीन दरोडे, मनीषा मोठे गावकर, विनोद एडके, सस्मित गडकर, बालाजी पडोळे, शिवाजी श्रीमंगले आधी उपस्थित होते. यावेळी सर्व कलावंतांचा सत्कार दत्ता जवळगे यांनी केला चित्रपटातील अभंग या गाण्यावर चित्रीकरण करण्यात आले. यामध्ये येथील बालाजी मंदिर भजन करी मंडळचे कलाकेरांनी सहभाग घेतला. पुढील चित्रपटाचे शूटिंग सातारा मुंबई येथे होणार आहे. चित्रपट सप्टेंबरमध्ये प्रदर्शित होणार आहे.



### वंध्यत्व निवारण कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर, दि.२५ मार्च -**

लातूर स्त्री रोग संघटनेच्या वतीने लातुरातील हॉटेल अरोमा येथे आयोजित करण्यात आलेल्या वंध्यत्व निवारण नवीन उपचार प्रणाली विषयावरील कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत डॉ. वसुधा जाजू, डॉ. भालचंद्र, डॉ. शोभराणी कर्पे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर अखिल भारतीय स्त्री रोग लॅप्रोस्कोपी संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. कल्याण बरमदे यांचा या कार्यशाळेत विशेष गौरव करण्यात आला. या कार्यशाळेत एकूण ९८ स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टरांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी डॉ. मंदाडे, डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. वारद, डॉ. दीपक पाटील, डॉ. भुतडा, डॉ. लाड, डॉ. अनुसया वलसे, डॉ. दाताळ, डॉ. मस्के यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

### शेती पिकाच्या नुकसानीसाठी ई-केवायसी करुन घ्यावी

**लातूर, दि.२५ मार्च -**

लातूर जिल्हयात अतिवृष्टीने झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाकडून ४६६ कोटी ४० लाख इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी वाटपाची कार्यवाही डीबीटी प्रणालीमार्फत सुरु आहे. आजपर्यंत जिल्ह्यातील ३ लाख ८६ हजार ५०५ लाभार्थी मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले असून त्यापैकी ३ लाख ५० हजार ३७३ लाभार्थ्यांना ३८७ कोटी ३४ लाख रुपये निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच २४ हजार ३८२ शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी न केल्याने रक्कम २१ कोटी ७७ लाख रुपये इतका निधी वितरीत करणे शिल्लक आहे.

### हरुबाई सुमठाणे

**शिरूर अनंतपाळ, दि.२५ मार्च -**

येरोळ (ता. शिरूर अनंतपाळ) येथील प्रतिष्टीत महिला नागरिक हरूबाई नागनाथ सुमठाणे वय ८० यांचे अल्पशा आजाराने लातुर येथील रूग्नालयात उपचार चालु असताना सोमवारी दुपारी तीन वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन विवाहीत मुले सुना नातवंडे असा परिवार आह. पत्रकार राम सुमठाणे यांच्या आज्जी होत.

# पळसाच्या पानांची पत्रावळी झाली हद्दपार

**▶▶ विवाह, सप्ताह, पूजेसाठी वापर झाला कमी... ▶▶ पत्रावळी बनवणारे हात बेरोजगार....**

**तभा वृत्तसेवा / शंकर मिटकर**
**शिरूर अनंतपाळ, दि.२५ मार्च -**

विवाह सोहळा, सप्ताह, पूजा व इतर मोठमोठ्या कार्यक्रमात जेवणासाठी मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या पळसाच्या पानांच्या पत्रावळी सध्याच्या काळात हद्दपार झाल्याचे चित्र शहरासह ग्रामीण भागातही सर्रास पहायवयास मिळत आहे.

त्याची जागा प्लास्टिक व थर्मोकोलच्या पत्रावळींनी घेतली आहे. स्थानिकांचा पत्रावळी तयार करणे व पळसाची पाने जंगलातून आणून व्यापाऱ्यांना विकणे हा छोटेखानी रोजगार कमी झाला आहे.

तालुक्यात वृक्ष तोड राजरोसपणे सुरू आहे.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. परंतु वनविभागाच्या वतीने दरवर्षी अगनिक वृक्ष लागवड करण्यात येते.

त्याची आकडेवारी फार मोठी असते. परंतु लागवड झालेली झाडे वनविभागामार्फत किती जगवली जातात आणि जगली याची आकडेवारी उपलब्ध नसते. राजरोसपणे वृक्ष तोड, नव्याने लावलेल्या वृक्षांचे संवर्धन न करणे आदी कारणांमुळे पळसाच्या पानावर जेवण करण्याची परंपरा लोप पावत चालली आहे. सहसा प्लास्टिक पत्रावळी व द्रोणचे विघटन होत नसल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.

पर्यावरण प्रेमीकडून याबाबत नाराजी व्यक्त होत आहे. पुन्हा एकदा पानांच्या पत्रावळी उपलब्ध झाल्यास त्यांचा नागरिक आनंदाने स्वीकार करतील.

परंतु काळाच्या ओघात पानांच्या पत्रावळी मिळणे शक्य नाही.



**▶▶ सगळे मिळून तयार करत होतो पत्रावळी...**

गावात कुलदैवतांचा कार्यक्रम, लग्न असेल तर तरुण मुलांना रानात पळसाची पाने आणायला पाठवले जात असे रात्री सगळे एकत्र जमून यापानासून पत्रावळी तयार करायचो. याच पत्रावळीवर गाव जेवण व्हायचे, पण आता पानांच्या पत्रावळी दुर्मिळ झाल्या आहेत.

**▶▶ पर्यावरणप्रेमीमध्ये नाराजीचा सूर...**

पानांपासून बनवलेली पत्रावळी दुर्मिळ होत असून प्लास्टिक पत्रावळीचा सर्रास वापर होत आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. स्वस्त पर्याय म्हणून लग्न, वाढदिवस, मुंज आणि सार्वजनिक ठिकाणचे भोजन अशा अनेक ठिकाणी प्लास्टिक पत्रावळीचा वापर केला जात आहे. प्लास्टिक पत्रावळी आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. आता फक्त सणावाराला देवांना, पूर्वजांना नैवेद्य दाखविण्या पुरताच पानांचा वापर केला जात आहे.

## लोखंडी राडने प्राणघातक हल्ला; दोन गंभीर

### चौघावर अट्रासिटीचा गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२५ मार्च -**

ट्रॅव्हल्स गाडी वेळेवर का सोडत नाही अशी विचारपूस करत असताना लोखंडी राड व कत्तीने प्राणघातक हल्ला करून जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी निलंगा येथील चौघांविरुद्ध अट्रासिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे निलंगा शहरात तणाव निर्माण झाल्याने जिल्ह्यातील पोलिस बंदोबस्त मागवून कायदा व सुव्यस्था राखण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला.

याबाबत सविस्तर माहिती अशी की विवेक वाल्मिकराव गिरबने हा आपल्या भाऊ व भाचा याला पुण्याला पाठवण्यासाठी निंबाळकर पेट्रोल पंपासमोर आला असता गाडी सुटायला एवढा वेळ का झाला विचारपूस करत असताना आरोपी शाहरूख पाटेवाले, इम्रान पाटेवाले, हकीम पाटेवाले, शुभांगी महेंद्रकर (सर्व रा. शिवाजी नगर निलंगा) व इतर सात ते आठ अनोळखी व्यक्तीने हातात लोखंडी राड, कत्ती, लोखंडी साखळी काठ्या, कुऱ्हाड घेवून फिर्यादि व साक्षिदारास जबर मारहाण जीवे मारण्याची धमकी देत विक्रम वाल्मिक गिरबने व विक्रांत विनोद आर्य या दोघांना डोक्यात मारून गंभीर जखमी केले व लाथाबुक्यानी मारहाण केली आहे. तसेच जीवे मारण्याच्या उद्देशाने हा हल्ला केला आहे.

याबाबत विवेक गिरबने (रा. पेठ निलंगा) यांनी दिलेल्या फिर्यादिवरून शाहरूख पाटेवाले, इम्रान पाटेवाले, हकीम पाटेवाले, शुभांगी महिंद्रकर सर्व राहणार शिवाजी नगर निलंगा व इतर अनोळखी सात ते आठ जणावर निलंगा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र फार्मसी टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत जनजागृती रॅली



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२५ मार्च -**

भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली टीबी मुक्त भारत अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालय व महाराष्ट्र फार्मसी निलंगा यांच्यावतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

क्षयरोग पथक, निलंगा यांच्या वतीने महाराष्ट्र फार्मसी कॉलेज, निलंगा येथे टीबी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. भागवत पौळ आणि डॉ. सिद्धेश्वर पाटील यांच्या हस्ते झाले. तसेच, याप्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप कुमार जाधव आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक हुगे प्रमुख उपस्थित होते.



रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांनी शिवाजी चौक पर्यंत जनजागृती करत टीबी विषयक माहिती प्रसारित केली. रॅलीनंतर पी.व्ही. करपे यांनी उपस्थितांना टीबीच्या प्रतिबंध, निदान आणि उपचारांबाबत सविस्तर माहिती दिली आणि टीबी निर्मूलनाची शपथ दिली. कार्यक्रमात महाराष्ट्र फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. पौळ, प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी निक्षय मित्र म्हणून पुढाकार घेत ३० क्षयरुग्णांना फूड बास्केट प्रदान केल्या.

कार्यक्रमाचे आभार एम.एस. शेख यांनी मानले. या उपक्रमात व्ही.बी. जाधव, युएचडब्ल्यूसी स्टाफ उपस्थित होते.

## शैक्षणिक प्रशिक्षणाने शिक्षक परिपक्व अध्यापन करतो : प्रा.डॉ. भागीरथी गिरी

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२५ मार्च -**



आज बदललेल्या युगामध्ये सर्वच क्षेत्रात क्रांतिकारक असे स्वरूपाचे बदल झालेले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांना आधुनिक स्वरूपाचे ज्ञान देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने विविध प्रकाराची अभ्यासक्रमाची प्रशिक्षण चालविण्यात येत आहेत. त्यात स्टार्स प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी दीक्षा पोर्टलवर ऑनलाईन कोर्स उपलब्ध करून देण्यात आले होते आणि या कोर्सच्या अटी प्रमाणे ऑनलाइन कोर्स केलेल्या पात्र शिक्षकांची पी.एल.सी. प्रशिक्षण तालुकास्तरावर २२ मार्च २५ रोजी पूर्ण करून घेण्यात आले. प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षक परिपक्व होऊन विद्यार्थ्यांच्या समार अध्यापन करतो असे आग्रही प्रतिपादन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या डॉक्टर भागीरथी गिरी यांनी केले.

त्या राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे आणि राज्यस्तरीय गरजाधिष्टीत मिश्र माध्यम अभ्यासक्रम प्रशिक्षण २०२४-२५ च्या ऑनलाइन उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. जिल्हा प्रशिक्षण समन्वयक डॉ. जगन्नाथ कापसे, यांच्या मार्गदर्शनानुसार व गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या नियोजनानुसार सदरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका प्रशिक्षण समन्वयक डॉ. कामाक्षी पवार होत्या.

व्यासपीठावर सुलभक रत्नप्रभा मंडलवार, सुलभक मनीषा गुणाले, सुलभक शिवकुमार मठपती, सुलभक एस.एम. महालिंगे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना त्या म्हणाल्या की शिक्षकांनी नेहमी स्वतःला अपडेट ठेवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे जाहीर आवाहन केले. अध्यक्षीय समारोप तालुका समन्वयक डॉ. कामाक्षी पवार यांच्या भाषणाने झाला. या शिबिरात मराठी, गणित, विज्ञान, इंग्रजी, सामाजिक शास्त्र, प्राथमिक, माध्यमिक विषयाच्या शिक्षकांनी प्रशिक्षणात सहभाग घेऊन ऑनलाइन मिश्र माध्यमिय अभ्यासक्रम व्यवसायिक अध्ययन समूह पीएलसी प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांना राज्यस्तरीय प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवकुमार मठपती यांनी सूत्रसंचालन माधव मठवाड यांनी तर आभार राम तत्तापूरे यांनी मांनले.

## उमरदरा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२५ मार्च**

तालुक्यातील उमरदरा येथे अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्री राम कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन सद्गुरु गुरुवर्य गुरुबाबा महाराज औसेकर मठाधिपती नाथ संस्थान औसा यांच्या कृपा आशीर्वादाने व श्री सद्गुरु गहिनीनाथ महाराज यांच्या कृपेने अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्रीराम कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.२४ मार्च पासून सुरू झालेल्या या सप्ताहात खालील नामांकित कीर्तकारांची कीर्तन सेवा लाभणार आहे.

व्यासपीठ प्रमुख हभप. प्रकाश महाराज तळेगावकर, रामायणाचार्य हभप. वासुदेव दास बाबा बैरागी कीर्तनकार हभप. गोपाळ महाराज तांदुळवाडीकर.

हभप. शौकत महाराज उमरगा, हभप. हंडे महाराज सिरसल, हभप. संदिपान महाराज हसेगावकर, हभप.विठ्ठल महाराज शिवणखेड, हभप गुरुवर्य नामदेव महाराज दापकेकर, हभप. वासुदेव बाबा बैरागी महाराज टाकळीकर यांचे सुश्राव्य असे किर्तने होणार आहेत.

या सप्ताहाचा लाभ घ्यावा असे ग्यानदेव ढोपरे, ज्योतीराम मुदगडे, केवळाबाई शिंदे, ज्ञानोबा ढोपरे, बाळु ढोपरे, भास्कर कदम, उत्तम ढोपरे व समस्त गावकऱ्यांच्या वतीने बाल भजनी मंडळ उमरदरा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## युवकांनी युवा संसदेत परखडपणे आपले विचार मांडावेत : डॉ. करजगी

**▶▶ जयक्रांती महाविद्यालयात विकसित भारत युवा संसद संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ मार्च -**

युवाकार्य वं क्रीडा मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली वं क्षेत्रीय निर्देशालय, पुणे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, नेहरू युवा केंद्र, नांदेड,लातूर, परभणी, हिंगोली, आणि भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर (वाणिज्य आणि विज्ञान) राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विकसित भारत युथ पार्लमेंट -२०२५ दि.२० व २१ मार्च रोजी जपश Nation, One Election: Paving the Way for Viksit Bharat (एक देश एक निवडणूक : विकसित भारताची दिशा) या विषयावर संपन्न झाली. या युवा संसदेमध्ये नांदेड परभणी हिंगोली लातूर या जिल्ह्यातील एकूण २१० युवक युवतीनी माय भारत पोर्टलवर आपला १ मिनिटाचा व्हिडिओ अपलोड करून नोंदणी केली. यामधून निवडून १३० विद्यार्थ्यांना या प्रक्रियेत सहभागी होण्यास सांगितले होते त्यामधून १०० युवकांनी सहभाग घेतला. समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभा, संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, प्राचार्य प्रशांत घार जयक्रांती ज्युनियर कॉलेज, लातूर, नेहरू युवा केंद्र, लातूर जिल्ह्यातील प्रतिनिधी संजय ममदापुरे, डॉ. श्रीधर कोल्हे प्राचार्य, जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालय, लातूर डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी म्हणाले की विकसित भारत युवा संसद ही सर्व युवकांसाठी खुली



असून यामध्ये विषयाशी संबंधित आपले परखड मत युवकांनी मांडावेत आपले विचार आपले मत हेच कदाचित शासन निर्णय घेण्यास भाग पडेल एवढी ताकद युवकांमध्ये असते. युवकांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता आपले मत मांडावेत समाज आणि देशाविषयीची भूमिका स्पष्ट करावी त्यातून राज्यस्तरावर भारतीय संविधानांचे ७५ वर्ष या विषयावर राज्यस्तरीय युवा संसदेमध्ये मध्ये आपल्याला मत मांडायचे आहे. राष्ट्रीय स्तरावर एक देश एक निवडणूक या विषयावर आपले मत मांडायचे आहे. त्याची सखोल तयारी करावी आणि आपला एक एक शब्द अतिशय महत्त्वपूर्ण असावा यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी परीक्षक म्हणून डॉ. भागवत पस्तापुरे, डॉ. राजकुमार पवळे, सहयोगी प्राध्यापक, डॉ. भीमराव पाटील, डॉ. दशरथ भिसे, डॉ. गीता वाघमारे, यांनी परीक्षक म्हणून अतिशय निपक्षपातीपणे जबाबदारी पूर्ण केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. केशव आलगुले, तर आभार डॉ. समिना शेख यांनी मानले.

## शिवाजी विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२५ मार्च -**

तालुक्यातील सताळा येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सताळा येथील वर्ग पहिली ते सातवी आणि शिवाजी विद्यालयात वर्ग आठवी ते दहावी मध्ये शिकवलेल्या सर्व गुरुजनांचा गुरु गौरव सोहळा व सताळा, गुंजोटी, सायगाव, व्हटी आणि दळवेवाडी या गावातील सर्व माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक मुकुंद कुलकर्णी होते.तर विशेष उपस्थिती म्हणून जय हनुमान ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव पुंडलिकराव कदम व सताळा ग्राम पंचायतीचे सरपंच तथा माजी विद्यार्थी लक्ष्मण खंदाडे हे होते. कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती म्हणून जी.आर. जगताप, पी.के. कोंपले, के.टी. जाधव, एस.व्ही. चांदीवाले, एम.जी. चाटे, डी. एच. वाकडे, आर.एस. कराड, आर.आर. मद्देवाड, गणपत महाळंकर, प्रभाकर बेद्रे, एकनाथ कराड, अनिरुद्ध मलवाड, विठ्ठल कदम, गोविंद कोलपूसे, राजकुमार बडगिरे, रघुनाथ वाघमारे, बाबुराव पलाने व आप्पाराव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात २३ मार्च हा शहीद दिन असल्याने भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. दुसऱ्या सत्रामध्ये गुरुजनांचा गुरु गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी अनेक माजी विद्यार्थ्यांनी व सत्कारमूर्तींनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन बाबासाहेब वाघमारे यांनी केले. तर आभार सचिन महाळंकर यांनी मानले.




या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.